मा॰

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

( जिल्हा वाचनालय )

मासिकाचे नांव — अभिप्राय संग्रह


संपादक —

मासिक क्रमांक — सन — १८३५

अंक —

( महिने ) ७ ५

# अभिप्राय संग्राहक



अलीकडे मराठी मध्यें दर साल चार पांचेशें लहान-मोठ्या पुस्तकांची भर पडत असते, पण सर्व सामान्य वाचकाला एवढ्या ग्रंथसंभाराचें आकलन होणें कठिण आणि त्यांतून संग्रहणीय ग्रंथ वेंचून काढणें तर त्याहून कठिण. सरकारी गॅझेटांत जी तिमाही जंत्री प्रसिद्ध होते ती सर्वांना सुलभ नसते हें एक आणि शिवाय तिच्यांत सद् सद्व्यक्ति केलेली नसते. तें तारतम्य स्वतः दर्शविण्याची जबाबदारी प्रस्तुत त्रैमासिकानेंही आपल्या शिरावर घेतलेली नाहीं. तथापि महत्वाच्या पुस्तकांवरील निरनिराळ्या वृत्तपत्रांचें निवडक अभिप्राय छापून ती जबाबदारी बऱ्याच अंशांनी पार पाडली जात आहे. ही समाधानाची गोष्ट आहे. मराठींतील मर्मज्ञ वाचक वर्गानें या नवीन धर्तीच्या वाङ्मयोपकारक नियतकालीकाला उदार आश्रय द्यावा आणि त्याला जंत्री व टीका असे उभयविध स्वरूप प्राप्त करून द्यावें.

केसरी ता. ११ जानेवारी १९३५

# अभिप्राय संग्राहकावरील
# आणखी दोन मार्मिक अभिप्राय

बडोद्याचे एक ग्रंथनिरीक्षक श्री. गणेश रंगनाथ दंडवते यांनी हे त्रैमासिक काढले आहे. इंग्रजींतील 'बुक रिव्हू डायजेस्ट' च्या स्वरूपाचें हें त्रैमासिक असून, त्यांत ग्रंथ, त्यांचे लेखक, प्रकाशक आणि मुद्रक यांची नांवें व त्यावरील निवडक अभिप्राय यांचा संग्राह करण्यांत येणार आहे. हें त्रैमासिक काढणे अत्यंत जिकरीचें काम असून, तें उपयुक्तहि पण तितक्याच प्रमाणांत होईल. मुंबई सरकार प्रकाशित पुस्तकांची एक यादी करित असतें. पण ती लोकांना सहज उपलब्ध होण्यासारखी नसल्यामुळे श्री. दंडवते यांचा हा प्रयत्न निःसंशय अभिनंदनीय आहे.

महाराष्ट्र.

दीपवालीच्या सुमुहूर्तावर सुरू झालेल्या या मासिकानें मराठी भाषेला एक अगदीं नवीन प्रकारचें लेणें चढविलें आहे. प्रकाशित ग्रंथाला वा पत्र मासिकाला वाङ्मयांत चिरस्थायी स्वरूप येण्याकरितां त्याच्यावर अभिप्राय स्वरूपाने चर्चा होऊन त्याचें मूल्य ठरावें लागते व ही चर्चा नियतकालीकें करतातच. पण ती चर्चा विखुरलेली व अल्पजीवी असल्यानें तिचा अंतिम उपयोग होऊं शकत नाहीं. संग्राहकानें ही उपयुक्त चर्चा कायम टेवण्याचा उपक्रम सुरू केला आहे. ही एक प्रकारची साहित्यसेवाच आहे. मासिकाला भरपूर आश्रय मिळून त्याचे उद्दिष्ट यशस्वी होवो असें आम्ही इच्छितों. वार्षिक वर्गणीहि अल्पच म्हणजे १ रु. आहे.

किर्लोस्कर.

## मराठी वाङ्मयाचा अभ्यास
### त्यांतील
# नाटकें आणि कादंबऱ्या

यांच्या विकासाचा अभ्यास केल्यावाचून पूर्ण होत नसल्याने अभ्यासकांनी व इतर वाङ्मय प्रेमी वाचकांनी आमचीं सर्वत्र वाखाणलेलीं खालील पुस्तकें अवश्य संग्रहीं ठेवावीत.

**कादंबरीची गोष्ट** मराठी कादंबऱ्यांची गोष्टी रूपानें पण आमूलाग्र माहिती देणारे एकच पुस्तक किं. १ रु. ट. ख. निराळा.

**महाराष्ट्र नाट्यकला व नाट्यवाङ्मय** मराठी रंगभूमीचा व नाट्यवाङ्मयाचा चटकदार इतिहास. किं. १रु. ३ आ. ट. ख. निराळा. पुस्तकें खालील पत्त्यावर मागवावीत.

पाचुरे, पुराणिक, आणि मंडळी
माधवबाग मुंबई
विश्वनाथ गणेश तामणकर
बुधवार पेठ, पुणे

**गणेश रंगनाथ दंडवते**
दण्डपुरी, बडोदें

हें पुस्तक बडोदें येथें श्री लक्ष्मी कानन प्रिन्टींग प्रेस मध्यें श्री ग. रा. मोतीराम रामणेकर अध्याय यांनी संपादका करितां छापिलें. ता. १–५–३५

संपादक आणि प्रकाशक.
गणेश रंगनाथ दंडवते.
बडोदें.

# अभिप्राय संग्राहक

वार्षिक वर्गणी
१ रु. ट. ख.
निराळा.

## संपादकीय

अभिप्राय संग्राहकाच्या पहिल्या नमूने वजा अंकाचा तज्ज्ञांनी जो सत्कार केला व त्यास जें प्रोत्साहन मिळालें त्याबद्दल महाराष्ट्र वाङमय प्रेमी जनतेचे आभार मानून, तिच्या हाती आज संग्रहाचा दुसरा अंक देण्यास आम्हास खरोखरीच आनंद वाटत आहे.

अभिप्राय संग्राहकाच्या धोरणासंबंधीं पहिल्याच अंकांत योग्य तो खुलासा केला असूनही कित्येकांचा त्याच्यासंबंधानें कांहीं गैरसमज झालेला दिसतो. पण तो केवळ गैरसमज होय असें त्याचा दुसरा अंक पाहिल्यावर त्यांची खात्री होईल अशी आशा आहे. अभिप्राय संग्राहक पक्षपात रहित आहे असें तो पुन्हा एकदां सांगतो व त्याच धोरणानें महाराष्ट्र वाङमयाची सेवा करण्याचें अश्वासन देतो

पहिला अंक प्रसिद्ध झाल्यानंतर अभिप्राय संग्राहकाकडे बरींच पत्रें आली असून त्यांत कित्येकांनीं कांहीं उपयुक्त सूचना केल्या आहेत. त्यांचेही येथें आभार मानून शक्य त्या सूचना यथावकास अंमलांत आणण्याचे तो अश्वासन देतो. तथापि तितकीच कार्यक्षमता अंगीं येण्यास त्यास त्याच्या व्यवसाय बंधूचें, ग्रंथकर्त्यांचें व प्रकाशकांचें आणि महाराष्ट्र वाङमयांची सर्वांगीण उन्नति इच्छिणाऱ्या सर्व सज्जनांचें सहकार्य पाहिजें हें उघड आहे, व त्याची तो सर्वांजवळ विनम्रपणें मागणी करीत आहे.

शेवटीं जिच्या प्रेरणेनें अभिप्राय संग्राहकाचा जन्म झाला त्या महाराष्ट्र शारदेनें आम्हांस त्याचा दुसरा अंक प्रसिद्ध करण्याची संधी आणून दिल्याबद्दल तिचे स्तवन करून व अभिप्राय संग्राहकास हाताशी धरण्याबद्दल सर्व महाराष्ट्रीयांची प्रार्थना करून त्यांची रजा घेतो,

सर्वत्रांचा नम्र सेवक

**गणेश रंगनाथ दंडवते.**

# नामानुक्रमणिका


| पुस्तकाचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| पुस्तकाचें नांव | पृष्ठ |
| अंधः श्रद्धा | ११ |
| अर्धांगी | २६ |
| अभिनय कला | १६ |
| अमृत सिद्धी | २६ |
| अस्पृष्टांचा प्रश्न | ११ |
| अज्ञातवासींची कविता | १९ |
| आंधळ्यांची शाळा | २७ |
| आक्का साहेब | ३२ |
| आजचे प्रसिद्ध गायक | १६ |
| आठ मिनिटें | ९ |
| आपोलो बंदरावर | ३२ |
| आत्महत्या, त्यांचा प्रसार व प्रतिकार | ११ |
| आत्माराम विद्या विनोद | २ |
| आमची मित्र मंडळी | ४४ |
| आर्यावर्तांतील तेजस्वीरत्नें | ३५ |
| आरोग्य प्रदीप | ८ |
| आरोग्याचा मार्ग | ८ |
| आशा गीत | २० |
| आशियाचे धर्मदीप | ४० |
| इतिकर्तव्य | ४४ |
| उत्तर क्रिया | २७ |
| उपासनी वाक्सुधा | ३ |
| उसना नवरा | २७ |
| ऋग्वेद सभाष्य | ३ |
| ऋग्वेदादि भाष्यभूमिका | ३ |
| कलंक शोभा | ३६ |
| कविकूजन | २० |
| कॅरमचा खेळ | १८ |
| कालिंदीची कैफियत | ३२ |
| काव्यश्री | २१ |
| कॉमरेड लेनिन | ४० |
| कुलस्त्रिया, रंगभूमी आणि बोलपट | ११ |
| कुलभूषण | ४ |

| पुस्तकाचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| कैवल्यपुरुष | १ |
| कोरफडीचा उपयोग | ८ |
| कोशरचनाशास्त्र व कोशवाङ्मय | १ |
| कौंट लिओ टॉलस्टाय | ४० |
| क्रांतीचे रणशिंग | ११ |
| गरीब मजूर | २८ |
| गवाक्ष गीत | २१ |
| गिरण्यांच्या मालकांची बादशाही | १२ |
| गीत कुसुमहार | ४४ |
| गीत वाहिनी | २२ |
| गुरुकरुणामृत | २२ |
| गोकुळचा चोर | २८ |
| गोदू गोखले | ३६ |
| गाणपती संप्रदाय | १५ |
| ग्रंथालय शास्त्राचा ओनामा | १ |
| ग्राम पंचायत | ११ |
| घंटानाद | १२ |
| घोषयात्रा | २८ |
| चांदरात व इतर कविता | २२ |
| चिमणरावांचे चऱ्हाट | ३७ |
| जय मंगला | २३ |
| जयाजी आणि कमळजा | २९ |
| जळो तें प्रेम | ३६ |
| जीवन्मुक्त स्वामी महाराज | ३ |
| जीवन्मुक्त व अधुनिक तत्त्वज्ञ | ३ |
| झाशीची विद्युल्लता | २३ |
| टिपऱ्यांचा शिक्षक | १८ |
| टिळक जन्माख्यान | ६ |
| डेक्कन क्वीन | २९ |
| तंजावरचे मराठी राजे | ३८ |
| तडफ | २४ |
| तिकडची शोभा | २९ |
| तिच्याकरतां | ३३ |
| तुकाराम | ४० |

| पुस्तकाचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| तुमच्यांतील कांहीं | ३३ |
| तेजस्वी सतीधर्म | ३६ |
| त्रिवार दफन | ३४ |
| दांपत्य रहस्य | २९ |
| दिलावर | ३४ |
| दुलारी | ३६ |
| देवी चरीत्र सुधा | ४ |
| धर्मशास्त्र मंथन | |
| धर्मस्वरूप निर्णय | ४ |
| नंदकुमार | ३४ |
| नमूनेदार ग्रामसेवक | १२ |
| नाना देशांतील नाना लोक | ९ |
| नामदार ASS | |
| नारायण चरित्र | ४१ |
| नाक्षत्र रहस्य | ७ |
| निर्जन ग्राम | २४ |
| निबंध मार्ग दर्श | १८ |
| निर्माल्य माला | २४ |
| पंचांग कसे पहावें | ७ |
| पिचलेला पावा | २४ |
| प्रकाश | ७ |
| प्रजेचा राजा | ३० |
| प्रतिभा साधन समितीचा अहवाल | १ |
| बदलापूर | १ |
| बनावटांचा बाजार | ३० |
| बाळाजी विश्वनाथ पेशवे | ४१ |
| बुल बुल तरंगविलास | १७ |
| बेकारी व तीवर उपाय | |
| बेसुमार व्याजास आळा घालण्याचा कायदा | १३ |
| भारत वर्षाचा धार्मिक इतिहास | ४ |
| भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न | १३ |
| भाव लहरी | ३७ |
| भिकारीण व इतर कविता | २५ |
| भोळा शंकर | ३० |
| मंडळांतील नाणीं | ३९ |
| मधुकराचा गुंजारव | २५ |
| मध्व मुनीश्वरांची कविता | ५ |
| मराठा स्वराज्य संस्थपकश्री शिवाजी महाराज | ४१ |
| मराठी व्याकरणाचीमूल तत्वें | १८ |
| मराठी भाषेची लेखन पद्धति | १८ |
| महाभारत भा ६ | ५ |
| महारा शद्बकोश भाग २ रा | |
| मानस लहरी | ३ |
| मायावाद आणि अनातवाद | १ |
| मालावृत | २ |
| मीमांस परिभाषा | ५ |
| मुद्रण कला | १७ |
| म्हैसूरचा प्रवास | ३९ |
| रंकाचें राव | ४१ |
| रंगीला धर्मवीर | ४१ |
| राजयोग प्रदीप | ६ |
| राजा राममोहनराय | ४२ |
| रुग्णग्रह परिचर्या | ९ |
| रोग निदान-नाडी परिक्षा | ९ |
| लग्न सोहळा | ३० |
| लव्हाळी | २५ |
| वाङ्मय विहार | ३७ |
| विकसन | ३५ |
| विट्टी दांडू | १८ |
| विठ्ठलाचा कटाव | ६ |
| विद्युत | ८ |
| विधवेची हाक | ३५ |
| विनोदी कळया | ३८ |
| विश्वनाथ काशीनाथ राजवाडे | ४२ |
| विषमज्वर व त्याची सुश्रूषा | ९ |
| विष्णु कृष्णशास्त्री पुराणीक | ४२ |
| विज्ञान सागर | ६ |

| पुस्तकाचे नांव | पृष्ठ | पुस्तकांचें नांव | पृष्ठ |
|---|---|---|---|
| वीस लाखाचें मृत्यु पत्र | ३५ | सदा बंदिवान | ३२ |
| वृद्धां करितां व्यायाम | १० | समर्थ चरित्र | ४३ |
| वेदांग शिक्षा | ६ | सत्याग्रही | ३१ |
| वेदांत परिभाषा | ६ | सम्राट शिकंदर | ४३ |
| शारदाश्रम वार्षिक | २ | सरला | ३५ |
| शारीरिक शिक्षण पद्धति | १० | सावकारी पाश | २५ |
| शाळा व आरोग्य | १४ | सिद्धौषधिप्रकाश | ९ |
| शिवण कला परिज्ञान | १७ | सुगी | २५ |
| शिवशाहीचा लेखनालंकार | ३९ | सुधारणा उद्भव व उपाय | १४ |
| शिवाजीका शह | ३० | सुलभ इन्कम टॅक्स | १५ |
| शेतकरी | १६ | सूर्य नमस्कार | १० |
| संगीत गीता नाटिका | ३० | सोहिरोबानाथ कविता सं | ७ |
| संगीत मार्ग दर्शक | १७ | हिटलर | ४३ |
| संगीताचें आत्म चरित्र | १७ | हिंदमाता मंदिर | १५ |
| संच प्रयोग | ३७ | हिंदी कामगीरी | १७ |
| संत सेना न्हावी चरित्र | ४३ | हिंदुधर्म दीपिका | ७ |
| सचित्र समर्थ मंदिर | ३९ | हेंच माझे पतिराज | ३७ |
| सत्य सावित्री | ३० | ज्ञानदेव | ४४ |
| सत्याचें वाली | ३१ | | |

# अभिप्राय संग्राहक

पुस्तक १ जानेवारी १९३५ भाग ३ व ४

## सामान्य

**कोशरचनाशास्त्र व कोशवाङ्मय** पृ. ७६–ले. वप्र. य. रा. दाते, महाराष्ट्र शब्दकोश-मंडळ, पुणें आगस्ट १९३३ किं. १ ०.

**ग्रंथालयशास्त्राचा ओनामा** पृ. २२४– ले. रघुनाथ सदानंद पारखी, इंटर नॅशनल बुक सर्व्हिस. पुणें. डिसेंबर १९३३ किं. ३ रु.

या शास्त्रावर पाश्चात्य वाङ्मयांत हजारो ग्रंथ असले तरी मराठींत हें पहिलेंच पुस्तक आहे यांत शंका नाहीं. ग्रंथालयांना हें पुस्तक तर अमोल आहेच; पण सामान्य वाचकांना सुद्धां तें बहुश्रुत केल्यावाचून रहाणार नाहीं.

चित्रमयजगत फेब्रुआरी १९३४

**प्रतिभासाधन समितीचा अहवाल** सं. प्रो. द. वा. पोतदार प्र–न. का. बावडेकर, 'सूर्यकांत' कचेरी भोर. किं. ४ आ.

वाङ्मयाच्या अभिवृद्धीइतकीच त्याच्या संशुद्धीचीहि आवश्यकता असते. आपल्या भाषेंत भेसळ नसावी आणि ती नकळत आली असल्यास तिची जाणीव सर्वांना व्हावी अशी दक्षता बाळगणें हें भाषाभिमानाचें एक गमक होय, अशा भाषाभिमानानें प्रेरित होऊन पुणें येथील 'महाराष्ट्र साहित्यमंदिर' संस्थेने गेल्या वर्षी 'प्रतिभासाधन समिति' स्थापन केली. प्रो. फडके यांच्या प्रतिभासाधन' या पुस्तकाचा, मि. क्रेटन हॅमिल्टन यांच्या 'आर्ट ऑफ फिक्शन' या पुस्तकाशीं किंपत संबंध आहे यावा, त्या समितीने लावलेला निर्णय प्रस्तुत अहवालांत, समान उताऱ्यांच्या परिशिष्टांसह, दिलेला आहे. हा निर्णय देतांना समितीने स्वतंत्र ग्रंथकर्तृत्वाची व्याख्या देऊन वाङ्मयिक ऋणाच्या मर्यादा सोदाहरण घालून दिलेल्या आहेत. त्यामुळे या अहवालाचें महत्व एका ग्रंथापुरतें व तात्कालिक राहात नसून, समितीचे चिटणीस प्रो. गो. गो. अधिकारी यांनी म्हटल्या प्रमाणें, 'मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत' त्याला एक स्वतंत्र स्थान मिळण्यासारखें आहे.

केसरी ५ डिसेंबर १९३३

**महाराष्ट्र शब्दकोश भाग २ रा** पृ. ९९० महाराष्ट्र शब्दकोशमंडळ पुणें डिसेंबर १९३३ किं. १० रु.

या विभागाच्या समाप्तीने सबंध ग्रंथाचें एकंदर एक–तृतीयांश कार्य झालें. सर्व सुशिक्षित समाजाची सक्रिय सहानुभूति मिळून अवशिष्ट कार्यही यथाक्रम संपूर्ण होईल असा भरवंसा धरण्यास हरकत नाहीं. जुन्या कोशांतील कोणताही शब्द न वगळणें, रूढ झालेल्या नवीन शब्दांचा समावेश करणें, एकाच शब्दांचे समानार्थक अशा प्रादेशिक शब्दांचा

संग्रह जमविणें, निरनिराळया व्यवसायांतील, शास्त्रांतील, कलांतील परिभाषिक शब्द जमविणें, शब्दांचा उपयोग ग्रंथातून झाला असेल अशीं अवतरणें थोडक्यांत पण समर्पक रीतीनें देणें वगैरे कामें सिद्धीस नेणें हे खरोखरच परिश्रमाचें काम आहे. दाते, कर्वे, चांदोरकर व दातार या संपादकांनीं हे कार्य कसोशीनें चालविलें आहे, याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे,

ज्ञानप्रकाश ५ जानेवारी १९३४.

**माला–वृत्त**– प्र.–शं ग. नवाथे, बी. ए ५६८ गायकवाडवाडा नारायण पेठ पुणें १९३३ किं. १० आ.

१९३३ सालीं पुणें येथील वसंत व्याख्यान मालेंत जीं सुमारे चाळीस व्याख्यानें झालीं त्यांचे अहवाल 'ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झाले. त्यांत थोडीशी भर घालून ते या पुस्तकांत दिले आहेत. वसंत-व्याख्यानमालेंतील कित्येक वक्ते सामान्यत: इतके अधिकारी व व्यासंगी असतात कीं, त्यांच्या व्याख्यानांचे महत्व सार्वकालिक असतें. या पुस्तकाकडेच नजर फेकली तरी, हिंदी लष्कराला कॅ. मोडक किंवा नाझीपक्षाला पं. कानडेशास्त्री या सारखे तज्ज्ञ लाभलेले आढळतात. बॅ. जम्नादास महेता, डॉ. बाळकृष्ण वगैरे प्रसिद्ध विद्वानांचेहि विचार या पुस्तकांत वाचावयास सांपडतात. विशेषत: बेकारी, शेतकऱ्यांची स्थिति, स्त्रियांचे हक्क, महाराष्ट्र विद्यापीठ, रंगभूमीवरील स्त्रिया इत्यादि नाना प्रकारच्या महत्वाच्या विषयांची माहिती वक्ता, अध्यक्ष व उपवक्ते अशा विविध गृहस्थांकडून स्पष्ट्या रीतीनें मांडलेली या पुस्तकांत पाहावयास सांपडते. त्यामुळे बहुश्रुत होऊं इच्छिणाऱ्या कोणाहि वाचकानें हें पुस्तक संग्रही ठेवावें. ग्रंथालयासारख्या सार्वजनिक ठिकाणीं तर 'संदर्भग्रंथ' म्हणून या पुस्तकाचा चांगला उपयोग होण्यासारखा आहे. असें पुस्तक प्रथमच प्रसिद्ध करून मालेच्या चिटणिसांनी खर्चाचा डोईजड बोजा आपल्या शिरावर घेतला आहे. तो महाराष्ट्रीय वाचकवर्गानें हलका केला तरच हा नवा उपक्रम पुढे चालू राहणें शक्य आहे. केसरी १९३३.

**शारदाश्रम वार्षिक** शके १८५५–संपादक य. खु. देशपांडे एम. ए. एलएल. बी. यवतमाळ, किंमत १॥ रु.

रा. देशपांडे शारदाश्रमाचे आधारस्तंभ असून वऱ्हाड–नागपूर प्रांतात जेवढें म्हणून वाङ्मयीन संशोधन एका सालांत झालें असेल तें प्रतिवर्षी प्रसिद्ध करून भावी इतिहासकारांना वाङ्मयनिधान बक्षीस देण्याचा त्यांच्या संकल्प व तदुद्भव हे कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे. संशोधनकार्य हें नेहमीच विविधविषयी असणार. त्यामुळे त्यांत मनोरंजक असें सामान्य वाचकांना फारसें आढळणार नाही. पण बोद्धजनांना मात्र तें कौतुकास्पद वाटतें. हा प्रथम खंड तसाच आहे. त्यांत अनेक विदर्भदेशीय पंडितांचे लेख असून विद्वानांना ते चिंतनीय आहेत. प्रत्येक प्रांतानिहाय जर असे शारदाश्रम निघून अशीं संशोधन— 'वार्षिकें' निघतील तर तीं सर्व संशोधकांना उपकारक होतील. केसरी २ जानेवारी १९३४

## धर्म व तत्वज्ञान

**आत्माराम विद्याविनोद** पृ. २५०–ले. स. कृ. फडके, पनवेल १९३३ किं. २ रु.

'ब्रम्ह सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापर:' हा अद्वैतवेदान्ताचा मूलभूत सिद्धान्त समजण्यात येतो. जग वस्तुत: खरं नसून खरं भासतें याचें कारण माया अगर भ्रम अगर खऱ्या ज्ञानाचा अभाव हें होय. खऱ्या ज्ञानाने माया दूर होतांच स्वप्नाप्रमाणे जग विलयास जातें. अज्ञा-

तवाद व मायावाद हीं मतें तत्वतः एकच आहेत. हीं मतें आधुनिक सुशिक्षित समजतात त्याप्रमाणे श्रुति, वेदान्तसूत्रें, उपनिषदें वगैरे मूलभूत ग्रंथांतील वचनांशा विरोधी नाहीत असे या ग्रंथांत प्रतिपादन केलेल आहे. विषयप्रतिपादनाच्या सोयीकरिता संवादपद्धतीचा अवलंब केला आहे. त्यामुळे विवेचन चित्ताकर्षक झालेलें आहे. केसरी १० नोव्हेंबर १९३३

श्री उपासनी वाक्सुधा पृ. ५३२ प्र. जी. आर. वकील आणि जी. जी. मराठे, साकोरी, जि. अहमदनगर जुलै १९३३ कि. १–४–०

ऋग्वेद–सभाष्य पृ. ११३३—सायनाचार्यांच्या भाष्यासह प्रथम मंडल. प्रकाशक श्री. एन. एस्. सोनटक्के, चिटणीस वैदिक संशोधन मंडळ, टिळक स्मारक मंदिर, पुणे नं. २ डिसेंबर १९३३ किंमत १२ रु.

हा ग्रंथ डोळयासमोर आल्याबरोबर लोकाश्रयावर चालणाच्या संस्थेनें छापविलेला हा ग्रंथ नसावा; निदान अशा संस्थेनें छापविला असल्यास छापखाना देशी नसावा, असे तर्क मनांत उठण्या इतकी सुंदर छपाई झालेली आहे. भव्य आकार, मनोहर टाइप, स्वच्छ चिवट कागद, साफ छपाई आणि या सर्व बाह्यांगावर ताण करणारें मजकुराचें शुद्ध अंतरंग असा मिलाफ या आवृत्तीनें साधला आहे. नवाकाळ १४ डिसेंबर १९३३.

ऋग्वेदादि भाष्यभूमिका अर्थात् वैदिक धर्मस्वरुप पृ १९८ अनुवादक—श्रीदास विद्यार्थी, संपादक—लक्ष्मण जानोजी ओघले, प्रकाशक—बॉंबे बुकडेपो, मुंबई नं. ४ नोव्हेंबर १९३३ किंमत १ रुपाया.

स्वामी दयानंदांनी ऋग्वेदादि भाष्यभूमिका या नांवाचा एक स्वतंत्र प्रबंध संस्कृत भाषेमध्यें तयार केला होता. त्याचा हिंदी तर्जुमा प्रसिद्ध आहे. परंतु मराठी भाषेंत हें पुस्तक उपलब्ध नव्हतें. सुमारें २८ वर्षामागें आर्यधर्म मासिकांतून ऋग्वेदादि भाष्याचा मराठी तर्जुमा प्रसिद्ध झाला होता, परंतु तो बहुतांशी दुर्मिळ असल्यानें आतां त्याची द्वितीयावृत्ति सुधारुन अधिक व्यवस्थित रीतानें प्रसिद्ध झाली आहे. नवाकाळ १४ डिसेंबर १९३३.

कैवल्यपुरुष खंड १ला पृ. १००—ले. व पो. एन. पी. कोटणीस, सांगली. डिसेंबर १९३३ किं. ३ रु.

श्री जीवन्मुक्त व आधुनिक तत्वज्ञ— पृ ४६८ ले. सदाशिव कृष्ण फडके वकील. पनवेल, जुलै १९३३ कि. २ रु.

आधुनिक तत्त्वज्ञान व 'जुनें' तत्त्वज्ञान यांची माहिती करून देण्याच्या उद्देशानें श्री फडके यांनीं हा ग्रंथ रचिला आहे. "जीवनमुक्ताची भूमिका त्यागांत आहे. तो त्याग जगन्मिथ्यात्व पटल्यावांचून खरा घडत नाहीं, म्हणून या ग्रंथांत जगन्मिथ्यात्व किंवा मायावाद यांवरच जास्त भर दिला आहे." आणि याच दृष्टीनें शंकराचार्यांपासून आधुनिक पिढींतील रामतीर्थ, रामकृष्ण, विवेकानंद, टागोर, अरविंद आदी सर्व तत्त्वज्ञ याबद्दल काय प्रतिपादतात याचें सुंदर आणि रसाळ असें विवेचन केलें आहे ते जिज्ञासूंस बोधप्रद होईल यांत संशय नाहीं. 'श्रद्धा आणि विचार' 'प्राचीन मायावाद' 'मायामहेश्वर दर्शनांत द्वंद्वसमन्वय' हीं प्रकरणें सरस वठलीं आहेत. साधारणतः वेदांतांवरील सर्व प्रमुख भक्तांचे विचार यांत खंडनार्थ अगर पुरस्कारार्थ ग्रथित केले आहेत; त्यामुळें अभ्यासकास एक तऱ्हेनें थोडक्यांत सर्वांचेच विचार कळून येतात

चित्रमयजगत मार्च १९३४

श्री जीवन्मुक्त स्वामीमहाराज यांचे चरित्र व शिकवण, पृ. ४८४

ले—सदाशिव कृष्ण फडके, वकील कल्याण जुलै १९३३ किं. १॥ रु.

श्री. फडके यांनी आपल्या भाविक बुद्धिनें आणि प्रेमळ भावानें स्वामीचें चरित्र आणि त्यांची शिकवण लिहून भाविक वाचकांस मेजवानीच दिली आहे. पुस्तकाची भाषा सहजसुंदर असत विषय, वर्गीकरण व मांडणी उत्तम जुळली आहे. चित्रमय जगत मार्च १९३४

**देवी चरित्र सुधा**—ले. व प्र. श्री. आनंदीबाई भावे, सागर, १९३३ किं. ३ आणे.

**धर्मशास्त्र-मंथन**—ले. व प्र. महादेव शास्त्री दिवेकर मिरज नोव्हेंबर १९३३ किं. १ रु.

या पुस्तकांत स्मृतिग्रंथप्रणित धर्मतत्वांच्या उत्क्रांतीचा इतिहास दिला असून त्याला उपोद्बलक असे अनेक उतारेही दिले आहेत. आजकालच्या धार्मिक व सनातनी आंदोलनाच्या वेळीं खरा धर्म तरी कोणता असा प्रश्न कोणाच्याही मनांत उद्भवल्याशिवाय रहात नाहीं. त्या प्रश्नाचें सविस्तर सांगोपांग व मुद्देसूद उत्तर या ग्रंथात सांपडेल. वेद कांही धर्मग्रंथ नसल्यामुळें शास्त्रीबुवांनी स्मृति, पुराण, गृह्यसूत्र, शिक्षा कल्पादि षडंगें, पुराणें, उपपुराणें इत्यादिकांचें आलोडन करुन आजच्या युगाला उपयुक्त असा हा ग्रंथ तयार केला आहे. या पुस्तकांतील 'हा धर्म कसला' व 'धर्म-तारतम्य' हीं दोन प्रकरणें विशेष विचारणीय असून सनातनी म्हणविणाऱ्या धर्मब्रुवांच्या डोळयांत अंजन घालणारीं आहत. प्रामाण्य विचार, स्पर्शास्पर्श, स्त्रिया, जातिसंस्था व जात्युत्कर्ष, चार वर्णांचे व्यवहार इत्यादि प्रकरणांतील विवेचनही सप्रमाण व मार्मिक आहे. असा अपूर्व व मौल्यवान ग्रंथ लिहिल्याबद्दल शास्त्रीबुवांचें अभिनंदन केलें पाहिजे.

चित्रमयजगत मार्च १९३४

**धर्मस्वरूपनिर्णय** पृ. ३९६—ले. पं. तर्कतीर्थ रघुनाथ शास्त्री कोकजे, प्र. परचुर पुराणिक मंडळी, माधवबाग, मुंबई १ ऑक्टोबर १९३३ किं. ३ रु.

धर्माचा इहलोकाशीं, अभ्युदयाशीं व व्यवहाराशीं कांहीं संबंध नाहीं, ही समजूत घातक आहे. धर्माचा साक्षात अभ्युदयाशीं संबंध आहे व या जगांत जो उत्कर्षसंपन्न होईल तोच परलोकांतहि उत्तम गतीला पावेल हें तत्व बुद्धीग्राह्य आहे म्हणूनच समाजप्रभव किंवा राष्ट्रप्रभव हें धर्माचे बाह्यफल असून आत्मतुष्टि ऊर्फ मनःसमाधान हें धर्माचे अभ्यंतर फळ आहे असें या ग्रंथांत लिहिलें आहे. समाजाची धारणा, त्याचें पोषण व वर्धन होईल अशा कार्यास उत्साहानें साथ करणें व तीं कार्यें स्वतः करणें यांतच खरें समाधान आहे. अर्थात धर्माच्या प्रमाणापैकी आत्मतुष्टि हें प्रमाण फारच बलवत्तर आहे. श्रुती, स्मृति व सदाचार या सर्वांपेक्षां हृदयस्थाची प्रेरणा घेऊन त्याच्या हांकेला ओ देऊन वागण्यांतच स्वतंत्रबुद्धी आहे व तोच आचार खरा धर्माचार ठरेल इत्यादि ग्रंथांतील विवेचन चांगलेंच मननीय वाटतें.

किर्लोस्कर मार्च १९३४

**भारत वर्षाचा धार्मिक इतिहास—उत्तरार्ध** पृ. ४६० ले गंगाधर रामचंद्र साने, बी. ए. बी. टी. साठे वाडा जुन्नर नोव्हेंबर १९३३ किं. २ रु.

या खंडांत 'महाराष्ट्रधर्मा'चाच प्रामुख्यानें विचार केला असून तदनुषगानें रामदासस्वामींच्या तत्वज्ञानाचें सविस्तर विवेचन करण्यांत आलें आहे. तसेंच हिंदुसमाजाची आजची परिस्थिती कशी आहे याबद्दल शेवटच्या तीन प्रकारणांत ग्रंथकर्त्यानें जें रेखाचित्र काढलें आहे, तें पहाण्यासारखें आहे. पुस्तकांत मधूनमधून पण भरपूर अवतरणें दिलीं आहेत. त्याबद्दल ग्रंथकर्त्याची बहुश्रुतता प्रत्ययास येते लेखकाची भाषा प्रवाहशील आहे; पण तिच्यांत

रसपूर्णता नाहीं. पुस्तकार्चे नांव विषयविवेचनाच्या दृष्टिनें अतिव्याप्तच वाटेंत.

चित्रमयजगत मार्च १९३४

**मध्यमुनीश्वरांची कविता** पृ. २७० वी. पी. व्हो. गुव्वी. पुणें जुलै १९३३ किं- ३ रु.

ग्रंथपरीक्षण प्रतिभा ३ आगस्ट १९३४ परीक्षक रा. रामचंद्र महादेव आठवले.

**मनोबोध आणि नवा मनु**–पृ. १०८ ल. स. कृ. फडके, पनवेल जुलै १९३३ किं. २ रु.

व्यक्तीचें मुख्य साध्य लौकिक नसून पारमार्थिक आहे. हें ध्येय सुधारणेच्या पाश्चात्या संपर्काने द्रष्टीआड होऊं लागलें आहे. या गोष्टीकडे तरुणांचें वेळींच लक्ष न वेधल्यास त्यांचे फार अनहित होईल, म्हणून ग्रंथकर्त्याने सनातन वैदिक धर्माच्या आचार-विचारांचे महत्त्व, आस्तिक्यबुद्धीची जरुरी, पारमार्थिक कल्याणाचें श्रेष्ठत्व वगैरे विषयांकडे तरुणांचें लक्ष वेधण्याचा या पुस्तकांत प्रयत्न केलेला आहे. ग्रंथकर्त्याने केलेला मनोबोध तरुणांस मार्गदर्शक झाल्यावांचून राहणार नाही.

केसरी १० नोव्हेंबर १९३३.

**महाभारत**–भाग ६ वा संपादक–पं. रामचंद्रशास्त्री किंजवडेकर, प्रकाशक शंकर नरहर जोशी, चित्रशाळा पुणें.

चित्रशाळेने महाराष्ट्रीय टीकाकार नीलकण्ठ यांच्या टीकेसहित संपूर्ण महाभारत प्रकाशित करण्याचा जो महोद्योग पार पाडला तो निःसंशय अभिनंदनीय होय.

केसरी ८ डिसेम्बर १९३३

**मायावाद आणि अजातवाद**–पृ. २६८ ले. सदाशिव कृष्ण फडके वकील, पनवेल जुलै १९३३ किं. २ रु.

ब्रम्ह सत्यं जगन्मिथ्या 'जीवो ब्रह्मैव नापरः' या सिद्धांताचें सांप्रदायिक रीतीनें व प्रश्नोत्तररूपानें श्री. फडके यांनी मंडन केलें आहे. आधुनिकांच्या दृष्टीनें घ्यावयाचे सर्व आक्षेप घेऊन, श्रुत, गीता, सूत्रें इत्यादिकांतूनही मायावादासच कशी पुष्टी मिळते यांचें विवेचन केलें आहे. सध्यांच्या पिढीची आपला धर्म आहे तरी काय ही जिज्ञासा स्पृहणीय आहे, व त्या रीतीनें अभ्यासकास, हा ग्रंथ बराचसा माहितीप्रद व वाटाड्यासारखा होइल यांत शंका नाहीं.

चित्रमयजगत् मे १९३४.

**मारुतीची स्तोत्रें** प्र. बा. ल. पाठक मोतीबाजार, मुंबई नोव्हेंबर १९३३ किं. ४ आणे.

**मीमांसा–परिभाषा**–पृ. ११४ लेखक व प्रकाशक पं. रामचंद्रशास्त्री किंजवडेकर, भुवनभारती ४०३।२, सदाशिव पेठ, पुणें नं. २ सप्टेंबरे १९३३ कीं. १॥ रु.

साहित्याचार्य के. प्रो. शिवरामपंत परांजपे यांनी प्रथम 'अर्थसंग्राहाच्य' द्वारे मीमांसाशास्त्राला महाराष्ट्रभाषाचे दालन खुलें करून दिले. त्याच दालनांत रा. किंजवडेकर यांनी आता 'मीमांसापरिभाषे' चे मराठींत भाषांतर करून भर टाकली आहे. बुद्धीची कुशाग्रता वाढविण्यास आणि शास्त्रांचें सम्यगध्ययन होण्यास मीमांसाशास्त्र जरूर असल्याने त्याच्या अध्ययनास मीमांसापरिभाषा ही उत्कृष्ट साहाय्यक होईल. संपादकांनी मराठी भाषांतराशिवाय पुस्तकाला प्रस्तावना जोडून तींत मीमांसाशास्त्राचें शास्त्रीय ग्रंथांतील स्थान, त्या शास्त्रांतील प्रमाणभूत ग्रंथ, ग्रंथांची ओझरती ओळख इत्यादि गोष्टींची सर्वसाधारण माहिती दिली आहे. पुस्तकाच्या शेवटीं पारिभाषिक शब्दसूचि व अवतरणसूचि हे दोन भाग जोडून ग्रंथकारांनी पुस्तक सुलभवाच्य व उपयुक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. केसरी ८ डीसेंबर १९३३.

राजयोग-प्रदीप—पृ. १७८ ले. श्री. आण्णासाहेब आपदेव प्र. शंकर रामचंद्र राजवाडे, अग्निहोत्र मंदिर २८६ सदाशिव पेठ किंमत ३ रु. पुणें डिसेंबर १९३३.

हिंदुधर्मातील राजयोग हा पंथ अत्यंत महत्वाचा असून त्याच्या साह्याने आत्मोन्नति कशी करतां येते हें प्रस्तुत पुस्तकांत दाखविले आहे. आण्णासाहेब एके ठिकाणीं म्हणतात 'राज योग हा विषय प्रत्यक्ष अनुभव घेणारांकरिता आहे शब्दज्ञान्यांकरिता नाही; ज्ञानेश्वरींतहि हाच राजयोग सांगितला असून त्यांचें ज्ञान परंपरेने तुकारामबुवांपर्यंत पोचलें होतें. यावरुन भागवत पंथांतहि या राजयोगाचीच बीजें आहेत असें कबूल करावें लागतें, या दृष्टीने महाराष्ट्रांतील लोकांना राजयोगाशी ओळख पटणें अत्यंत जरुर आहे. तोच उद्देश ग्रंथलेखक व प्रकाशक यांचा आहे. विषयांची फोड करण्याकरिता जरुर ते सर्व चित्रपट त्यांतील परिभाषेसुद्धा ग्रंथांत घातले असल्याने ग्रथप्रकाशनाचें काम खर्चाचें होऊन बसलें आहे. तिकडे लक्ष दिल्यास ग्रंथची तीन रुपये किंमत अधिक आहे असें कोणीं म्हणणार नाही.

केसरी २९ जून १९३४.

लो. टिळक जन्माख्यान—ले. व प्र. वासुदेव शिवराम कोल्हटकर, राष्ट्रीय कीर्तनकर ३७२ नारायण पेठ पुणें नं. २. किं. ४ आणे.

राष्ट्रीय कीर्तनकार ह. भ. प. कोल्हटकरबुवा हे स्वतः आख्यानें रचून तीं कीर्तन प्रसंगी लावीत असतात. या आख्यानासाठीं त्यांनी काढलेल्या मंदाकिनीचा हा तिसरा तरंग आहे. श्रीसमर्थ, छत्रपति शिवाजी महाराज व यांच्यानंतर त्यांनी आख्यानासाठीं लोकमान्यांचा जन्मप्रसंग निवडला हें उचितच झाले. कोल्हटकरबुवा यांची रचनापद्धति प्रसादयुक्त असते, या गोष्टीचा प्रत्यय या तरंगांत चांगल्या रीतीनें येतो. पूर्वरंगांत निष्कामकर्मयोगी कोण, सत्पुरुष कोण यांची मीमांसा उत्तम केली असून तीमुळें पुढील आख्यानाला चांगला रंग भरतो. प्रस्तुत आख्यानांत लोकमान्यांचा जन्म होण्यापूर्वी महाराष्ट्राची कशी स्थिति होती, व देशाच्या कोणत्या परिस्थितींत त्यांचा जन्म झाला यासंबंधी केलेलें विवेचन मार्मिक आहे.

केसरी १८ आगस्ट १९३३

श्रीविठ्ठलाचा कटाव—ले. व प्र. व्ही. के. आठल्ये, पुणें आक्टोबर १९३३ किं. २ आणे.

विज्ञानसागर—ले. नारायण महाराज जाळवणकर, प्र. जी. पी. मुरडेश्वर, जोगेश्वरी, आक्टोबर १९३३ किं. ८ आणे.

श्रीवेदाङ्गशिक्षा—पृ. ६० भाषांतरकार पं. शिवरामशास्त्री शिंत्रे, प्र. एस. टी. पातोडेकर मुंबई जुले १९३३ किं. ६ आणे.

वेदांतील स्वरवर्णोच्चारांचें पठन कसें करावें यांचें विवरण 'शिक्षे'त मुख्यतः केलें आहे. वेदविद्येचें आस्थेने अध्ययन करणारे प्राच्यविद्यापंडित व इतर अभ्यासु लोक रा. शिंत्रे यांच्या श्रमाचें चीज करतील अशी आशा आहे.

केसरी ८ डिसेंबर १९३३

वेदान्त परिभाषार्थ आणि वेदान्त शब्दकोश पृ. ६५७ डिसेंबर १९३३ ले. कै. आचार्यभक्त शास्त्रसुधाकर विष्णुशास्त्री बापट, आचार्यकुल पुणें. डिसेंबर १९३३ किंमत रु. ६

वेदान्त परिभाषा हा ग्रंथ धर्मराजाध्वरींद्र या तीन शतकांपूर्वीच्या ग्रंथकाराने लिहिलेला आहे. त्यांतील मुख्य विषय वेदान्तचर्चेला उपयुक्त असें जें ज्ञानप्रामाण्य त्याविषयी असून त्याच्या आठ परिच्छेदांत प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, आगम, अर्थापत्ति, अनुपलब्धि हीं प्रमाणे आणि विषय व प्रयोजन हे दुसरे दोन

विषय आहेत. बापटशास्त्री यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे या ग्रंथांत प्रथम मूळ संस्कृत देऊन नंतर त्याचा अर्थ नंतर विवरण आणि शंका व समाधान अशा क्रमाने ग्रंथ व विषय समजावून सांगितला आहे. या तील ज्ञानप्रामाण्याचा विषय वेदान्त पक्षाच्या दृष्टीने मांडलेला असून नैयायिकादि इतर दर्शनानुयायी हे आक्षेपक व प्रतिपक्षी असे दिसतात. तदापि तत्त्वतः पाहिल्यास या पक्षोपपक्षामध्ये भेद फार मोठा नसून अगदी खोल जाऊन ज्ञानप्रामाण्याची चिकित्सा करणारासच त्यांतील भेदरहस्य कळेल. वेदान्त शब्दकोशांत वेदान्तशास्त्रांत येणाऱ्या शब्दांचे पारिभाषिक अर्थ दिले असून सामान्य शब्दकोशाहून या कोशांत शब्दार्थविवरण विशेष अधिक आहे.

केसरी १६ मार्च १९३४

**श्री सोहिरोबानाथ कवितासंग्रह** पृ. २१६—प्रकाशक श्री. वैजनाथ शिवराम देशकुलकर्णी उर्फ राजाध्यक्ष, सरस्वतीबाग जोगेश्वरी, जुलै १९३३ किं. २॥ रु.

श्री सोहिरोबानाथ हे वैराग्यशील व तपस्वी कविराज होते, ‘ हरि भजनावीण काळ घालवूं नकोरे ’ हें त्यांचें पद सर्व भक्तिमार्गी लोकांना परिचयाचें व प्रिय आहे. त्यांचा चरित्रपरिचय व त्यांचा साडेपांचशेंवरील पदांचा संग्रह या पुस्तकांत एकत्र छापण्यांत आला आहे. श्री सोहिरोबानाथ, त्यांची समाधि, टाकी महाराज, श्रीसोहिरोबांचें ग्रंथलेखन, पादुका व चौरंग त्यांच्या वंशजांचें राहतें घर, महादजी शिंदे, जीवबादादा बक्षी इत्यादींचें फोटो देऊन पुस्तक आकर्षकहि करण्यांत आलें आहे.

नवाकाळ २३ नोव्हेंबर १९३३.

**हिंदुधर्मदीपिका**—पृ. ५९६—ले. ऋग्वेदी. शुभाषो निवास, [illegible] प्र.—[illegible]. प्रभा आणि कंपनी गिरगांव, मुंबई डिसेंबर १९३३ किं. २॥ रु.

या ग्रंथांत थेट वेदकालापासून तों तहत आजतागाइतपर्यंतचा हिंदुधर्माचा सांगोपांग व सविस्तर इतिहास दिला आहे. श्रुति, स्मृति, उपनिषदें, रामायण, भारत इत्यादि ग्रंथांतील प्रमुख विषयांची यांत माहिती दिली असून शांकर, रामानुज, जैन, बुद्ध इत्यादि धर्मपंथ व संप्रदाय यांच्या धर्मतत्वांचें विवेचन केलें आहे. तसेंच अलीकडील आर्यसमाज, ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज इत्यादि सामुदायिक पथाचीं तत्वेंही यांत दिलीं आहेत. ‘ज्ञान, कर्म व उपासनामार्ग’ हें प्रकरण तर सबंध ग्रंथाचें सार आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हें प्रकरण विशेष वाचनीय व मननीय झालें आहे. हिंदुधर्माविषयींचें सारसर्वस्व या ग्रंथांत आलें असल्यामुळें त्याला ‘संक्षिप्त धर्मकोश’ असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रत्येक हिंदुधर्मीयानें हा कोशग्रंथ आपल्या संग्रहीं अवश्य ठेवावा.

चित्रमयजगत मार्च १९३४.

## ज्योतिष व पदार्थविज्ञान.

**नाक्षत्र रहस्य** पृ. १३६ ले. एम. एम. हुंडेकरी, प्र. व्ही. जी. भागवत, पुणें. जुलै १९३३ किं. रु. १—८—०.

**पंचाग कसें पहावें ?**—ले. सदाशिवसुत प्र. कबरे आणि कं. मुंबई नं. ७ किं. ४ आणे.

माहिती व्यवस्थित व उपयुक्त होइल अशी दिली आहे.

चित्रमयजगत अक्टोबर १९३३.

**प्रकाश** पृ. ७१ ले. रा. ग. श्री. वैद्य, प्र. चित्रशाळा पुणे डिसेंबर १९३३ किं. ४ आणे.

प्रकाश या विषयावर लेखकांनीं लिहिलेले कित्येक लेख शालापत्रकाच्या अंकांतून प्रसिद्ध झाले होते. त्यांतच दोन तीन लेखांची भर

घालून प्रस्तुत पुस्तकाची सिद्धता करण्यांत आली आहे. पुस्तक सुबोध रीतीनें लिहिण्यांत आलें असून तें व्हर्नाक्युलर फायनल परीक्षेची तयारी करण्याऱ्या विद्यार्थ्यांस किंवा ज्यांचें शिक्षण इंग्रेजी दोन तीन इयत्ता झालेलें आहे अशा विद्यार्थ्यांस समजण्याजोगें झालें आहे.

ज्ञानप्रकाश २ फेब्रुवारी. १९३४.

विद्युत पृ. २५६ ले. प्रो. ना. का. आपटे. प्र. दामोदर सावळाराम आणि मंडळी, ठाकुरद्वार, मुंबई डिसेंबर १९३३ किं. १-८-०

पुस्तकांत दिलेली माहिती ' महाराष्ट्र वाङमय मंडळानें तयार करून दिलेल्या पारिभाषिक शद्बानिशी दिली आहे. आतांपर्यंत मराठी भाषेंत शास्त्रीय ग्रंथ फारसे झाले नाहीत त्यामुळें शास्त्रीय परिभाषेला प्रतिशब्द बनविण्याचे काम अवघड आहे हें खरेंच पण असा तऱ्हेचा प्रयत्न स्वभाषेच्या अभिमानी दृष्टीनें पाहिल्यास कितीही स्तुत्य ठरला तरी एकंदरीनें पहातां परिभाषिक शब्द जवळ जवळ सर्व युरोपियन भाषांतून सारखेच असल्यामुळें त्या त्या विद्यार्थ्यांचें नुकसान होत नाहीं व त्याच पारिभाषिक शब्दासह प्रत्येक भाषेंतून शास्त्रीय विषय सर्वत्र शिकविले जात असतांना मराठी भाषाभिमान्यांनीं परिभाषिक शब्दसुद्धां मराठी बनविण्याचा अट्टाहास कां करावा हे समजत नाहीं. ह्या पुस्तकांतील भाग फार झालें तर कॉलेजच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना जेमतेम उपयोगी पडू शकेल. पण त्याचापुढें अभ्यासक्रम चालू ठेवणारांना पुस्तकांत असलेल्या माहितीपेक्षां कितीतरी पट अधिक माहितीची जरूरी लागते. म्हणून एकंदरीनें पहातां, यापुढे श्री सयाजी साहित्य मालेनें शास्त्रीय ग्रंथाची भाषांतरें अवश्य करून घ्यावी, पण पारिभाषिक शब्द जसेच्या तसे ठेवावें व भाषांतराकरतां निवडलेलीं पुस्तकें आजतागायत झालेल्या घडामोडी ज्यांत वर्णन केल्या आहेत अशीं असावी, अशी आमची त्यांना सूचना आहे.

प्रस्तुत पुस्तकांत पारिभाषिक शद्बावडंबर सोडून दिल्यास इतर भाषा सोपी असून कळण्यास सोपी जाते हें भाषांतर कर्त्यास भूषणावह आहे.

सकाळ ६ जानेवारी १९३४

## आरोग्य व वैद्यक

**आरोग्यप्रदीप**--ले. श्रीधर नारायण हुद्दार, अभिनव कार्यालय नागपूर १९३३ किं. १२ आणे.

दररोजच्या आयुष्यक्रमांत हरघडी उपयोगी पडणाच्या आरोग्यविषयक सुचनांचा हा संग्रह प्रत्येक कुटुंबाला आरोग्य-मित्राप्रमाणें वाटल्यावांचून रहाणार नाहीं. दिनचर्या, व्यायाम, हवापाणी, अन्न, विहारविलास, इत्यादि विषयांबरोबरच मानवी शरीराचीही माहिती दिली आहे. पुस्तकाचें स्वरूप टांचण–टिपणवजा असलें तरी त्यांत शास्त्रोक्त व महत्वाची माहिती आल्यामुळें बहुजनसमाजाला तें निरंतर जवळ ठेवावेसें वाटेल.

चित्रमयजगत् मे. १९३४.

**आरोग्याचा मार्ग**—ले. व प्र. रा. ज. घाटेकर, देऊळगांव राजा. १९३३ किं. ४ आणे.

**कोरफडीचा उपयोग**—पृ. ३५ ले. प्रभाकर बाळाजी ओगले, मु. ओगलेवाडी, सं. औंध, जी. सातारा. १९३३ किं. ३ आणे.

श्री प्रभाकरपंत ओगले यांनी आपल्या दीर्घ अनुभवाचा व अभ्यासाचा नीष्कर्ष म्हणून आयुर्वेद व देशी वनस्पति यांच्यासंबंधी लहान पुस्तकें लीहीण्याचा उपक्रम केला आहे. त्या पैकींच वरील छोटेखानी पुस्तक आहे. कोरफडीची यांत सांगोपांग माहिती दीली असून

कोणत्या कोणत्या रोगांवर या वनस्पतीचा उपयोग होतो हे साध्या भाषेत सांगितले आहे. महाराष्ट्रांत करफड सर्व खेडयांत होते. तिचा उपयोग केल्यास जनतेचा मोठाच फायदा होऊन आरोग्याचें संरक्षण करतां येईल.

केसरी १६ फेब्रुवारी १९३४

रुग्ण गृहपरिचर्या ले. व प्र.—श्री. मुकुन्द रामचंद्र लाड, ११ तारा टेम्पल लेन, लॅमिंग्टन रोड, मुंबई नं. ७, किं. रु. १।

शास्त्रीय ज्ञान नसलेल्या माणसाला सहज समजेल अशा बालबोध रीतीनें या पुस्तकांत विवेचन करण्यांत आलें आहे. एकंदर २० प्रकरणांत रुग्ण परिचर्येची सर्व माहिती देण्यांत आली आहे. रोग्याची खोली अन्न, पेय, वस्त्र, औषधें, रोगाच्या विकाराचें निरीक्षण, स्नान, बाह्योपचार, शस्त्रक्रियेपूर्वीचीं व नंतरचीं कर्तव्यें, पट्टबंधनें वगैरे विषयाची व्यावहारिक मांडणी करण्यांत आली आहे. फर्स्ट एडचा अभ्यास करणाऱ्यांना हें पुस्तक उपयुक्त तर आहेच परंतु इतरांनीहि—स्त्रीपुरुषांनी—ह्या पुस्तकांतील ज्ञान संपादन करणें उचित आहे. नवाकाळ ५ आक्टोबर १९३३.

रोगनिदान—नाडीपरिक्षा पृ. १८८ ले. व प्र. वैद्यरत्न वासुदेवशास्त्री कडेगांवकर आयुर्वेदभुवन—सातारा सप्टेंबर १९३३ किं १ रु.

या जोड भागांत इंग्रजी वैद्यकांतील निदान पंचक, रोगपरिक्षेचा आरंभ इतक्या गोष्टी आल्या आहेत. ज्ञानप्रकाश २ फेब्रुवारी १९३४.

विषमज्वर व त्याची शुश्रूषा पृ. १८ ले. व प्र. डॉ. पी व्ह. कळे, नाशिक, आगस्ट १९३३ किं. ४ आणे.

सिद्धौषधि प्रकाश—पृ. ३४४ ले. वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी. प्र. डी. व्ही. शेंके पुणें. नोव्हेंबर १९३३ किं. २॥ रु.

आजपर्यंत मराठींत वैद्यकांवर अनेक पुस्तकें झालीं. पण कोठं अनुभवाचा अभाव, तर कोठें विद्वत्तेचा अभाव, कोठें ग्रंथ दुर्बोध करण्याकडे प्रवृत्ति तर कोठें विपर्यस्त माहिती असा प्रकार असे. या ग्रंथांत वरील दोष नाहींतच; पण अनेक गुण आहेत म्हणून हा ग्रंथ अप्रतिम वाटतो. रोगाचा उद्भव, वाढ व नाश यांची दिलेली माहिती इतकी बिनचूक आहे कीं, कोणालाहि त्याचा पडताळा पहातां येईल. रोगांवर दिलेले उपचार हे स्वानुभवाचे आहेत व ते वेचक आहेत. औषध रोग्याचे कोणते अवस्थेंत द्यावें व त्याचा उपयोग किती मर्यादेपर्यंत होतो, याचा स्पष्ट खुलासा हें या ग्रंथाचें वैशिष्ट्य आहे. प्रत्येक रोगांत रहाणी कशी असावी, पथ्य कोणतें पाळावें वगैरे सूचना दिल्यामुळे निसर्गोपचाराची वैद्यशास्त्राला जोड दिली असें वाटते, या पुस्तकांत २०० वर रोगांची माहिती उपचारांसह दिली आहे. हें पुस्तक जवळ ठेवल्यास स्वतःला स्वतःवर उपचार करणे सोपें जाईल व पैसे वाचतील अभ्यासू, संशोधक, धंदेवाईक वैद्य व सामान्य मनुष्य या तिघांनाहि उपयुक्त वाटणारा असा हा ग्रंथ आहे. चित्रमयजगत जानेवार १९३४ पुस्तक परीक्षण विविधवृत्त १ एप्रिल १९३४

आठ मिनिटें—पृ. ३८ ले. मा. का. दामले गिरगांव ट्रामटर्मिनस, मुंबई ४ डिसंबर १९३३ किं. १० आणे.

या पुस्तकांत व्यायामप्रकार व ते करण्याच्या निरनिराळ्या पद्धति यांची माहिती स्वानुभववरून सचित्र देण्यांत आली आहे. सर्वसामान्य माणसासाठीं लेखकाने आठ मिनिटांचा व्यायाम सांगितला असून कोणता व्यायाम किती मिनिटांत करावा तेंहि दर्शविलें आहे. त्याशिवाय विलायती दंड, शीर्षासन प्राणायाम, जोर, बेठका हे व्यायाम कसे करावे

हें सोपपत्तिक रीत्या विशद करून सांगितलें आहे. व्यायामाची महती निराळ्या शब्दांनी सांगण्याची गरज नाही. ती महती व्यायाम नियमितपणें करून आपलें शरीर तेजःपुंज आणि घट्टेंकट्टें बनवूनच पटवावयाची असते. रा दामलें यांनी इतक्या लहान वयांत नियमित व्यायामाने पीळदार शरीर बनवून आपल्या तरुण मित्रांना स्वानुभवाचा संदेश दिला हें त्यांना भूषण आहे. केसरी ८ डिसेंबर १९३३

**वृद्धांकरिता व्यायाम**–पृ ७६ ले. म. ग. गोरे. प्र. शं. न. जोशी, चित्रशाळा प्रेस १०२६ सदाशिव पुणें सप्टेंबर १९३३ किं. ५ आ.

एका इंग्रजी पुस्तकांतील सुमारें पंचवीस व्यायाम या पुस्तकांत आकृतीसह दिले आहेत त्यांपैकीं बहुतेक व्यायाम पोटाचे असून घरीं सुखाने करतां येण्यासारखे आहेत. त्यांचा अवलंब केल्याने वृद्ध लोकांचा औषधांचा खर्च बराच वांचेल यांत शंका नाही. मात्र यांही प्रसंगीं औषध घ्यावें असें लेखकाचें मत आहे लेखकाने स्वतः या व्यायामाचा आधी अनुभव घेऊन 'मग सांगितलें' अशा स्वरूपाचें हें पुस्तक असल्यामुळे तें वृद्ध लोकांना उपयुक्त ठरेल असें वाटतें.

केसरी १० नोव्हेंबर १९३३.

**शारीरिक शिक्षणपद्धति**–प्र. रा. वि. परुळेकर, सेक्रेटरी, स्कूल्स कमिटी, ग्रँटरोड, मुंबई ७. किं. १ रु.

मुंबईच्या स्कूल्स कमिटीने अनेक तज्ज्ञांचे लहान मुलांच्या व्यायामाबद्दल अभिप्राय मागवून त्यांच्या आधारें प्रस्तुत पुस्तक प्रकाशित केलें आहे. व्यायामाला मोकळी हवा आणि खुली जागा भरपूर पाहिजे. परन्तु मुंबईसारख्या बकाल वस्तीच्या शहरांत त्या दोनहि आवश्यक गोष्टींची उणीव तीव्रतेने भासते. ही अडचण लक्षांत घेऊनच स्कूल्स कमिटीने विद्यार्थ्यांना शाळेच्या मोठ्या खोलींत खेळतां येतील असेच व्यायाम पुस्तकांत दिले आहेत. विद्यार्थ्यांच्या वयोमानाप्रमाणेंच व्यायामप्रकारांची विभागणी करण्यांत आली आहे. ५ ते ८ वर्षे वयाचीं मुलें व ८ ते ११ वर्षे वयाचीं मुलें यांसाठी निरनिराळे व्यायाम सांगितले आहेत. एकंदर व्यायामप्रकारांची संख्या दीडशेंवर असून त्यांतील कांहींचीं चित्रें देण्यांत आली आहेत. लहान मुलांचीं मनें रमून त्यांना व्यायामाची चटक लागेल असेच हे सर्व व्यायाम नाविन्यपूर्ण आहेत. मुंबईबाहेरील इतर शहरांतील प्राथमिक शाळांनी सदर पुस्तकाचा उपयोग केल्यास विद्यार्थ्यांना बलोपार्जनाचें एक खाद्य पुरविल्याचें श्रेय त्यांना लाभणार आहे.

केसरी ८ डिसेंबर १९३३.

**सूर्यनमस्कार (सचित्र)** पृ. ३२ ले. श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी संस्थान औंध. प्र. चित्रशाळा प्रेस, पुणें सप्टेंबर १९३३ किंमत ४ आणे.

श्रीमत बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी १९२८ सालीं 'चित्रमय जगत'मध्ये सूर्यनमस्कार या विषयावर जो एक लेख प्रसिद्ध केला होता त्याचेंच पुनर्मुद्रण करून पुस्तकरूपाने प्रकाशकांनी प्रसिद्ध केलें आहे. त्याचा हेतू असा कीं, सूर्यनमस्कार घालण्याची आवड व उपयुक्तता तरुण पिढीला कळावी. कोणत्या वयाच्या माणसाने किती नमस्कार घालवे, ते शास्त्रोक्त पद्धतीने कसें घालावे याचें सोप्या शब्दांत आकृतीसह विवेचन केलें आहे. स्त्रियांनी नमस्कार किती घालावेत हेंहि यांत सांगितलें आहे. शेवटीं खाद्य व पेय पदार्थांत गुणदोष काय असतात याचें प्रमाण कोष्टकरूपाने दिलें आहे. पुस्तक उपयुक्त व संग्रहणीय आहे.

केसरी १७ अक्टोबर १९३३

## समाजशास्त्र

अंधः श्रद्धा पृ, ६८ ले. एन. व्ही. भावे, प्र. एस. बी. पटवर्धन, कल्याण, आगस्ट १९३३ किं. १ आणा.

अस्पृश्यता निवारण विषयक संवाद.

अस्पृष्टांचा प्रश्न. पृ. ६३४ ले. श्री. म. माटे. प्र. शं. रा. दाते, पुणे, आक्टोबर १९३३ किं. २ रु.

श्री. माटे यांनी या पुस्तकांत त्या प्रश्नासंबधी दिलेली माहिती परिपूर्ण आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. या पुस्तकांत विनोद आहे; आंकडे आहत, आराखडे आहेत. या पुस्तकांत अस्पृश्यांच्या बाबतींत चोहो दृष्टिनें विचारपूर्वक व परिश्रमपूर्वक गोळा केलेली माहिती आहे, माटे यांना त्याबाबतींत आलेला अनुभवहि या पुस्तकांत आपणांस वाचावयास सांपडतो, अस्पृश्यता निवारक मंण्डळानें गेल्या दीड तपात जी उत्कृष्ट कामगिरी केली. व अस्पृश्यांचा प्रश्न सोडवण्याचा जो यशस्वी प्रयत्न केला त्या संबंधाशी माहितीहि या पुस्तकांत दिलेली असल्याकारणानें अस्पृश्यता निवारणाचें काम करूं इच्छिणाऱ्यांना हें पस्तक सर्व दृष्टीनें अत्यंत उपयोगी पडण्यासारखें आहे.

नवाकाळ ३१ आक्टोबर १९३३

आत्महत्या त्यांचा प्रसार व प्रतिकार. ले. व प्र. रा. न. ल. आठवले ४५ बुधवार पुणें शहर किं. ८ आणे,

रा. आठवले यांनी या संबंधाची मीमांसा चांगल्या रीतीनें केली आहे. अलीकडे परिक्षा नापास झाल्यामुळें आत्महत्या केलेल्यांचीं उदाहरणेंही ऐकू येतात. ही आपत्ति टाळावी कशी, यांचेंही पुस्तककर्त्यांनी सर्वसामान्य विवेचन केलें असून शेवटी सर्वांगीण शिक्षण या मथळ्या खालीं उपयुक्त त्यांनी बहा कलमें दिली आहेत. ज्ञानप्रकाश ११ डिसेंबर १९३३

कुलीन स्त्रिया–रंगभूमि आणि बोलपटः पृ. ६२ ले. बापू सोनबा आहेर, प्र. ए. पी. बापट बुकसेलर, पुणें सप्टेंबर १९३३ कि. ६ आणे

शील व चारित्र्य यांचें संरक्षण करण्यासाठीं कुलीन स्त्रियांनी रंगभूमीवर पदार्पण करूं नये, हें या छोटया निबंधांत प्रतिपादन करण्यांत आललें आहे. यांत बराच पाल्हाळ असला तरी, या विषयाची एक बाजू लेखकांनें जोरदारपणें मांडली आहे चित्रमयजगत डिसेंबर १९३३

क्रांतीचें रणशिंग–ले. के. दिनकरराव जवळकर व बाबुराव भोंसले. प्रकाशक–बाबुराव भोंसले, सर्कल नं. ६ नागपूर १९३३ किं. १२ आणे.

यांत हिंदी शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेची कारणमिमांसा फारच कळकळीनें केली आहे. युरोपियन राष्ट्रांच्या सैन्यबळाची यांत विस्तारपूर्वक माहिती दिली असून महायुद्धासारखी युद्धें राष्ट्राराष्ट्रांत कां होतात, याची मार्मिक चिकित्सा केली आहे. महायुद्धाला हिंदुस्थानानें ५॥ लाख लोक पुरविल्यामुळें इग्रजांना हिंदुस्थान म्हणजे आपला एक साधाभोळा मूर्ख मित्र आहे असें वाटणें कसें साहजिक आहे, हें कै. जवळकरांनीं या पुस्तकांत सुंदर रितीनें दाखवन दिलें आहे. "बोकेसनयर्शाचा निःशस्त्र कर्मयोग" "बगळयाचा शांतिपाठ" शेतकऱ्याचे हिंदुस्थान वगैरे प्रकरणें उद्बोधक आणि माहितीपूर्ण आहेत.

वसुंधरा ३१ मार्च १९३४

ग्रामपंचायत ले. प्रो. द. ब. गोडबोले व श्री. द. ह. चौधरी प्र. लो, टिळक स्मारक आरोग्यसंघ, पुणे, डिसेंबर १९३३ किं ८ आणे.

ग्रामसंघटने चें महत्त्व हल्ली लोकांच्या विशेष रीतनें ध्यानांत येऊं लागलें आहे. त्याचप्रमाणें ग्रामपंचायतीच्या कायद्याची अम-

रामजी शिंदे यांच्यासारख्या अधिकारी व्यक्तीनें हातीं घेऊन तें पार पाडलें आहे. अस्पृतेचा उगम कसा झाला, प्रांतानिहाय तिचें स्वरुप कसकसें भीषण होतें, सध्याचें तिचें स्वरूप काय आहे, इत्यादि विवेचन हिंदुस्तानाचा सर्व भाग व ब्रह्मदेश यांमध्यें जातीनें हिंडून तेथें मिळविलेल्या अनुभवांवरून केलेलें असल्यानें तें सरस अर्थात परिणामकारकहि झालें आहे. अस्पृश्यतानिवारणाच्या कामीं हें पुस्तक अत्यंत उपयागी ठरेल यांत शंका नाहीं. किर्लोस्कर पुस्तक परिक्षण ज्ञानप्रकाश ६ आक्टोवर १९३३

**शाळा व आरोग्य**–पृ. २५२ व. प्र. ले. श्री. गो. रा. माटे एम. बी. टी. श्रीराम मंदीर शनिवार पेठ, सातारा डिसेंबर १९३३ किं. १॥ रु.

शैक्षणिक प्रश्नांचें सांगोपांग विवरण करणारीं पुस्तकें मराठी वाङमयांत फार थोडीं आहेत. अध्यापनकलेची तंत्रदृष्टया चर्चा करणारीं पुस्तकें सुद्धां अत्यल्प आहत. मग शालेय महत्त्वाच्या अवांतर बाबींचा समाज शास्त्राच्या दृष्टीनें विचार करणारे ग्रंथ अगदींच दुर्मिळ असावेत यांत नवल नाहीं. या पुस्तकांत मात्र श्री. माटे यांनी अध्यापनाव्यतिरिक्त अवांतर महत्त्वांचे अनेक शालेय प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. मुलांच्या आरोग्यवर्धनाच्या दृष्टीनें शाळांची रचना कशी असावी, अध्यापकांनीं विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे कोणकोणत्या दृष्टिनें पहावें, व तें अबाधित राखण्याकरितां कशी व किती प्रकारांनी काळजी घ्यावी इत्यादी बाबींचा या पुस्तकांत श्री. माटे यांनीं सशास्त्र ऊहापोह केला आहे. वर्गाच्या रचनेंबाबत लेखकानें दिलेली माहिती व मुलांच्या आरोग्याबाबत केलेल्या सूचना मननीय आहेत. प्रत्येक शाळेनें या उपयुक्त पुस्तकाची एक प्रत आपल्या संग्रही ठेवावी.

वऱ्हाडशालापत्रक एप्रील १९३४

**सुधारणा : उद्भव व उपाय**–पृ ६९ ले. रा. सा. म. वि. काथवटे, पेन्शनर सबजज्ज वाई. सप्टेंबर १९३३ किं. ८ आणे.

हें लहानसें पुस्तक प्रसिद्ध लेखक एडवर्ड कार्पेंटर ह्यांच्या पुस्तकांतील कांही भागांचें भाषांतर आहे. आधुनिक सुधारणा ही खरोखरच सुधारणा आहे किंवा समाजाला जडलेला एक रोग आहे ह्या प्रश्नाविषयी विद्वानांत निरनिराळीं मते दृष्टीस पडतात. कार्पेंटरचें मत सुधारणा हा एक रोग आहे असें आहे. ह्या रोगापासून ज्या जाति अलिप्त आहेत त्या आरोग्याच्या दृष्टीने तरी निदान सुधारलेल्या माणसापेक्षा अधिक श्रेष्ट आहेत. एडवर्ड कार्पेंटरचें हे प्रतिपादन जरी एकांगी असलें तरी त्यांत विचारणीय अशा बऱ्याच गोष्टी आहेत. पण कार्पेंटरपेक्षाहि ग्रंथकर्त्यानें खरी सुधारणा ही हिंदुधर्माच्या मागोमागच कशी आली पाहिजे ह्याचें जें थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे तें विद्वमान्य होइल यांत शंका नाही.

केसरी २ जानेवारी १९३४

एडवर्ड कार्पेंटर यांच्या सामाजिक विषयावरील कादंबऱ्या सुप्रसिद्ध आहेत. नवीन सुधारणेबद्दल सुधारणेच्या शिखरावर जाऊन पोहोचलेल्या देशांत सुद्धां किती प्रतिकूल मत झाले आहे याची कल्पना या पुस्तकावरून होऊ शकते. पुस्तकामध्यें शारिरिक अथवा मानसिक आरोग्य अद्वैतभाव, स्वाभाविक जीवलक्रम, खरी सुधारणा म्हणजे काय ? इत्यादि विषयांची योग्य चर्चा करण्यांत आली आहे.

विषय प्रतिपादन करण्याची व मांडणाची शैली–प्रत्यंतर दाखवून एखादी गोष्ट

पटवून देण्याची कुशलता व सोपी भाषा यामुळें सदर पुस्तक हे एखाद्या इंग्रजी पुस्तकाचे रूपांतर असेल अशी शंका देखील येत नाहीं सुधारणेची आवश्यकता व महत्व पटवून देणारी व खरी सुधारणा ही आध्यात्मीक व भौतिक प्रगतींत साठविलेली आहे हें सांगणारीं अजपर्यंत बरीच पुस्तकें लिहली गेली त्यामध्यें या पुस्तकाचा नंबर बराच वर लागेल यात शंका नाही. पुस्तक वाचनीय आहे.

भा. श डांगे. सकाळ १६ डिसेंबर १९३४

**सुलभ इन्कमटॅक्स**—ले. गं. ज. घाटे, प्र. दिगंबर मारोतराव धुमाळ, सी. पी. गव्हर्नमेंट पब्लिकेशन्स, नागपूर १९३३ किं. १२ आणे

प्रस्तुत पुस्तकांत श्री घाटे यानीं प्राप्तीवरील कराचें स्वरूप आणि त्याच्या मर्यादा विशद केलेल्या असून, सुपर टॅक्स वगैरे त्याच्या इतर प्रकारांचेंहि चांगलें विवेचन केले आहे. त्याच प्रमाणे हा कर न देणारांना होण्याच्या शिक्षेचे कायदे व इतरहि सारी आनुषंगिक माहिती त्यांनीं व्यवस्थित रीतीने या पुस्तकांत दिली आहे. सावकार, व्यापारी, पगारदार वगैरे धनिक वर्गास हे पुस्तक उपयुक्त आहे.

महाराष्ट्र ६ मे १९३४

**हिंदमाता-मंदिर**—पृ. ४८ ले. ग. ना कानिटकर, ३८१ सदाशिव पुणे २. आक्टोबर १९३३. किं. ४ आणे.

श्री. बाळूकाका कानिटकर यांनी आपली ग्रामसुधारणेची योजना या पुस्तकांत मांडली आहे. तिचा खेडोपाडींहि प्रसार व्हावा म्हणून त्यांनी संवादाचे किंवा गोष्टीचे स्वरुप देऊन विषयाच्या प्रतिपादनांत जिवंतपणा व सोपेपणा हे गुण आणलेले आहेत. योजनेतील बीज असें आहे कीं, प्रत्येक खेडे हे अन्न, वस्त्र, शिक्षण, आरोग्य, न्याय, शांतता व परचक्रनिवारण या सात अंगांनी संपूर्ण बनले पाहिजे. तसे होण्यासाठी, सामुदायिक शेती, सहकारी पेढी, खादीची निपज, शाळा, दवाखाना, तालीमखाना, स्वयंसेवादल, पंचायत इत्यादी संस्थापना करावी असा उपाय लेखकाने सुचविला आहे. आणि हें कार्य ' हिंदमातामंदिराने ' अंगावर घ्यावे असे त्यांचे मत आहे. योजनेची कल्पना स्पष्टपणे यावी म्हणून तिचा तपशील नकाशासह दिलेला आहे. त्यांत दरसाल तीन हजार रुपयांची जमा ' वस्त्रस्वावलंबन-कार्यालय ' वगैरेकडून होईल असा हिशेब घातलेला आहे तो व इतर अटकळी हि व्यवहारांत कशा कितपत उतरतांत यांचा अनुभव घेतला जाणे इष्ट आहे. श्री. बाळूकाका यांनी खेडेगांवांत राहून-हिंडून शेकडों व्याख्याने दिलेली असल्यामुळे त्यांच्या मताला अनुभवाचा आधार आहे आणि कळकळीच्या उमाळीमुळे त्यांचे मतप्रतिपादन एखाद्या धबधब्याप्रमाणे, वेगवान व जोरदार झालेले आहे.

केसरी ८ डिसेंबर १९३३

## शेतकी व गोरक्षण

**गोपतिसंप्रदाय**—पृ. ८८ डॉ. स. का. आपटे, बी. एम, बी. बा. एम. ६०७ दक्षिण कसबा सोलापूर, आक्टोबर १९३३ किं. ८ आणे

अमेरिकेतील एका गोवर्धनसंस्थेने प्रसिद्ध केलेल्या ' दी पाथ ऑफ गोपतीज् ' या पुस्तकाचे हे मराठी भषांतर आहे. मूळ पुस्तक माहितीपूर्ण असून मनोरंजक पध्दतीने लिहिलें आहे. गाईच्या दुधाचे केवढे महत्व आहे. हें यांत विस्तारपूर्वक दर्शविण्यांत आले आहे. गाईच्या दुधाला इहलोकीचे अमृत कां म्हणतात, ते या पुस्तकांत वाचावयाला सांपडेल.

चित्रमयजगत डिसेंबर १९३३

शेतकरी—पृ. ४० ले. लालजी पेंडसे. प्र. व्ही. बी. कर्णिक, श्रमजीवि साहित्यसंघ, गिरगांव, मुंबइ नं. ४ अगष्ट १९३३ किं. २ आणे.

या चिमुकल्या पुस्तकांत श्री. लालजी पेंडसे यांनी शेतकरी वर्गाचा आतापर्यंतचा इतिहास, त्यांची सद्यःस्थिति व त्यांचें भविष्य यांविषयीं घोटक पण तर्कशुद्ध माहिती दिली आहे वैनतेय १९ नोव्हेंबर १९३३

## उपयुक्त व ललितकला.

अभिनयकला—ले. ग. दा. बा. मिरजकर प्र. डी. एन. मोघे स्कुल ॲन्ड कॉलेज बुक स्टॉल कोल्हापूर किं. १२ आणे.

अभिनयकलेचें रहस्य आणि रूपरेखा नटांच्या लक्ष्यांत यावी या हेतूनेच प्रस्तुत पुस्तक लिहिण्यांत आलें आहे. यांतील माहिती दिसण्यांत जरी अगदी प्राथमिक स्वरूपाची असली तरी नटांच्या दृष्टीनें ती निःसंशय महत्वाची आहे. प्रेमसंधान व घनश्याम या मथळ्याखालीं निरनिराळया रसांचे व आविर्भावाचे द्योतक असे नमुन्यादाखल दोन प्रवेशही शेवटीं दिले आहेत. निरनिराळया भावना मुखावर कशा दाखवाव्यात हें विशद करण्याकरितां कांहीं फोटोही पुस्तकांत दिले आहेत.

ज्ञानप्रकाश २५ जानेवारी १९३४

आजचे प्रसिद्ध गायक—पृ. १२० ले. 'एकलव्य' प्र. मो. ग. रांगणेकर, 'साहित्य-मन्वंतर' गिरगांव, मुंबइ डिसेंबर १९३३, किं १२ आणे.

एखाद्या गायक-गायिकेसंबंधानें, मत प्रदर्शित करतांना परीक्षकानें गायनशास्त्रांतील कोणकोणतीं गमकें लक्षांत ठेवलीं पाहिजेत याची स्पष्ट कल्पना वाचकांना या पुस्तकावरून येणार आहे. सुप्रसिद्ध गायक-गायिकांच्या पात्रांशीं परिचय करुन देतांना संगीत विद्येबद्दल नामांकित गणलेल्या घराण्याचीही माहिती वाचकांना व्हावी अशी यांत योजना केली आहे आणि पुस्तकाच्या विशेष हा कीं त्यांतील माहितीस मनोरंजकतेचीही जोड मिळाली आहे. शब्दचित्रें या दृष्टीनेंही यांतील लेख वाचनीय आहेत. मंजीखां, अब्दुल करीमखां व नारायणराव व्यास हे तीन गायक, सौ. हिराबाई बडोदेकर, बाई सुंदराबाई, व बाई केसरबाई या तीन गायिका, व बालगंधर्व, मा. कृष्णराव, व्यं. ब. पढारकर, सवाई गंधर्व व. मा. दीनानाथ हे पांच नटगायक यांचें वर्णन या पुस्तकांत देण्यांत आलें आहे. या व्यक्तींची निरनिराळया दृष्टीनीं आज जी कीर्ति गाण्यांत येते तिचें रहस्य काय आहे हें समजण्याची इच्छा असेल त्यांना हें पुस्तक निःसंशय संग्राह्य असें झालें आहे. आपल्या इकडे वकील, डॉक्टर, इंजिनियर वगैरे पेशांच्या मानानें चितारी, गायक नट वगैरे कलोपासकांचा दर्जा तितकासा सन्मान्य समजण्यांत येत नाहीं. यासंबंधांत पूर्वीच्या मानानें समजाचा दृष्टिकोण बदलत चालला असला, तरी अद्यापि वरील कलांचा व्यवसाय करणारांचा दर्जा समाजांत दुय्यम किंबहुना हीन लेखण्याची प्रथा चालूच आहे. ही प्रथा नाहींशीं करुन संगीत कलेच्या उपासकांना त्यांचा योग्य म्हणजे मानाचा दर्जा प्राप्त करुन देण्यास प्रस्तुतसारखे प्रयत्न निसंशय सहाय्यक होण्यासारखे आहेत या दृष्टीनेंही या पुस्तकाचें महत्त्व उपेक्षणीय खास नाहीं ज्ञानप्रकाश ५ जानेवारी १९३४

**बुलबुल तरंगविलास** (भाग १ ला) पृ १६ ले. शा. ना. गुपे. प्र. गणेश प्रिंटिंग वर्क्स, पुणें, सप्टेंबर १९३३ किं. ८४)

हार्मोनियम हें स्वस्त व सुलभ असें संगीताचें साधन असल्याने त्याचा प्रसार झपाट्याने होत आहे. परंतु स्वस्तता, सुलभता आणि म्हणून सार्वत्रिकता, या तीनहि बाबतींत हार्मोनियमला मागें सारणारें 'टाइशो कोटो' नांवाचें जपानी वाद्य पुढे आलें आहे. त्याची त्रोटक माहिती देऊन त्यावर वाजविण्यासाठी प्रभातचे बोलपट, नाटकें वगैरेमधील दहा लोकप्रिय पदांचें स्वरलेखन या पुस्तकांत दिलें आहे.

केसरी १० नोव्हेंबर १९३३

**मुद्रणकला**--ले. कृष्णगोविंद, प्र. वि. ना. वाडेगांवकर, उद्यमकार्यालय, नागपूर, १९३३ किं. १॥ रु.

छापखान्याच्या कामाची सांगोपांग माहिती देणारें हें पुस्तक ह्या धंद्यात प्रवेश करूं इच्छिणारांस व आपलें पुस्तक स्वत: प्रसिद्ध करणाऱ्या लेखकास उपयुक्त झाल्यावाचून राहणार नाहीं. कोणत्या प्रकारचा टाइप कोणत्या वेळीं घ्यावा, पुस्तकाची बांधणी कशी असावी वगैरे माहिती त्यांत व्यवस्थित दिली आहे. पण निरनिराळया टाईपाचे नमूने प्रत्यक्ष दाखविले असते तर तें अधिक उपयुक्त झाले असते.

चित्रमयजगत् जुलै १९३३

**शिवणकला परिज्ञान** ले. द. वा. काळे प्र. द. गो. सडेकर, खानापूर १९३३ किं. ८ आणे.

**संगीत मार्गदर्शक**, भाग १, २, ३ प्र. विठ्ठल मोरेश्वर जोशी, श्रीकृष्ण संगीत विद्यालय, पुणें आगस्ट १९३३ किंमत प्रत्येकी ६ आणे.

सध्यां लेखनाच्या हौशी इतकीच गाण्याचीहि हौस सर्वत्र बोकाळलेली असून, पेटी हें वाद्य विशेष लोकप्रिय झालेलें आहे. वस्तुतः संगीतज्ञांच्या मतानें पेटी हे सर्वांत निकृष्ट वाद्य आहे. पण, तें कोणालाहि सहज वाजवितां येण्यासारखें असल्यामुळेच बहुधा, लघुकथा जशी कोणीहि लिहावी, तशीच पेटी कोणीहि वाजवावी, अशी स्थिति सध्यां झाली आहे. या हौसेचें कोड पुरविण्यासाठीं पेटीवादनावरील अनेक पुस्तकेंहि अलीकडे मराठींत झालीं आहेत. श्री० वि. गो. जोशी यांनीं या तीन पुस्तकांत पेटीवादनाची माहिती शास्त्रोक्त आणि परिपूर्ण अशी दिली असून, अनेक पदांच्या स्वरमालाहि दिलेल्या आहेत. या पुस्तकांच्या जोरावर संगीतकलेंत जरी प्राविण्य मिळवितां आलें नाहीं, तरी पेटीवादन मात्र चांगलें करितां येईल, अशी खात्री वाटते.

महाराष्ट्र १४ आक्टोबर १९३४

**संगीताचें आत्मचरित्र** पृ, १३२ ले. व. प्र. ग. ह. रानडे सांगली, डिसेंबर १९३३ किं. १ रु.

आपल्याकडे संगीताचे अनेक संप्रदाय व पंथ असल्यामुळ संगीताविषयक कोणत्याही विवेचनास निर्विवादपणा प्राप्त होणे अर्थातच शक्य नाही, तरीपण संगीताची भूमिका व तिचे नैसर्गिक कार्य यांची समर्पक कल्पना कवि व गायक व सामान्य सुशिक्षित यांना आणून देण्याचे कामी प्रस्तुत उपक्रम पुष्कळ अंशांनी उपकारक ठरण्यासारखा आहे.

ज्ञानप्रकाश ५ जानेवारी १९३४

**हिंदी कारागिरी** पृ. ८० ले. द. बा. बर्वे प्र. वि. ना. वाडेगांवकर नागपूर १९३४.

डॉ. एन. एन. गोडबोले यांनीं प्रस्तावनेंत रा. बर्वे यांच्या संवेघानें दिलेली माहिती तरुण पदवी धरांना निःसंशय स्फु

तिदायक होण्यासारखी आहे. पुस्तकाचा विशेष म्हणजे लेखकांनीं अनेक मुद्रित पुस्तकें जमवून त्यातील माहिती संकलित केली नसून ती स्वतः देशांत प्रवास करून स्वत: मिळविली आहे. यामुळें माहितीच्या भरवंसेशीरपणाप्र आजतागाय तपणाचीही जोड लाभली आहे. पुस्तकांत काश्मीर, पंजाब, दिल्ली, जयपूर, आग्रा, दयालबाग, बंगाल, विजगापट्टम वगैरे ठिकाणी होणाऱ्या वर्णनीय व व्यपारयोग्य वस्तुची माहीती दिली आहे, त्या प्रमाणे सं. प्रांत, ब्रह्मदेश, सिलोन वगैरे प्रांतांतील उद्योगधंद्याचीही माहिती दिली आहे हिंदुस्तानचा परदेशी व्यापार चालण्याचीं संबंधात आजच्या स्थितींतही केवढे क्षेत्र आहे याची हें पुस्तक वाचून कोणालाही उत्कृष्ट कल्पना येणार आहे.

ज्ञानप्रकाश २६ जानेवारी १९३४

## क्रीडा व मनोरंजन

**कॅरमचा खेळ.** पृ. २६ ले. व. प्र. वि. ग. ताम्हणकर. महाराष्ट्र पब्लिशिंग हाऊस पुणे आगस्ट १९३३ किं, ६ आणे

**टिपऱ्यांचा शिक्षक**—पृ. ६० ले. प्र. आर. डी, गुरव, व एम, एम, शेख प्र. चित्रशाळा पुणे सप्टेंम्बर १९३३ कि, ४ आणे

टिपऱ्यांचा खेळ स्वभावतः मनोरंजक असतो. त्यांतही त्याला शिस्त व वैचित्र्य हीं या पुस्तकांने लाभवून दिली असल्यामुळे लवकरच या खेळास सार्वत्रीक स्वरूपाचा महत्वाचा दर्जा प्राप्त होईल असें मानण्यास हरकत नाहीं इयत्ता ४ ५ ६व ७ यांतील मुलांकरितां यांत पाठ देण्यांत आले आहेत, आरंभी या खेळाची मुलभूत अशी सर्वसामान्य स्वरूपाची माहिती देण्यांत आली असून एकंदर १४ पाठांत वीस डाव देण्यांत आले आहेत. डावांची खुलासेवार समजूत पडावी म्हणून एकंदर ७२ आकृती देण्यात आल्या आहेत शेवटी टिपऱ्यांवर चालणारे एक पद नोटेशनसह देण्यांत आले आहे मुलांमध्ये शारीरिक व्यायामाविषयीं आवड उत्पन्न करण्यांस पुस्तक उत्कृष्ट रीतीने सहाय्यक होण्यासारखे आहे.

ज्ञानप्रकाश ६ आक्टोबर १९३३

**विटी—दांडु**—प्र. ग. ल. जोशी, श्रीसमर्थ सेवामंडळ ठाणें किं. ३ आणे.

आपले देशी खेळ असे आहेत कीं, ते बिनखर्ची असून त्यापासून व्यायाम चांगला होतोच पण खेरीज यांत खेळाडूस आपली बुद्धीमता व कौशल्य प्रकट करण्यासहि वाव मिळतो. तथापी त्याजकडे बुद्धीमान व सुशिक्षीत लोकांनी लक्ष न दिल्यामुळे त्यांस तुच्छ लेखण्यांत येत होते. विटी दांडूचा खेळ त्यांपैकीच होय. पण ठाणेकर मंडळींनी त्यास नियमांचें बांधीव स्वरूप देऊन त्याच्या सामान्यास १९३१ सालापासूनच सुरवात केली आहे. सदर नियमांचें पुस्तक रा. जोशी यांनीं प्रसिद्ध केलें असन तें इतर ठिकाणच्या व्यायामप्रेमी जनांस मार्गदर्शक होइल असा आम्हास भरवंसा आहे.

केसरी ३ आक्टोबर १९३३

## भाषा व व्याकरण.

**निबंध—मार्ग—दर्शक—भाग १ ला** पृ २०८ ले. व. प्र. ना. के. बेहरे, नोव्हेंबर १९३३ किं. ?—८—०

**मराठी भाषेची लेखनपद्धति—ले.** एन. डी. बनहट्टी. प्र. व्यं, शा. वळकुंदी, नागपूर १९३३ किं. रु. १—१२—०

**मराठी व्याकरणाची मुलतत्वे**—पृष्ट ३७० ले. प्रो. ग. ह. केळकर प्र. बॉंबे बुक डेपो मुंबई, डिसेंबर १९३३ किं. १—४—०

मराठी व्याकरणासंबंधात तपशीलाचे बाबतीत अनेकांनीं अनेक योजना सुचविल्या असल्या तरीं व्याकरणाची मूळ घडण दादोबांनींच बसविलीं ती आजही कायमच आहे. असे म्हणण्यास हरकत नाही प्रस्तुत प्रयत्नाचा विशेष म्हटला म्हणजे तो सर्वस्वी स्वतंत्र आहे हा होय. यांत संयुक्त क्रियापदें, प्रयोगव्यवस्था, सामान्यरुपे पदार्थवाचकनामें आघात वगैरे बाबतीत स्वतंत्र रीतीनें चर्चा करण्यांत आली असल्याचे दिसून येतें या चर्चेत पुस्तक कर्त्यांनी जे सिद्दांत स्थापित केलें आहेत त्यासंबंधात मतभेद होणे शक्य असले तरी चर्चेची दिशा कोणासही निःसंशय विचारप्रवर्तक होईल अशीच आहे व्याकरणविषयक कित्यक बाबींची पुस्तक कर्त्यांनी जी चर्चा केली आहे तीत कोणत्याहि प्रकारचा अभिनिवेश दिसून येत नाही व्याकरणात ज्या कित्येक गोष्टी केवळ परंपरेमुळे रुढमूल झाल्याआहेत त्यांची शास्त्रीय रीतीने छाननी व्हावी, याच एका उद्देशाने ही सर्व चर्चा करण्यांत आली आहे चर्चेतील या गुणामुळे हें पुस्तक व्याकरणाचे विशेष परिशीलन केलेल्या गृहस्थांना जसें विचारप्रवर्तक होणारे आहे त्यांचप्रमाणे अभ्यासकांना सहाय्यक व व्याकरणविषयक गोष्टींची तारतम्य भावाने विचार करण्याचें कामी मार्गदर्शक होण्यासारखे आहे.

ज्ञानप्रकाश १५ डिसेंबर १९३३

## कविता

अज्ञातवासीची कविता—पृ. १८० प्र. तुकाराम पुंडलीक शेटये, माधवबाग मुंबई नोव्हेंबर १९३३ कीं. १॥ रु.

या पावणेदोनशे पानांच्या पुस्तकांत सुमारें सवाशें लहानमोठ्या कविता संकलित करण्यांत आल्या आहेत. 'भविष्याचे पडदे खोलणारा कवि,' महाराष्ट्राचा मर्द कवि ' अशा प्रकारचीं बीरुदें अनेक वर्तमानपत्रांनीं ज्या कवीच्या अंगावर चढविलीं आहेत व ज्याचा एकाद्या जाहीरातीप्रमाणें उदोउदो चालविला आहे, अशा अज्ञातवासींची ही कविता आहे. परवां नुकतेंच प्रो. वा. म. जोशी यांनीं उद्गार काढल्या प्रमाणें अलीकडची कविता कशी असमाधानकारक व पोंचट आहे याचें प्रत्यंतर या संग्रहावरून येते'. कांहीं ठिकाणीं कवीच्या कल्पना चांगल्या आहेत; पण त्या इतक्या तुटपुंज्या रीतीनें व्यक्त करण्यांत आल्या आहेत कीं कवीचें भांडवल अगदींच मोजके आहे याची साक्ष पटते. अज्ञातवासींची कविता साधीसुधी, बालबोध व क्षणभर रंजन करणारी आहे यांत शंका नाहीं. पण तिच्यांत कुठल्याही प्रकारची उदात्तता किंवा तेजस्विता नाहीं.

चित्रमय जगत जानेवारी १९३४

अज्ञातवासींच्या कवितांच्या या संग्रहामुळे मराठी वाचकवर्गात उल्हासाची नवी लकेर आणि उत्साहाची नवी ललकारी सरसरुन ऊठेल, यांत संशय नाहीं कारण अंतःकरणाला वेधण्याचा गुण इतक्या मोठ्या प्रमाणात असलेला असा हा काव्यसंग्रह पुष्कळ दिवसांनी पहावयाला मिळत आहे याचा अर्थ असा नव्हे कीं इतर काव्यपुस्तकातून तो गुण नसतो. पण, त्यांच्यांत आणि या संग्रहांत मुख्य फरक हा आहे कीं, इतर कवि हे फक्त प्रणयाचे तुणतुणे वाजवीत असल्यांमुळे त्यांच्या कवनांत जें मन फार काळ रमत नाही, तें या संग्रहातील भावगीतांच्या विविधतेंत अगदीं गुंगून जातें शिवाय इतरांच्या कवितेंत न आढळणारा असाही एक भावना विशेष त्यांच्या कवितांतून ओतप्रोत भरलेला आहे. तो म्हणजे त्यांचा उत्कट देशाभिमा

ने. त्यांच्या रणगीतांतुन हा देशाभिमान विजेच्या स्फुरणासारखा झळकतो व प्रेमगीतांतून फूलांच्या सुवासासारखा दरवळतो. रणांगणांतील शौर्याचीहिरगी व रंगमहालांतील हुरहुर ही दोन्ही त्यांत प्रतिध्वनित झालेली आहेत. ज्ञानप्रकाश १० डिसेंबर १९३३

काव्यपरिचय 'प्रतिभा, १० नोव्हेम्बर १९३४

आशागीत—पृष्ठ १६४ कवि ना. आ. पाठक एम. ए. एस. टी. सी. १९८ सदाशिव पुणे आगस्ट १९३३ किं. १॥ रु.

श्री. पाठक यांनी आपल्या काव्यसंग्रहाचे आशागीत, ओढणी वा प्रणयगीत असे तीन समर्पक विभाग पाडले आहेत. पहिल्या भागांतील 'हे दीप लागले चोंहिकडे, 'शिवाजी आणि बालवीर, ' खेड्यांतील आनंद 'मायाव- ' खेड्यांतील घराकडे, 'भग्नजीवन, 'अरुण, इत्यादि कविता पाठकांच्या स्वतंत्र काव्यगुणाची साक्ष देणाऱ्या आहेत. ह्याच भागांत संसृतितापानें त्रासलेल्या जीवास शांति देणारीं मायभूस गाइलेली व तत्वजिज्ञासायुक्त सुंदर गीतें संग्रहित केलीं आहेत दुसरा भाग ओढणी. यांतील १०८ अभंग परमेश्वरदर्शनाच्या म्हणजे साक्षात्कारांच्या अपेक्षेने लिहिलेले आहेत असे दिसून येते. या अभंगाची रचना इतकी स्वतंत्र व कौशल्यपूर्ण आहे कीं, आधुनिक कवींत श्री. पाठक यांनीच लिहावी असे म्हणण्यास अतिशयोक्ति होणार नाहीं, त्यांतील ऋजुता नम्रता, पावित्र व उदात्तपणा इतका विलोभनीय आहे कीं वाचकाच्या मनास देखील ओढ लागून ते सर्व वाचल्याशिवाय आशागीत खाली ठेवणार नाहीं. तिसरा भाग प्रणयगीतांचा. पाठकांचा प्रणयहि पडदानशीन व शालीन आहे. चित्रमयजगत डिसेंबर १९३३

काव्यपरिचय 'प्रतिभा, २५ सप्टेंबर १९३३ परिचयकार बि. प. चितळे बी. ए.

काव्यनिरीक्षण—संजीवनी १४ सप्टेंबर १९३३ निरीक्षक प्र. के. अत्रे. बी. ए. बी. टी.

कविकूजन पृ. ८४ संग्राहक—श्रीमंत अनुबाई बहिनीसाहेब घोरपडे, प्र. क. श्री कुल कर्णी इचलकरंजी १९३३ किं. १ रु.

संमोहलहरी या सुंदर काव्याचे जनक — कै. रा. सा. गोविंद वासुदेव कानिटकर बी. ए. एल. एल. बी. यांच्या स्फुट काव्याचा "कविकुजन" हा संग्रह त्यांच्या कन्येनें प्रसिद्ध करुन महाराष्ट्र कवितेचें अर्धशतकापूर्वीचें स्वरुप तिची वेषभूषा, विषयाभिरुची वगैरेची जिवंत स्मृति जनतेस आज करुन दिली आहे. त्यांची संस्कृतप्रचुर रचना व आंग्ल कवितानुसारी विषयांची निवड पाहिल्यानेवर तत्कालीनांची बुद्धि द्विधा झालेली होती हे स्पष्ट दिसून येते. त्यांनी स्वतंत्र अशीं संस्कृत बुद्धचरित्र नारायणराव पेशवे यांचा वध, अकबर चरित्र, कृष्णाकुमारी वगैरे खंडकाव्यें लिहून मोठीं बक्षिसें मिळविलीं आहेत. त्या प्रमाणें त्यांच्या स्फुट काव्याचाही बराच मोठा संग्रह असून त्यांत कांहीं भाषांतरित व कांहीं स्वतंत्र अशीं मनोहारी गीतें आहेत. सदर संग्रहांत आध्यात्मिक, वर्णनात्मक व निरनिराळे मनोविचार चित्रित करणारीं भावगीतेंही आहेत. कवितेची भाषा सुबोध व सहजमनोहर आहे. या आधुनिकांतील जुन्या कवीचा काव्यसंग्रह काव्येतिहासाचा एक दुवा आहे असें म्हणावे लागेल (दिनकर विनायक देव) चित्रमयजगत एप्रील १९३४

अव्वल इंग्रेजी अमदानींत ज्यांनी इंग्रेजी कवितेचा आदर्श डोळ्यांपुढें ठेवून काव्यरचनेला प्रारंभ केला, व त्यांत रावसाहेब कानिटकर यांची गणना होते; व त्यांनी ' कृष्णाकुमारी

'अकबर' 'नारायणराव पेशव्याचा वध' इत्यादि मोठमोठीं काव्यें लिहिलीं असून त्याचें 'संमोहलहरी' हें लघुकाव्य तर त्या वेळीं फार लोकप्रिय झालें होतें. प्रस्तुत पुस्तकांत रावसाहेबांच्या फक्त स्फुट कवितांचाच संग्रह करण्यांत आलेला आहे.

*या संग्रहात स्फुट कवितांबरोबरच जर* संमोहलहरी सारखी त्यांची अलिकडे दुर्मिळ होऊन बसलेलीं कांहीं लघुकाव्यें छापलीं असतीं तर त्यांच्या वैशिष्ट्याची ओळख करुन दिल्याचें श्रेय तरी संपादिकेला मिळालें असतें. तथापि रावसाहेबांच्या कवितेची स्मृति पुनरुज्जीवित करावयाला या पुस्तकाचा चांगला उपयोग होईल. महाराष्ट्र १५ जुलै १९३४

कै. कानिटकरांच्य कवितांचा प्रमुख गुण म्हणजे प्रसाद होय. साधेच घरगुती प्रसंग त्यांच्या कविहृदयाला स्फुर्ति देतात. त्यांची निरीक्षणशक्ति मार्मिक असून वर्णनशैलीहि मोहक आहे. भाषेंत साधेपणा व शुचिता विपुल प्रमाणांत आहे. या संग्रहानें एका नामवंत जुन्या कविमित्राच्या भेटीचा सुयोग रसिकांना लाभला असें म्हणावयास हरकत नाहीं. किर्लोस्कर जानेवारी १९३४.

काव्य श्री—कवि 'काव्यशेखर' इचलकरंजी साहित्यसेवामंडळ प्रशंसित पुस्तकमाला इचलकरंजी किं. १० आणे.

या कवितांतून ध्येयवाद आहे कल्पनाविलास आहे, निसर्गाच्या शोभेचा अविष्कार आहे. 'रम्य तें बालपण, गंधर्वांचो नगरे ती, कोणी एक मुळा, वेडा, गृहस्थाश्रम, धुके वगैरे कविता बऱ्याच आल्हाददायक वाटतात एक ठळक दोष मात्र काव्यश्रीला गालबोट लावतो. तो म्हटला म्हणजे भाषेचा. पुष्कळ ठिकाणी ती असावी तशी सफाइदार नाही. भाषेत अधिक लालित्य व्यासंगाने आलें तर काव्यशेखर यांच्या कविता वरच्या दर्जाच्या ठरतील असें म्हणण्यास हरकत वाटत नाही.

केसरी १६ फेब्रुवारी १९३४

*श्री चंदुरकर यांच्या निवडक ५० स्फुट* कवितांचा हा संग्रह आहे. त्यांच्या कवितेंत [illegible], माधवानुज यांच्या वर्गात काव्यशेखर यांची गणना करतां येईल मनोविनोदनापेक्षां मनोबोधनाकडे कवीचा स्वाभाविक कल असल्यामुळे काव्य विषयांतून कांहीं तरी नीतीतत्व अथवा शिकवण काढण्याकडे त्यांची प्रवृत्ति असते त्यांच्या काव्यात कल्पनेची भरारी आढळणार नाहीं. पण साधेच प्रसंग आपल्या प्रासादिक भाषेनें मांडण्याची त्यांची हातोटी प्रशंसनीय आहे. उत्कट विकाराऐवजी समंजस विचार त्यांनी मांडले आहेत. किर्लोस्कर मार्च १९३४

गवाक्ष गीत पृ. ३० ले. श्रीमती काशीताई नाटेकर प्र. कमकर आणि मंडळी बुकसेलर्स गिरगांव बँकरोड मुंबई डिसेंबर १९३३ किं. १० आणे.

संग्रहातील कविता नवीन तऱ्हेच्या असून त्या नव्यानेंच जनतेपुढे येत आहे. त्यांतील फारच थोड्या आतांपर्यंत प्रसिद्ध झाल्या असल्यामुळे कवयित्रींची ओळख प्रस्तुत पुस्तकानेच होणारी आहे. प्रस्तुत कविता वाचल्याने त्या कोणी तरी कवयित्रीनेंच लिहिल्या असल्या पाहिजेत असें अनुमान सहज निर्माण्याजोग्या त्यातील घरगुती कल्पना व घरगुती चित्रीकरणही आहेत.

ज्ञानप्रकाश ५ जानेवारी १९३४

हीं गीतें इतकीं मजेदार आहेत कीं तीं सर्वच्या सर्व वाचल्यावांचून खाली ठेवणें वाचकांस अशक्य होतें. सदर गीतें मुलांकरिता तर प्रमुख्याने आहेतच व तीं गुणगुणतां गुणगुणतां त्यांना गुदगुल्या होतील यांतहि शंका नाही. कांही गीतें प्रौढ वाचकांनीहि वाचण्यासारखीं व मनन करण्यासारखी आहेत. कडक लक्ष्मी, नव्या बाहुलीचें लग्न घूम पारव्या घूम बकध्यान हीं गीतें जशीं बाल-बालिकांस आनंदाच्या उकळ्या आणतील, त्याप्रमाणे विश्वाचा पाळणा, पिकलें पान इत्यादि गीते जाणत्यास बोध देतील. लेखिका श्री. काशीताई नटेकर यांची प्रतिभा तेजस्वी आहे, भाषा रसाळ आहे व कल्पकता मोहक आहे.

केसरी ८ जून १९३४

**गीत वाहिनी**—सं.—मा. व्यं. मंगसुळीकर दातारवाडा, मिरज. किं. ८ आ.

विशिष्ट निवासस्थानच्या कवींचे काव्यसंग्रह अलीकडे मराठींत प्रसिद्ध होत आहेत त्यांपरंपरेंत स्थान मिळविणारें हें पुस्तक आहे यांत मिरजेंतील दहापधरा कवींची कवने एकत्रित केलेलीं आहेत. यांत आधुनिक मराठी कवितेचें विविध रूप चांगल्या प्रकारें प्रतिबिंबित झालें आहे. अशा संग्रहांत कवीच्या विविधतेबरोबरच वृत्तांतहि वैचित्र्य सहजच आढळतें, श्री. घारपुरे, सहस्रबुद्धे मंगसुळीकर यांचा काव्यव्यासंग दीर्घकालाचा असल्यामुळे त्यांच्या कविता सफाईदार आहेत. इतर नवीन किंवा हौशी कवींच्या कविता प्रायः अनुकरणात्मक असणें अपरिहार्य आहे.

केसरी ५ डिसेंबर १९३३

**गुरुकरूणामृत**—ले. व्यंकटेश माधव दातार बी. ए. ३११३ गौळीगुडा, हैद्राबाद (दक्षिण) किं. १॥

या पुस्तकांत सुप्रसिद्ध पर्शियन कवि उमर खय्यामच्या रुबायांचा भावार्थ दिला असून त्यांच्या तत्वज्ञानाचें विशदीकरण करण्यासाठी दीडशें पानें खर्च केली आहेत. खय्यामचे तत्वज्ञान वास्तविक पाहतां कविता, कामिनी व व वारुणी या तिघाभोवतिच केंद्रीभूत झालेलें आहे; पण या पुस्तकांच्या लेखकानी भक्ति हे रुबायांचे रहस्य आहे असें प्रतिपादिलें आहे!

चित्रमयजगत फेब्रुवारी १९३४

**चांदरात व इतर कविता**—पृ. ८० ले. अनंत काणेकर. प्र. प्र. श्री. कोल्हटकर, खटाववाडी, मुंबई आगस्ट १९३३ नं. ४ किं. १२ आणे.

या कविता वाचून कवीची प्रतिभा उच्च दर्जाची आहे अशी खात्री पटते. संध्यासंगीत सावळ्याचें गाणें. चांदरात या कवितातून कवीच्या कल्पनेची भरारी किती वर जाऊं शकते तें व्यक्त होते. दिवाळी, तो आणि मी, कवनें दोन देवभक्त या कवितांतून गरिबांविषयी कवीस कशी सहानुभूति वाटते त्यांचें प्रत्यंतर पाहावयास मिळतें. रानगीत, कोळ्याचें गाणें या कवितांत कवि अशिक्षित लोकांशींहि कसा समरस होतो तें दृष्टीस येतें. एका नळावर तणतणून भांडणाऱ्या बाईस, बेगमेच्या विरहगीताला शिवाजीचे उत्तर,लग्नघरांतील स्वयंपाकिणीचें गाणें, या कविता विडंबनात्मक आहेत व दुसऱ्यास न दुखवितां—खुपवितां विडंबन कसें करावें याचा नमुना त्यांत वाचकास पाहावयास सांपडतो. एकंदरीने वाचकाला या कवितासंग्रहांत कल्पनाविलासाची चांदरात घडल्यासारखें वाटतें. केसरी ८ जून १९३४.

अलीकडे जे अनेक कविता संग्रह निघाले आहेत त्यांत या पुस्तकाचा दर्जा पुष्कळच उंच लागेल यांत शंका नाहीं. या संग्रहांत तसें म्हटलें तर प्रतिभेची तेजस्विता किंवा

स्फर्तीलहरीचें तांडव नाहीं पण शारदीय कौमुदीची रम्य मनोहर शीतलता आहे. श्री काणेकरांची काव्यलेखनशैली मधुर, अटपशीर व मार्दवयुक्त आहे विशेषत नाजुक उपहास हें त्यांचें वैशिष्ठ्य सांगतां येईल.

चित्रमयजगत सप्टेंबर १९३३

काव्यपरीक्षण 'प्रतिभा' ११ सप्टेंबर १९३३

परीक्षक–प्रो. माधवराव पटवर्धन.

काव्यपरीक्षण–यशवंत अक्टोबर १९३३

परीक्षक–श्री. मुक्ताबाई लेले बी. ए. बी. टी.

जयमंगला–पृ. ६८ कवि यशवंत. प्र. प्र. श्री. कोल्हटकर बी. ए. ५ खटाववाडी गिरगाव मुंबई ४ आगस्ट १९३३ किं. १ रू.

अर्ध्या–पाऊण तासांत वाचून संपण्यासारखी ही एक हृद्य प्रेमकथा आहे. ती लिहून कवि यशवंतानी काव्यरचनेच्या बाबतींत आपले व त्याबरोबर मराठी कवितेचेंही पाऊल पुढे टाकलें आहे. जयमंगलेंत सुमारे वीस भावगीतांचा अंतर्भाव झालेला असून प्रत्येक गीत हें, वसुंधरेप्रमाणें स्वतः च्या कक्षेंत फिरुनहि कथानकाच्या सूर्याभोंवती फेरी घालणारे आहे या खंडकाव्याचें कथानक कवि बिल्हण व राजकन्या शशिकला त्याच्यांतिल शिक्षकशिष्येच्या नात्यांत संवर्धित होणाऱ्या मुग्ध प्रणयभावावर उभारलेलें म्हणजे चिरपरिचित असेंच आहे, पण सर्व काव्य स्वतंत्र आहे. भ्रमराच्या कमलपरागावरील पदलालित्याची आठवण व्हावी इतक्या सूचकतेने व कुशलतेने कवीने प्रेमाविष्करण साधिलें आहे. भूषणें कशाला, असें मी सेवक, हा काय माझा गुन्हा व ताटातूट हीं स्थळें या दृष्टिने रम्य होत.

कवितांतील एक भेद स्पष्टपणें व मार्मिकपणें चिकित्सला आहे. केवळ भावनांची मेजवानी आणि प्रत्येक कवनाचें कथान्तर्गत स्वातंत्र्य या दोन कांहीशा अभिनव गुणांनी जयमंगला महाराष्ट्र काव्यसृष्टीत उच्च स्थान पटकावील. केसरी १७ आक्टोबर १९३३

प्राचीन संस्कृत कवि बिल्हण याची व त्याची शिष्या राजकन्या जयमंगला हिची प्रणयकथा प्राचीन संस्कृत वाङमयांत फार प्रसिद्ध आहे. कथानकाचा हा जुनाच धागा घेऊन व त्यांत आपल्या कल्पकतेचे मनोहर रंग भरून श्री. यशवंत यांनी या अद्भूत काव्याची रचना केली आहे. श्री. यशवंताचें कल्पना विमान एकदां आकाशांत वर वर चढूं लागले की ते वाचकाला सदेह सौख्यस्वर्गाला घेउन जातें या त्यांच्या प्रमुख आणि प्रभावी गुणविषेशाचा अनुभव याही कव्यांत त्यांतही 'वनविहार, टेकवूं हा श्रांत माथा मी कुठें? संगमावर वगैरे कवितांमतून चांयला येतो. नाजुक प्रणयभावाचें शद्ध चित्र काढण्यातील यशवंतांचे कसब या काव्यांत चांगलेच कसाला लागलें आहे. त्यांची काव्यरचना हृदयीची एकदम पकड घेणारी असते. या कव्यांतील कुठलेही गीत या म्हणण्याची साक्ष देईल. यशवंताची भाषा नेहमींच टीपदार असते. त्यामुळें त्यांच्या कल्पकतेला भाषा प्रभुत्वाचे सहाय्य नेहमींच मिळुन सभसमा संयोग होतो त्यामुळें त्यांचे जयमंगला हें काव्यहि आपल्या पूर्वीच्या भावंडाप्रमाणेंच लोकप्रिय झाल्याशिवाय वांचून रहाणार नाहीं.

किर्लोस्कर अक्टोबर १९३३

काव्यपरीक्षण 'प्रतिभा ९ अक्टोबर १९३३

परीक्षक वि. स. खांडेकर

झाशीची विद्युल्लता ले. व प्र. गो. कृ. चोळकर, आकोला. १९३३ किं. २ आणे.

पोवाडा

तडफ- प्र. किर्लोस्कर प्रेस किर्लोस्करवाडी जि. सातारा, किं. ८ आ.

किर्लोस्कर मासिकांत वेळोवेळीं ज्या कविता प्रसिद्ध झाल्या त्यांतील निवडक कविता या पुस्तकांत ग्रथित केल्या आहेत. त्या मासिकांतील बहुधा सर्व कविता वाचकास स्फूर्ति देण्याकरितां व उद्यमप्रवण करण्याकरितां लिहिलेल्या असतात. काव्यशेखर, ताम्हनकर, यशवंत यांच्या कविता उत्तुंग कल्पनेने भरलेल्या आहेत. या कविता संग्रहाच्या वाचनाने वाचकाच्या अंगांत खरोखर तडफ उत्पन्न होईल.

केसरी ८ जुन १९३४

वाचकांच्या मनःक्षेत्रांत आशावलीचें बीज रुजवून आत्मविश्वासाचें पीक काढण्यासाठीं हा ६८ कवितांचा संग्रह बनविण्यांत आला आहे. या कविता ध्येयनिष्ठ असल्यामुळे त्यांत काव्य किंवा कला या गोष्टी फारशा आढल्या नाहींत तर विषाद मानण्याचें कारण नाहीं. संग्रहाची कल्पना नाविन्यपूर्ण आहे. चित्रमय जगत मार्च १९३४

पुस्तकपरीक्षण साप्ताहिक त्रिकाळ १९ फेब्रुवारी १९३४.

निर्जनग्राम- ले. व प्र. जो. आर हवलदार मुंबई जुलै १९३३ किं. ४ आणे.

Deserted village चें वृत्तात्मक रूपांतर

निर्माल्य-माला पृष्ठ ५९ ले.-सौ. विमला देशपांडे आणि श्री. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे प्रकाशक प. वि. जोशी. विदर्भ प्रकाशन संस्था उमरावती एप्रिल १९३३ किंमत १० आणे.

या पुस्तकाला कवितासंग्रह म्हणणे अरसी कल्पणा होईल. या कविता स्वतंत्र नसून एक सुत्रा धारण असलेलें एक काव्य आहे प्रेमसागराच्या एकांच रंगभूमीवर नाचत असलेल्या तुफानांच्या भरती ओहटीच्या वेळेचा हा ध्वनी आहे. 'माला, ही प्रेमपूर्ण हृदयाची उसळणारी भरती आहे. 'निर्माल्य, ही भरतीचा अनुभव घेतलेल्या हृदयाचा निराशेची ओहोटी आहे. प्रेमाची प्रकाशमय प्रभात मालेंत प्रतिबिंबित झाली आहे. जगाच्या सत्यांच्या प्रखर ज्वालेंत करपन गेलेल्या हृदयाची निराशा निर्माल्यांत उमटली आहे. माला हा प्रेमाचा वसंत आहे निर्माल्य हा परिणतीचा हेमंत आहे.

नवाकाळ १६ नोव्हेंबर १९३३ पुस्तक परीक्षण सकाळ १४ आक्टोबर १९३३

पिचलेला पावा— पृ. १३१ ले. व प्र. भवानीशंकर पंडित, धनतोली, नागपूर डिसेंबर १९३३ किं. १ रू.

श्री. पंडित यांनी या आपल्या भावगीताच्या संग्रहाला ' पिचलेला पावा हे नांव कां दिले ते समजत नाहीं. गीते वाचून कवीचा पावा बिलकुल पिचलेला नसून तो धड आहे. व सुरेल आवाजहि देतो असें स्पष्ट वाटतें. प्रेम, सौंदर्योपासना फुलांचा आनंद या नाजूक गोष्टी तर या भावगीतांत भरपूर आढळतातच. पण जन्मभूमि प्रशस्ति हे गीत तर राष्ट्रगीत होण्याचा लायकीचे आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय वाटत नाही श्री. पंडित यांच्या पाव्यातून आणखी मधुर व हृदयास्पर्शी गीते जनतेस ऐकावयास मिळतील अशी आशा वाटते. केसरी जून ८ १९३४

या ८३ कवितांच्या पिचलेल्या पांव्यातून कवीच्या गेल्या दहाबारा वर्षांच्या जीवनाचे सूर निघत आहेत हे सूर अनेक प्रकारचे आहेत. पंडितांचीं प्रेमगीतें व्यक्तिगत आहेत असें वाटत नाहीं. ती प्रेमपर असली तरी त्यांत प्रेमगीताचा जिव्हाळा नाहीं. कवि प्रेमविषयाशी एकरूप होत नाहीं. कवितेच्या साजशृंगाराप्रमाणे तिच्या अंतरंगाकडे

ते आधिक लक्ष देतील तर त्यांच्या गीतांत उत्कट जिव्हाळा प्रकट झाल्याशिवाय राहणार नाहीं. विहार ७ एप्रिल १९३४

काव्यपरीक्षण प्रतिभा १ मार्च १९३४

भिकारीण व इतर कविता—पृ ८० ले. माधव व्यंकटेश मंगसुळीकर [. डी. एम. मोघे, कोल्हापूर. किं. १२ आणे.

रा. मंगसुळीकर यांची भिकारीण ही कविता निरनिराळ्या खेपेस प्रसिद्ध होत आहे त्या वरून तिची लोकप्रियता सिद्ध झालीच आहे त्या कवितेबरोबर त्यांनी या पुस्तकांत आपल्या इतरहि लहानमोठ्या कविता प्रसिद्ध केल्या आहेत. रा. मंगसुळीकर मिरजेस एका वकिलाकडे कारकून होते त्यावरून त्यच्या शिक्षणासंबंधी जे अनुमान होते त्याचा विचार केल्यास मंगसुळीकरांची काव्यक्षेत्रांत झालेली प्रगति प्रसंशनीयच समजली पाहिजे. त्यांच्या बहुतेक कविता अनुभवसिद्ध दिसतात. म्हणूनच त्यांत एक प्रकारचा जिवंतपणा आला असून तोच वाचकांच्या हृदयाला जाऊन भिडतो. त्यांच्या भिकारीण या कवितेंतील विशेष हाच होय व तोच 'भिवास' अभागी जीवन या कवितांतूनहि प्रतीत होतो, मंगसुळीकर यांना काव्यरचनेची नैसर्गिक शक्ति चांगली आहे. ती त्यांनी वाचनाने व अभ्यासाने अधिक वाढविल्यास तिच्यांतील सौंदर्याचा उणेपणा भरून निघेल. केसरी १६ फेब्रुवारी १९३४

काव्यपरीक्षण ज्ञानप्रकाश ३० मार्च १९३४

काव्यपरीक्षण संजीवनी १८ जानेवारी १९३४ परीक्षक श्री. द. गो. देशिंगकर

मधुकराचा गुंजारव—पृ. ६० कवि एम. जी दाते, प्र. एन. टी. भिडे. मॉडर्न बुक डेपो, पुणें जुलै १९३३ किं. ६ आणे

लहहाळी—कवि व्ही. वी. कोलते. प्र. एम. के. कुरकुरे. उमरावती १९३३ किं. १ रु

सावकारी पाश—प्र. बा. क. पाठक मोतीबाजार. मुंबई, सप्टेंबर १९३३ किं. ४ आ. पोवाडा

सुगी—पृ. १४१ संग्राहक—ग. ल. ठोकळ, जंबूरटे, बडोदे डिसेंबर १९३३ किं. १रु.

या संग्रहांत सारीच गीते जानपदगीतें या पदवीला शोभतील अशी नाहींत. तरी पण सार्‍यांच कटाक्ष खेड्यांतील जीवन यांवरच आहे. अर्थात हा विषय कोणी खेडवळ भाषेंत तर कोणी नेहमींच्या भाषेंत वर्णिला आहे एवढेंच. जानपद गीतांचा प्रसार सध्यां तरी फारच अल्प प्रमाणांत होत आहे. हा जो अल्प प्रसार आजपर्यंत झाला त्याचें बरेंचसे श्रेय श्रीयुत ग. ल. ठोकळ यांनाच आहे.

ज्ञानप्रकाश २१ डिसेंबर १९३३

यांत जानपदगीतांचा प्रतिनिधीसंग्रह असून त्याचे दोन भाग केलेले आहेत. पहिल्या भागांत वर्णनपर कवितांचा समावेश केला आहे. ५८ व्या पानापुढें 'सुगी' या कवितेचा दुसरा भाग सुरू होऊन त्यांत खेडवळ भाषत लिहिलेलीं गीतें आहेत. त्यामध्यें पेरणींचा होका, लेवापाटीदार भाषत 'मागणी'-एरणीं भाषेंत आणि 'कोकणचा कुळवाडी' कोकण भाषेंत अशा आलेल्या या तीन कवितांना भरपूर टीपा दिलेल्या आहेत. मराठी भाषेंतला जानपद गीतांचा हा पहिलाच संग्रह आहे यास चांगला लोकाश्रय मिळून संग्रहकाच्या श्रमाच सार्थक व्हावे असे आम्ही इच्छितो.

मनोरंजन जून १९३४

काव्यपरीक्षण 'महिला, एप्रील १९३४

परीक्षक—श्रीमती कृष्णाबाई खिरे?

काव्यपरीक्षण 'प्रतिभा' १ फेब्रुवारी १९५४

परीक्षक प्रो द. वि. साळगांवकर

## नाटकें

**अर्धांगी**—लेखक:—श्री. सौ. मालती माधव तेंडूलकर प्रकाशक —'शुभांगी' वाग्मंय वैजयंती सांगली, किं. ४ आणे

घटस्फोटावरील समाज क्रांतीकारक त्रुटित नाटक असें या नाटकाचें वर्णन ग्रंथकर्तीनेंच केलं आहे. लग्नाची बायको एकनिष्ठ पतिव्रता व शुद्धाचरणाची असतांना परदेशचे शिक्षण घेऊन आलेले किंवा अन्य साधनांनी बदफैली बनलेले तरुण एखाद्या विधर्मी तरुणीशी लग्न करुन विवाहीत हिंदी वधूचा 'गळा' कापतांत किंवा दारुबाज बनून बिचाऱ्या विवाहीत वधूच्या संसाराचा नरक बनवितात! असल्या नवरोबांना संसारांत धडा त्यांच्या विवाहीत वधूंनी कसा व कोणता शिकवावा, हा या त्रुटित नाटकाचा प्रातिपाद्य विषय आहे. धर्मांतर करुन घटस्फोटपूर्वक पुनर्विवाह करुन असल्या नवरोबांच्या डोळयांत झणझणीत अंजन घालावे अशी या त्रुटित नाटकाची शिकवण असून या नाटकांतील नायिकेने तसेंच केल्याचें दाखविलें आहे आपल्या समाजांतील भगिनी वर्गांत स्वाभिमानाची जाणीव व्हावी हा जो लेखिकेचा हेतु तो साध्य व्हावा अशी या नाटकाची रचना आहे नाटकांतील शिकवण तंतातंत सर्व विचारवंतांना पटेलच असें नाहीं. परन्तु 'असे पति देवचि ललनांना, या सारख्या म्हणींचा दुरुपयोग होऊन जी स्त्रियांच्या वैवाहिक जीवनाची आपल्या समाजांत पायमल्ली चालली आहे ती विरुद्ध विचारक्रांतीला जी चालना देण्याचे या नाटकाचा निःसंशय उपयोग झाल्यावांचून राहणार नाहीं.

नवाकाळ २५ जानेवारी १९३४

**अमृतसिद्धि** पृ. ८० ले—ग. स. देसाई प्र. व्यं. श्री. राजहंस, गंधर्व नाटक मंडळी, नानाचा चौक मुंबई नंबर ७ आक्टोबर १९३३ किं. १ रु.

साध्वी मीराबाईच्या प्रसिद्ध कथानकावर हे नाटक रचलेले आहे. याच विषयावरचें श्री. शुक्ल यांचें नाटक रंगभूमीवर पूर्वी आलेले आहे. त्या पेक्षां या नाटकांत रंगविलेलें कथानक अधिक कोमल व सात्विक असे आहे. शूद्राच्या हातचा प्रसाद सेवन केल्याबद्दल विषप्राशनाची आणि अकबराचा सहवास घडल्याबद्दल शिरच्छेदाची शिक्षा मीराबाईला दिली गेल्याचें प्रस्तुत नाटकांत दाखविलें आहे. परंतु एकंदरींत कथाप्रवाह बराच संथ व शांत असा आहे. कथानक सुपरिचित असल्यानंतर पात्रांच्या स्वभावपरिपोषांतच जें मुख्य कार्य नाटककाराकडे उरते, त्याकडे या नाटकांत फारसे लक्ष पुरविण्यांत आलेलें दिसत नाहीं. आरतीचे ताट उघळणे, कृष्णाशीं स्वागत भाषण करणे इत्यादि ठिकाणीं इतर नाटककारांचें प्रतिबिंब आढळत असले तरी तीं स्थळें रम्य आहेत. तिसऱ्या अंकाच्या समाप्तीनंतर वाचकांची जिज्ञासा हि पूर्णपणे समाप्त होत असल्यामुळे नाटकाचा शेवट तेथेच होणें स्वाभाविक आहे. त्या साठीं चौथ्या अंकांतील अकबराचे प्रकरण आधी घेऊन त्याचा पदर मुख्य कथानकांत गुंफून टाकण्यास हवा होता पदें सुबोधरम्य व प्रसादपूर्ण आहेत.

केसरी २ जानेवारी १९३४

नाटकाचा कथाभाग नाटककारांनी ऐतिहासिकपणा तपासून संतपदास पोंचलेली उदेपूरची महाराणी मिरा, ही ऐतिहासिकदृष्ट्या कशी असेल असें दाखविण्याचा प्रयत्न केलेला नाहीं त्यांनीं कथाभागाची मुख्य मदार इंदूरचे रा. भवनराव ठाकुरदास यांच्या प्रसिद्ध झालेल्या मीराबाईच्या चरित्रावर ठेवली आहे. त्यांत त्यांनीं जो फरक केला आहे तो मिराबाईच्या

श्रीकृष्ण भक्तीवर आणि तिच्या भूतदया प्रीतीत धर्मावर योग्य प्रकाश व्हावा म्हणून केला आहे, हे फरक धरून नाटककारांनीं नाटकांत जीं मुख्य पात्रें खेळविली आहेत त्यांचे गृहीत धरलेले स्वभाव आणि ज्या कारणाकरितां विशिष्ट तऱ्हेनें प्रत्येक प्रमुख व्यक्तिचा स्वभावाची ठेवण गृहीत धरण्यांत आली, त्याला परिपोषक होइल अशा रितीनें स्वभावरेखन झाले कीं नाहीं याचा विचार सहजीं उद्भवतो. मिराबाईच्या चरित्राचा आविष्कार करण्यासाठीं तीन प्रमुख झगड्यांचें वर्णन या नाटकांत करण्यांत आले आहे. पहिला झगडा रयदास आणि राणाकुंभ यांच्या मधील आहे दुसरा विद्याशंकर आणि रायदास यांच्यामधील आहे. आणि तिसऱ्या झगड्यांत अकबर आणि राणाकुंभ हे प्रतिस्पर्धी म्हणून नाटकांत पुढें येतात या झगड्यांच्यां दृष्टीनें मीराबाई, रयदास, विद्याशंकर, अकबर, आणि राणाकुंभ ह्या व्यक्ती प्रमुख ठरतात. अर्थातच ह्या सर्व झगड्यांचें केंद्र मीराबाई असल्यानें मीराबाईला स्वाभावीक पहिलें स्थान प्राप्त होतें

नवाकाळ ९ नोव्हेंबर १९३४

आंधळ्यांची शाळा पृ. १४६ ले. श्री. वि. वर्तक, बी. ए. प्र. ग्युटोरियल प्रेस, गिरगांव बॅकरोड, मुंबई जुलै १९३३ किं. १ रु

नवीन धर्तीचें व नवीन विचारांचे हे नाटक रंगभूमीवर पहातांना जितकें मनोवेधक वाटेल तितकें वाचतांना वाटणार नाहीं कथानक अगदीं साधे आहे व रंगभूमीला सुयोग अशी त्यांची मांडणीही आहे. पण भाषा मात्र तितकीशीत चांगली नाहीं. तो कांहींशी खडबडीत, मिशनरी धर्तीची व पाश्चात्य थाटाची आहे. निंबेच्या निष्पाप वृत्तीचा नाटककारानें एवढा गवगवा केला आहे कीं तो कोणालाही अस्वाभाविक व असमर्थनीय वाटल्यावाचून रहात नाहीं. शेवटच्या अंकांत कुमारने बिंबेला हवे तसे वाकून घेउन आपलें पापी अंतःकरण उघड केलें तरी देखील बिंबा त्याच्याशीं लग्न करावयाला उद्युक्त होतें याचे आश्चर्य वाटतें जगाला आंधळ्यांची शाळा म्हणण्यापेक्षां आपले पाप सफाइनें कसे लपवावें हे शिकविण्याची शाळा असें ह्या नाटककाराचें म्हणणे असावे असा वाचकांचा सहजिकच ग्रह होतो. आपल्या समाजस्थितीला अर्थातच अशा प्रकारचा आदर्श नको आहे हें स्पष्ट होते.

चित्रमयजगत सप्टेंबर १९३३

नाट्यपरीक्षण 'प्रतिभा ३१ जुलै १९३३

परीक्षक—श्री. रा. टिकेकर

नाट्यपरीक्षण प्रतिभा ३ जुलै १९३३

परीक्षक— वि. ह. कुळकर्णी एम. ए.

उत्तरक्रिया पृ. १०१ ले. बॅ. विनायकराव सावरकर, रत्नागिरी, जुलै १९३३ किं १९.

पानपतच्या युद्धांत मराठेशाहीची जी अतोनात हानी झाली व तिचा सूड म्हणून पहिल्या माधवरावांच्या कारकिर्दींत उत्तरदिग्विजयाची जी प्रचंड कामगिरी यशस्वी रीतीनें केली गेली त्या प्रसंगावरच हें नाटक उभारण्यांत आलें आहे. नाटकाची भाषा तडफदार व वीरश्री उत्पन्न करणारी आहे व पात्रांचें स्वभाव दिग्दर्शन आणि कथासूत्ररचनेची कला या बाबतींत हें नाटक सरस उतरलें आहे

किर्लोस्कर मार्च १९३४

पुस्तकपरीक्षण-केसरी ३ नोव्हेंबर १९३३

उसना नवरा—ले. व प्र. रा. ना. धों. ताम्हणकर, किर्लोस्करवाडी.

एखाद्या सामान्य ऐपतीच्या माणसाच्या येथें वरशोधनाचा प्रसंग उद्भवल्यास तो आपली ऐपत आहे त्यापेक्षां चांगली दिसावी या हेतूनें बिछाइतें गालिचे, पानसुपारीचें चांदीचें

सामान वगैरे वस्तु दुसरीकडून मागून आणून सर्व थाट यथास्थित रीतीनें करतो. प्रस्तुत प्रहसनांत अशा प्रकारें श्रीमंती थाट जमवून पूर्ण बतावणी योग्य प्रकारें करण्याची साग्र-संगीत सिद्धता झाली आहे. तींत एक उसना नवरा उभा करण्याचीही आवश्यकता उद्भवून अखेर गंमत कशी उडाली याचें चित्र चट-कदार रीतीनें यांत वर्णन करण्यांत आलें आहे. प्रस्तुत प्रहसन एका अमेरिकन ना-टकाच्या आधारें लिहिण्यांत आलें आहे. मूळ आधारास मराठी पेहराव चढविण्याचें काम पुस्तककर्त्यांनीं चांगल्या प्रकारें केलें आहे.

ज्ञानप्रकाश ३ नोव्हेंबर १९३३

गरीब मजूर—पृ. ६८ ले. वि. र. कुळ-कर्णी प्र, व्ही. आर. पाठारे मुम्बई नोव्हेंबर १९३३ किं. ८ आणे.

मजुरांनी मालकी हक्काच्या दाबाखाली नेहमी दबून रहावें अशी परिस्थिती मातबर व अरेरावी वृत्तीच्या मालकांनी कशी करून ठेवली आहे व मजुरांचा पावलो पावली कसा पाणउतारा केला जातो याचा एक मासला या नाटकांत श्री. कुळकर्णी यांनी उत्तम प्रकारें रंगविला आहे. केव्हा वेळेस श्रीमंतीत लोळणारे मालक आपल्या धर्मपत्नीच्या डोळ्यांत धूळ फेकून मजुरांच्या बायकांचा कोणत्या प्रकारचा छळ करतात व रंजले गांजलेले मजूर मारवाडी व पठाण लोकांकडून कसे छळले जातात यांचेंही उदाहरण या नाटकांत सुंदर रीतीने मांडलेले आहे

नवजीवन खास अंक १९३४

नाट्यपरीक्षण 'संजीवनी' ३० नोव्हेंबर १९३३

गोकुळचा चोर सचित्र पृ. ४४ ले. व प्र. जी. आर. शिरगोपीकर, मुंबई सप्टेंबर १९३३ किं. १२ आणे.

घोषयात्रा अथवा शकुनीचा फासा पृ. २३१ ले. व प्र. किरात, पत्ता—कृ. ल. सोमण, किरातकुटीर बेळगांव जुलै १९३३ किं. १ रु.

घोषयात्रा म्हणजे गाईचे खिलार पाहा-ण्याचें निमित्त करून पांडव ज्या द्वैतवनांत राहत होते त्या वनांत दुर्योधनप्रभृति कौरव व त्यांची बायकामुलें यांनी जावयाचे आणि पांडवांना आपल्या वैभवाचा दिमाख दाखवून लाजवावयाचे असा बेत शकुनी मामांनी केला व तो दुर्योधनाच्या मनावर बिंबविला. त्या पूर्वी जयद्रथाला पाठवून द्रौपदीचें हरण कर-ण्याचा झालेला प्रयत्न पांडवांच्या पराक्रमापुढे फसला होता. घोषयात्रेस कौरवांनी जाऊन दुर्योधनाची स्त्री भानुमती हिनें द्रौपदीला लाज-विले तथापि दुष्ट बुद्धीचें कटु फळ कौरवांना चाखावयांस द्यावयाची विधिघटना होती. तिच्या-मुळे चित्ररथ गंधर्वाने सर्व कौरवांना त्यांच्या बायकामुलांसुद्धा कैद केलें अशा संकटसमयीं पांडवांनी त्यांना स्वशौर्यानें शत्रूच्या कैदेतून सोडविलें. त्या प्रसंगाने कौरवानांच शतपट लाजविले. प्रस्तुत नाटकांत द्रौपदी भानुमती यांजमधील स्वभावविरोध फार चांगल्या रीतीने दाखवून द्रौपदी विषयीं वाचकांचा आदरभाव वाढविला आहे. तसेंच धर्मराजाचें औदार्य आणि दुर्योधन, शकुनि प्रभृतींचा क्षुद्र स्वभाव नजरेसमोर उभा करून पांडवांचे थोरपणांत उठाव आणिला आहे. द्रौपदीच्या तोंडीं घात-लेला पतिव्रताधर्म आदर्शवत होय. धर्म व नीति यांचें अधिष्ठान बळकट करणे हाच ललि-तावाङ्मयांत प्रधान हेतु असल्यास तें वाङ्मय कसें आनंददायक होतें याची प्रतीति प्रस्तुत नाटक वाचून चांगली येते. या नाटकांत विनोदी कोट्या, सुभाषितें यांचा तुटवडा असला व नाटक फार मोठे असले तरी घोषयात्रेचें

कथानक मनोरंजक रीतीने समजण्यास झाली ही सजावट पुरेशी आहे, असेंच आम्हास वाटतें

केसरी २० नोव्हेंबर १९३४

जयाजी आणि कमळजा अर्थात कट फिसकटला—पृ. ११० ले. कृ. ल. सोमण प्र. चित्राशाळाप्रेस १०२६ सदाशिवपेठ पुणें जुलै १९३३ किं. १२ आणे

डेक्कन क्वीन पृ. ९६ ले. ग. कृ. फाटक प्र. वि. आ. घैसास टिळकवाडी घ. नं.१९३ (६) पुणें १९३३ किं. १ रू.

मजूर व मालक हा झगडा नव्याने उत्पन्न झाला आहे. तो वाढतो कसा व तो मिटविता कसा येईल हें नाटकांत बऱ्या प्रकारें दाखविले आहे. दक्षिणगड संस्थानांतील सरकारी डेक्कन क्वीन या गिरणींत मजूरांच्या तक्रारी दूर व्हाव्या म्हणून दौलतराव नांवाच्या गृहस्थाने संप घडवून आणला. तो संप मोडण्यासाठीं संस्थानचे दिवान शैलेन्द्रबाबू व दुसरे अधिकारी लाला डांगरसिंग व तर्कठप्पा यांनी मजूरपुढाऱ्यांचा पुष्कळ छळ केला. पुढे हा अन्याय संस्थानाचे अधिपति महाराज प्रतापसिंह यांच्या ध्यानीं येऊन त्यांनीं वरील तीनही अधिकाऱ्यांस कामावरुन कमी केले. तेव्हा त्यांनी महाराजांचा खून करण्याचा प्रयत्न केला सरकारी अधिकाऱ्यांचे दुष्ट प्रयत्न दरवेळीं शैलेंद्राचा पुत्र अरविंद व त्याची रखेली गुलशन यांनी हाणून पाडले. अखेरीस महाराजांनी डेक्कन क्वीन मजूरांना बक्षीस देउन दुष्टाचे पारिपत्य केलें. असे या तीन अंकी गद्यात्मक नाटकांचे कथानक आहे. व ते बरें रंगविले आहे. नाटकांत विनोदी पात्रें मरेटप्या गद्धेप्रसाद व डॉ. जमीनदोस्त हीं घातली आहेत त्यांचा मुख्य कथानकाशीही काडीचाही संबंध नाही. हीं पात्रे वगळून नाटक केल्यास मुख्य कथानकाची हानि मुळींच होणार नाहीं नाटकांत विनोद पाहिजे म्हणून तो कसा तरी व कोठे तरी दडपण्यांत कला नाहीं. नाटकाच्या मुख्य संविधानकाशी संबद्ध व सहज साधणारा विनोद नाटकाला खरा पोषक होतो. तो या नाटकांत मुळींच साधला नाहीं

केसरी १७ आक्टोबर १९३३

तिकडची शोभा पृ. ५० ले. रा. ना. वि. कुलकर्णी प्र. वि. वा. मोडक शाहपुरी कोल्हापूर. किं. ३ आणे,

क्षमा ही या प्रहसनाची नायका होय. ती विधवा होती ती आपला भाऊ भैया या जवळ रहात होती. वसंतराव व हेमंतराव हे दोन प्रष्ठित गणल्या जाणाऱ्या गृहस्थांची क्षमेवर पापी दृष्टी होती वसंतरावव हेमंतराव हे दोघेही आपणांकडे यावेत व त्याच वेळेस त्यांच्या बायका अनुक्रमे हंसा व ज्योत्स्ना याही याव्यात अशी क्षमेने क्लृप्ति योजली होती ती यशस्वी ठरुन वसंत व हेमंत हे दोघेही बायकांच्या पकडींत सांपडून फजीत पावले! असें या प्रहसनाचे थोडक्यांत अनुसंधान आहे प्रहसन असावे तितके चटकदार नसले तरी बरेच मनोरंजक झालें आहे.

ज्ञानप्रकाश ५ जानेवारी १९३४

दांपत्य-रहस्य—पृ.११२ ले. विश्वनाथ गणेश ताम्हणकर प्र. एन. भिडे, बी. ए. मी डर्न बुकडेपो, बुधवार पेठ पुणे आक्टोबर १९३३ किं. १ रू.

समाजांत गुप्तपणे चाललेले पण हरघडी आढळून येणारे कांहीं प्रसंग व स्पष्टपणे बोलता न येणारे कांहीं विचार मांडुन दाखविण्यांत लेखकाने बेछुट निर्भडेपणा व बेफाट स्वच्छंदीपणा दाखविला आहे. कित्येक ठिकाणीं अतिक्रम झालेला दिसला तरी तो तत्त्वप्रतिपादनासाठीं आहे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. दांपत्यसुखाला पोषक व उपयुक्त अशा कोणत्या

गोष्टी आहेत त्या लेखकानें खुबीने सांगितल्या असून तदनुषंगानें उपवर-वधूवर.संघ, धीधूम्रपानमंडळ, कुटुंबक्षम, दोन नवऱ्यांची बायको तात्पुरते लग्न इत्यादि कल्पनाही पुस्तकांत आणल्या आहेत. मांडणी अव्यवस्थित व कलाशून्य असली तरी तें मनोरंजक व उद्बोधक झाले आहे. पुस्तकाला 'समाज स्वास्थ्य' हें नांव सर्वात अधिक शोभून दिसलें असतें.

चित्रमयजगत आक्टोंबर १९३३

नामदार A. S. S. पृ ३३ ले ना. रा. बामणगांवकर प्र. चित्रशाळाप्रेस पुणें जुलै १९३३ किं. ४ आणे.

या नाटिकेंत अंताजी नांवाच्या एका खानदानी घराण्यांतला पुरुष रावबहादुरी कौंसिलदारी वगैरे मानसन्मानाच्या नादीं लागून आपल्या सर्व जिनगीचा स्वाहाकार कसा करतो हें दाखविलें आहे यांने आपली बायको यशोदा घरा घालवून दिला ही गोष्ट त्याची मुलगी मैना हिच्या अर्थातच जिव्हारी लागली होती. यशोदा रावबहादुरांच्या दारांत भीक मागण्यास येई तेव्हां तेव्हां ते तिला गचांडी मारून घालवून देण्यास ते भैय्याला सांगत. भैयाचें अंतःकरण सहृय असल्या मुळे त्याच्या हातून ही गोष्ट होत नसे. यशोदेची स्थिती पाहुन मैनेचेही काळीज तुटे. डॉ. कुसुम व बॅं. बळवंतराव हे रावबहादुरांच्या मूर्खपणावर चरणारे होते. डॉ. कुसुम व रावबहादुर यांचे लग्न ठरते. पण श्रीधरपंतांच्या कारवाईनें तें फसते. शेवटीं रावबहादुरांना पश्चात्ताप होऊन त्याचें यशोदा व त्यांचा मुलगा प्रताप यांच्याशी संमीलन होते प्रहसन अगदींच घोपट स्वरूपाचे आहे. कलेचा त्याला कोठें संसर्गही पडलेला दिसत नाहीं

ज्ञानप्रकाश ५ जानेवारी १९३४

प्रजेचा राजा–पृ. १०२ ले. भ. य. म्हैसाळकर. प्र गो. र. शिरगोपीकर मुम्बइ आगस्ट १९३३ किं.१२ आणे.

बनावटांचा बाजार–पृ. ९४ ले. व प्र. ए. सी. शेडजळे, सोलापूर. नोव्हेंबर १९३३ किं.८ आणे

अस्पृश्यता निवारण विषयक नाटिका

भोलाशंकर (संगीत)–ले. य. गो. जोशी प्र. गणेश महादेव आणि कं ५०८ सदाशिव पेठ पुणे १९३३ किं. १ रु.

लग्नसोहळा–पृ. ९६ ले. ल. ग. मुळे प्र. वि. वा. मांजरेकर सहकारी मनोरंजन मंडळ दामोदर हॉल परेल मुम्बइ जुलै १९३३ किं. १२ आणे.

हें विनोदी नाटक एका इंग्रजी नाटकाच्या आधारे रचलेले आहे. त्याचें स्वरूप 'संशयकल्लोळच्या छापाचें आहे. परन्तु भेद इतकाच कीं, यांतील व्यक्ति स्वतःच्या अकलहुशारीने व हेतुपूर्वक घोटाळ्याचें जाळें विणतात. निशेने सुषमेचें व सुषमेने नंदिनीचें सोंग घेऊन उत्पन्न केलेली चमत्कृति मनुष्यस्वभावाला धरून कितपत आहे हा एक प्रश्न असला तरी तिच्यामुळे प्रेक्षकांना मौज वाटण्यासारखी आहे यांत संशय नाहीं सर्वच कथानक कुतूहलाच्या व आनंदाच्या धारा उठविणारे आहे. पद्यें मधुर आहेत.

केसरी १० नोव्हेंबर १९३३

शिवाजीला सह–पृ ९६ ले. य. गो. टिपणीस प्र. परचुरे पुराणीक आणि मं माधवबाग, मुम्बई जुलै १९३३ किं. १ रु.

संगीत गीता नाटिका– ले. व प्र. का खं. गर्दे, नागपूर १९३३ किं. ३ आणे

सत्य सावित्री–पृ ६१ ले. आर. बी. कीर्लोकर. प्र. व्ही. बी. झावबा, मुम्बई जुलै १९३३ किं. ८ आणे.

सत्याग्रही-पृ. १२८ लेखक—सदाशिव अनंत शुक्ल प्रकाशक परचुरे पुराणीक आणि मंडळी बुकसेलर्स ॲंड पब्लिशर्स, मुम्बई नं. ४ डिसेंबर १९३३ किं. १ रु.

मे. गांधी सत्याग्रहाच्या तत्वाचें प्राचीनत्व सांगतांना ध्रुव प्रल्हादादीचीं नांवें घेतात. श्री. शुक्लांनीं या नाटकांत ध्रुवाख्यान रंगविलें असून ध्रुवाख्यानांत ध्रुवाच्य दोन्हीमाता उत्तानपाद हा पिता व नारदमुनि यांचा संबंध प्रामुख्यानें येत असला तरीं नाटकाच्या रचनेकरितां श्री. शुक्लांना कांहीं काल्पनिक पत्रें व प्रसंग यांची योजना करावी लागली आहे. तसें करतांना क्वचित मुळांत कदाचित अस्वाभाविक वाटणारे कांहीं भाग आले आहेत. श्री शुक्ल हे नाट्य लेखनांत वरेच प्रविष्ठ झाले असल्यानें भाषेची ठाक ठिकी वगैरे लेखनाचे कित्येक गुण प्रस्तुत 'सत्याग्रही, नाटकांत दिसतात नवाकाळ १८ जानेवारी १९३४

या नाटकांत बालभक्त ध्रुवाचें कथानक कांहीं नवीन व खुशखुशीत मालमसाला घालून व मुळांत चमत्कृतिजनक फेरफार करून चित्रित केले आहेत. कथानकांचा गाभा शक्य तो जसाचा तसा ठेवण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. उत्तानपाद सुरुची आणि सुनीती या पात्रांचे विडंबन करण्याच्या हेतुने मंढळ, दयावतां व मायावंती या त्रिकुटांचे जे संसारचित्र दाखविलें आहे तें मुळाला उठाव येण्याच्या दृष्टीनें सांधले आहे. कथानकांत विनोदाला स्वभाव सिद्ध वाव नाहीं. त्यामुळे मंडलाचे उपकथानक प्रतिच्छायारूप होऊनही प्रेक्षकांचें विनोदस्थान होऊं शकतें यांतच लेखकाची योजकता दृष्टोस पडते. उत्तमाचे नवीन पात्र निर्माण करण्यांत नाटककाराच्या कलाकतेचा उत्कर्ष आहे. असें आम्हांस वाटते. कारण, ध्रुवाख्यानाला सापत्नभावाची जो पार्श्वभूमी आहे. तिला अधिक खुलावट येण्यासाठीं सुरुचीच्या पोटीं एकादा पुत्र असण्याची आवश्यकता होतीच. त्यामुळे मुळांतल्या सावत्रपणापेक्षां सत्याग्रहांतील सावत्रपणा अधिक उठावदार आहे. कांहीं ठिकाणी आणलेले नाट्यच त्वार चिकित्सकाला असमर्थनीय वाटतील, आकाशवाणी, गरुडविमान, उत्तमाचा पुनर्जन्म इत्यादी चमत्कार सर्वसाधारण प्रेक्षकवर्गाच्या अभिरुचीच्या दृष्टीनें अनुपयुक्त आहेत. असं कोणीही म्हणणार नाहीं. तथापि श्री. शुक्ल यांनीं शक्य तों असंभाव्य चमत्कारांना फाटा देऊन बुद्धिगम्य व तर्कशुद्ध प्रसंग चित्रित केले आहेत. नाटकांत कालविपर्यासाचा एक मोठा दोष शिरला आहे. ध्रुवाला अढळपदाची प्राप्ति होण्यापूर्वी नारद वेळी अवेळी अढळपदाबद्दल जे उद्गार काढतो ते अस्थानी व अप्रयोजक वाटतात. श्री. शुक्लांच्या भाषेत यमके, अनुप्रास व अटके खटके वैपुल्यानें असल्यामुळे बहुजनसमाजाला ती मनोरंजक वाटल्यास नवल नाहीं.

चित्रमयजगत आगस्ट १९३४

पुस्तकपरीक्षण यशवंत सपटेम्बर १९३४
परीक्षक श्री. पंडित

सत्याचे वाली-पृ. ८० के. पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे एम. ए. ६९० बुधवारपेठ पुणें आगस्ट १९३३ किं. १२ आणे.

सत्य हे अत्यंत कठोर असून व्यवहारांत त्याला अधिष्ठान नाही, अशी प्रत्येक व्यावहारीक माणसाची ठाम समजूत असतें. मात्र दुसऱ्यांनी सत्यच्युत होतां कामा नये, अशीही त्याची अपेक्षा असते. हे तत्व व्यवहार इथ्या कसें काय दिसतें ते दाखविण्या साठी श्री. सहस्रबुद्धे यांनी ही नाट्यरचना केली आहे, ह्या नाटकाला ' सत्याचे वाली', ह्या नावापेक्षा सत्याचे मारेकरी हें नांव अधिक शोभून दिसेल कथानक मनोरंजक व आकर्षक असून भाषाही

साधी व सुटसुटीत आहे. अशा प्रकारची तत्व-प्रतिपादक नाटकें रंगभुमीवर आली पाहिजेत.

चित्रमयजगत सपटेम्बर १९३३

**सदा बंदिवान** पृ. ४८ ले. भार्गवराम विठ्ठल वरेरकर, प्र. दत्ताराम रामकृष्ण देउळकर बाँबे बुकडेपो, मुंबई नं ४ नोव्हेंबर १९३३ किं. ४ आणे.

सध्यां तीनताशी नाटकांची जी टूम निघाली आहे, तिला धरूनच हें नाटक लिहिलेले दिसतें. नाटकास ' गद्यपद्यात्मक ' म्हटलें आहे; परंतु त्यांत पद्यें अशीं चार-दोनच आहेत. नाटकाला ' सदा बंदिवान ' असें जें नांव देण्यांत आलें आहे, तें ' सत्तेचे गुलाम ' या प्रमाणेंच कोणालाहि लागू पडणारें आहे. स्त्रिया या सदा बंदिवान असें म्हणावें, तर रेणू या पात्राच्या तोंडीं तिसऱ्या अंकांत जो स्वतःला स्वतंत्र मानून दुसऱ्याला बंदिवान समजतो ' इ. त्यास हिणविणारीं कांही वाक्यें घालण्यांत आलीं आहेत. त्यावरून सर्वच सदा बंदिवान आहेत असें दर्शविण्याचा नाटककाराचा रोख दिसतो. वारंवार तुरुंगांत जाणारा (जेलबर्ड) म्हणूनहि चंदूला ' सदा बंदिवान ' हे विशेषण लावतां येईल. । नाटकांचें कथानक जगांतून उठलेल्या किंबहुना निसवलेल्या लोकांना निवडून-वेचून बनविलेलें आहे. त्या दृष्टीने ' इथं माणुसकीचा साराच अभाव आहे ' हे चंदूच्या तोंडीं नाटककाराने घातलेले शब्द अक्षरशः खरे आहेत. केसरी ५ डिसेंबर १९३३

आपल्या नाविन्यपूर्ण व ओजस्वी नाटकांनीं मराठी रंगभूमीला नवीन वळण लावणारे नामांकित नाटककार श्री. वरेरकर याचे हें छोटेखें नाटक त्यांच्या लौकिकाला साजेसेंच झालें आहे. कथानक आदीं साधेसुधेंच असलें तरी तें इतकथा जिव्हाळयानें रेखाटलें आहे कीं, तें वाचकाचें हृदय काबीज केल्यखेरीज रहात नाहीं. रम्यवेधकता हा नाटकाचा मुख्य गुण सांगतां येईल. चंदू रेणू, व अरुणा हीं तीन पात्रें स्वभावपरिपोषाच्या दृष्टीने उल्लेखण्यासारखीं आहेत. वरेरकरांच्या ' जागती ज्योत ' या नाटकांतील नायिकांची दाट छाया रेणू व अणूवर पडलेली आहे. विनोद नसूनाही विनोदाची जरूर आहे असें भासत नाहीं. परिणामकारक नाटिका लिहाव्यात वरेरकरांनींच; असें ही नाटिका वाचून कोणाचेंही मत झाल्यावांचून राहाणार नाहीं. चित्रमजगत डिसेंबर १९३३

## लघुकथा व गोष्टी

**आक्कासाहेब** पृ. १०४ ले. व. प्र. वि. वा. हडप, पुणे, आक्टोबर १९३३ किं. ४ आणे.

**अपॉलो बंदरावर**—ले. अ. तु. वाळके, प्र. पद्मनाभ विष्णु जोशी, सोमेश्वर मुद्रणालय, उमरावती डिसेंबर १९३३ किं. १ रु.

ही एक लघुकथा असून तिच्यांत मुख्य पात्रें दोन आहेत. एक वसंत व दुसरें प्रभावती. वसंत हा स्वभावाने गंभीर व दुसरा आणि प्रभावती विचाराने व वाचनाने पुरुषश्रेष्ठी व स्त्रियांच्या हक्कांसाठी भांडणारी. अशा दोघांचें परस्परांवर प्रेम जडणें व तीं विवाहबद्ध होणें हें कठीण, किंबहुना अशक्य. पण अशी अशक्य गोष्ट घडवून आणण्यांतच लेखक स्वतःस कृतकृत्य समजत असतात. वसंत व प्रभावती हीं दोघें तरुणच. त्यामुळे त्यांचे विचार अस्थिर व मन चंचल असावें हें स्वाभाविक. त्याप्रमाणे वसंत व प्रभावती यांची अपोलो बंदरावर होडींतून हिंडत असतां दृष्टादृष्ट झाली व त्या उभयतांच्या मनांत प्रेम विकासाने ठाणें दिलें. परंतु दोघांना एकमेकांच्या मनाची पारख झाली नव्हती. ती करून घेणें व

त्यांचा विवाह जमणें याला जरूर असणारी उलढाल हेंच थोडक्यांत प्रस्तुत पुस्तकाचें कथानक आहे. कथानकाची मूळ कल्पना वाळके यांची असल्यास श्रेयस्करच; परंतु कथा वाचीत असतां ती एखाद्या इंग्रजी कथेचें रूपांतर नव्हे ना, असें मात्र मनांत आल्याशिवाय रहात नाही. असो. वाळके यांनीं वसंताच्या मनाचीं पुढें कुशलतेनें उकलली असल्यामुळे त्यांचें अभिनंदन करावेसे वाटतें. एरवी या लघुकथेंत प्रशंसनीय असें कांही नाही

केसरी १६ फेब्रुवारी १९३४

एका प्रेमिक विचारी मनाची एका तरुणीच्या दर्शनानें, परिचयाने व स्वभाव वैशिष्ट्यामुळें जीं स्थित्यतरें अल्पावकाशांत झाली त्यांचें वर्णन या दीर्घ कथेंत रा. वाळके यांनीं केले आहे. यांत वर्णिलेली मनाचीं स्थित्यंतरें घडुन येण्यासाठी योजिलेल्या घटना साध्याच आहेत. त्यांत नाविन्य फारसें नाहीं. लेखकाची भाषा बोजड व अकारण संस्कृत प्रचुर असल्यानें वाचकाला वारंवारे बिचकल्यासारखें होते. कथानकाचा शेवट कांहिसा अपुरा वाटतो हें खरें असलें तरी विचारी वाचकांना या पुस्तकाच्या वाचनानें आनंद होईल यांत शंका नाहीं.

किर्लोस्कर मार्च १९३४

कालिंदीची कैफियत–पृ, ९६ ले. व. प्र. वि. वा. हडप पुणे आगस्ट १९३३ किं. ४ आणें.

तिच्याकरिता–पृ. ११५ ले. कॅ. गो. गं. लिमये. प्र केमकर आणि मंडळी, बुकसेलर्स गिरगांव बॅकरोड मुंबई ४ आगस्ट १९३३ किं. १२ आ.

प्रस्तुत कथासंग्रहाचे ‘ तिच्याकरिता ’ हे नांव आणि कॅ. लिमये हें लेखकांचे नांव यांचा मेळ घालून या पुस्तकापासून शृंगार व हास्य या दोन रसांची अपेक्षा कोणी केल्यास ती सयुक्तिकच ठरेल. परंतु पुस्तकांतील सातहि गोष्टी वाचल्या नंतर त्याला निराळाच अनुभव येईल. आरोग्यविषयक कल्पनांचा प्रसार सर्वत्र व्हावा या हेतूने देवी, क्षय, वगैरें रोगांचें वर्णन मध्यस्थानीं कल्पून त्याच्याभोंवतीं पात्रांची व प्रसंगांची उभारणी केलेली आहे. गोष्टीची झालर कांही ठिकाणी मनोहर आहे हें खरें, पण गोष्टीच्या वाचकाचें मन वेधून घेण्याचें उद्दिष्ट या पुस्तकाला कितपत साध्य होईल याबद्दल शंका वाटते. पूर्वी गुळाच्या गोळीत कोयनेलची पूड घालून देत, त्या वेळी कोयनेल बहुधा गुळाच्या बाहेर पडे आणि रोग्याचें तोंड कडू होई, तसा प्रकार बहुतेक गोष्टीचे बाबतीत झाला आहे. लघुकथांचा उपयोग समाजहिताकडे प्रत्यक्ष पणें करण्याची लेखकाची कल्पना प्रशंसनीय आहे; मात्र तितकीच ती जोखमीची असल्यामुळे. कथेच्या कवचीतून रोगनिदानाची व्याख्याने बाहेर दिसणार नाहीत याची काळजी त्याने घेतली पाहिजे.

केसरी २ जानवारी १९३४.

तुमच्यांतीं कांहीं पृ. ३१ ले. व प्र. केशव गणेश नाईक ३५ तुलसीदास तेजपाल दादर. जुलै १९३३

या छोटा पुस्तकांत चार लघुकथा दिल्या आहेत. चारहि लघुकथातून ‘आपली विवाह-पद्धति’ हाच विषय प्राय: प्रतिपादिला आहे. मनोविनोदापेक्षां उद्बोधकनाकडे लेखकाचा केल असून सुचक लिहिण्याची हातोटी लेखकाला

चांगली साधली आहे. लेखनांत वेगळेपणा असल्यानें विषय जुना सूनहि कथा वाचनीय वाटतात. किर्लोस्कर आक्टोबर १९३३

त्रिवार दफन पृ. १०० लें. व प्र. बी बी. नायडू जळगांव सप्टेंर १९३३ किं.८आ.

दिलावर (एक भावकथा) पृ. १३८ ले:—कासमखान महंमदखान दलवाई. मिरजोळी काशक—आत्माराम गोपाळ ढाकवे चिपळूण. जि. रत्नागिरी जुलै. १९३३ किं. १ रु.

मुसलमान गृहस्थानें मराठींत लिहिलेली भावकथा अलीकडच्या काळांत बहुधा हीच पहिली आहे.

या भावकथेंत दोघां हिंदु व मुसलमान मित्रांअ स्नेहाचें आणि त्यांनो परस्परावर आणि परस्परांच्या कुटुंबीयांवर केलेल्या अकृत्रिम प्रेमाचे यतार्थ दर्शन अहे. अशा रीतीचे स्नेह संबंध आणि सौहार्द जर या दोन जमानीत सर्वत्र प्रचार पावूं लागले आणि अशा तऱ्हेच्या पुस्तकांनीं तें होण्याचा विपेश संभव, तर हिन्दुस्थानच्या अंतिम आकांक्षा सुफलित होण्याला ते अत्यंत साह्यभूत होतील यांत शंका नाहीं प्रस्तुत भावकथा जरी वरील उद्देश्यानें लिहिलेली नसली तरी तो उद्देष साध्य होण्यास मदत करणारी ती खास आहे. हिंदु मुसलमान समाजांतील श्रेष्ठ पुरुषांनीं परस्पराच्या गुणांचें च केवळ वर्णन करणारीं आणि एकमेकांचा आदर ठेवून परस्परांत प्रेमसंवर्धन धडवून आणणारीं अशीं पुस्तकें लिहून प्रसृत केल्यास हिंदुमुसलमानांच्या ऐक्याच्या दृष्टीनें फार उपयुक्त होइल. 'दिलावर, या भावकथेच्या लेखकाचा हा प्रयत्न त्या दिशेला नेणारा होईल असें आम्हांस वाटतें व याबद्दल त्यांचें अभिनंदन केल्यावांचून राहवत नाहीं.

नवा काळ १४ जून १९३४

सुप्रसिद्ध साहित्यसेवक श्री, वि, ल, भावें यांनीं या कथेला लिहिल्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणे तीत कादंबरीचें कलातंत्र नसलें तरी मातृभाषेविषयीच्या अभिमानाचे मुसलमानांत सहसा न सांपडणारे, हार्द मात्र फार दृष्टीस पडतें त्याच प्रमाणे कथानकांची गुम्फण जरी कुशलतेची नसली व क्वचित तीत भाषादोषहि असलें तरी विचारांचे औदार्य मात्र जागोजाग आढळतें

महाराष्ट्र १ आगस्ट १९३४

नंदकुमार—पृ. ७० ले. द, पादंडी प्र. यशवंत प्रकाशन संस्था बेळगांव किं. ७ आणे.

यात नंदकुमार व शैवलिनी आणि नरेंद्र व हेमलता या दोन तरुण जोडप्यांचा प्रणयावर गोष्टीची उभारणी करण्यांत आली आहे, एकंदर ऊभारणी अस्वाभाविक प्रसंगावरच झाल्याचें दिसून येतें, त्यांत कलेचा भाग तर दिसत नाहींच पण येथून तेथून अस्वांभाविक प्रसंगाची रेलचेल उडून गेल्याचें दिसून येतें. गोष्ट लिहिली गळी नसती मराठी वाङ्मयाचें कांहीं नुकसान झालें असतें असें आम्हांस वाटत नाहीं

ज्ञानप्रकाश २६ जानेवारी १९३४

मानसलहरी पृ. १८०—ले, कृष्णाबाई, प्र.प्र. श्री कोल्हटकर, मंबई नं, ४, १९३३ किंमत १ रू,

मानसलहरी या लघुकथा—संग्रहांत एकंदर बारा कथा आहेत. संथ वाहणाऱ्या पाण्यावर वायूने आघात केल्याने त्यावर नाचूं लागलेल्या तरंगांनी जसा मनास आनंद होतो तसा आनंद या लहरी देतात. बहुतेक लघुकथा कांहीं विशिष्ट हेतूने, कांहीं तत्व प्रतिपादन करण्याचा हेतूने लिहिल्याचें दिसतें व तो हेतु बऱ्याच अंशीं सफल झालेला आहे.

पत्ता हरवला, पुराण-पुरुष या गोष्टी केवळ मनोरंजनासाठीं आहेत. त्यांतील विनोद चांगली साधला आहे. आमचे दास मातृऋणाची फेड, वर्षाव, शापित मनुपालटला, इत्यादि गोष्टी चांगल्या साधल्या आहेत. भाषा आकर्षक, विषयप्रतिपादन सुडौल, विचारप्रदर्शन भारदस्त आहे. मानसलहरी हा लघुकथासंग्रह वाचनीय व बोधप्रद आहे. अलीकडे लघुकथात जो एक बाष्कळपणा आढळतो तो यांत नाहीं ही अभिनंदनीय गोष्ट आहे.

केसरी ६ फेब्रुवारी १९३४

पुस्तक परिक्षण 'प्रतिभा' २ मार्च १९३४ परीक्षक कृ. ना. फडके बी. ए. एल. एल. बी.

पुस्तक परीक्षण स्त्री मार्च १९३४

परीक्षक श्री. भ. रा. देशपांडे एम. ए एल. एल. बी.

विकसन-सं ना. बा. शास्त्री प्र, स हित्यसंपादक मंडळ टिककरोड, नागपूर किं. १ रु

'विकसन, हें अत्यंत अन्वर्थक नांव असलेल्या या संग्रहांतील गोष्टी विकसित होतान्या कलिका आहेत. त्या भरघोस फुटलेल्या नाहींत किंवा त्यांच्या रंगांची संपूर्ण खुलाव झालेली नाहीं, असें म्हणून त्यांना नांवें ठेवणे म्हणजे अर्धोन्मीलित कळीला 'तूं पुरें फुललेलें फूल कां नाहीस? म्हणून दोष देण्यासारखें आहे. मराठी वाङ्मयाच्या दृष्टीनें अभिमानाची गोष्ट ही आहे की, नागपूर वऱ्हाडकडच्या बाजूला नव्या पिढीमध्यें इतके होतकरु लेखक एकदम उद्योन्मुखतेला येत आहेत. त्यापेकीं प्रत्येकांत उत्तम लघुकथालेखकाचे गुण बीजरूपानें आहेत. जे दोष आहेत ते पुढे उद्भूत होणाऱ्या गुणांचेच द्योतक आहेत.

प्रतिभा १६ फेब्रुवारी १९३४

पुस्तकपरीचय 'प्रतिभा, १६ फेब्रुवारी १९३४ परीचयकार श्री अनंत काणेकर

पुस्तक परीक्षण 'संजीवनी' १५ फेब्रुवारी १९३४ परीक्षक सौ. जान्हवीबाई अंजनकर

विधवेची हाक पृ. ९६ ले. व प्र. वि. वा. हडप पुणें सप्टेंबर १९३३ किं. ४ आणे.

वीस लाखाचें मृत्युपत्र-प्र. गणेश महादेव आणि कं सदाशिव पेठ, पुणे १९३३ किं. ८ आणे

सरला-ले. स. हृदय प्र. सहकारी ग्रंथकार गिरगांव मुंबई नं ४ आक्टोबर १९३४ किं. १-४-०

मराठींत आजकाल जे लघुकथासंग्रह प्रसिद्ध होत आहेत. त्यांतील आधुनिक एकलव्य कृत भावकथांच्या स्वरूपाचा हा संग्रह आहे. सूक्ष्म हृदयस्पर्शी भावना काव्योत्कट कलापूर्ण रचना, हे या संग्रहाचे प्रमुख विशेष सांगतां येतील. कथादर्शनाबरोबर वाचकाच्या भावनांवर नाजुक आघात करून त्याच्या हृदयांत सेथ खळखळ उत्पन्न करण्यांत या गोष्टींच्या तोडीच्या फारच थोड्या गोष्टी आढळून येतील. भाषा मुद्दाम काव्यमय व कलापूर्ण करण्याचा प्रयत्न केल्यामुळे कांहीं ठिकाणी अगदीं कृत्रिम झाली आहे. तथापि एकंदर भाषा प्रसादपूर्ण आहे. स्वर्गारोहण, राजकन्या, मुक्तता, सुकलेल्या फुलावरील अश्रु व नंदिनीचा वल्लभ या गोष्टीत सहृदयांची सहृदयता मार्मिक व कथाकौशल्य विशेष दिसून येतात. इतरही गोष्टी कमी मनोरंजक नाहींत. पिंजऱ्यांतील पांखरें या बालमानसशास्त्रावरील दोन्ही गोष्टी बोधप्रद असून त्यांना जोडलेली भूमीकाही विचारपूर्ण आहे. सरलेने मराठी लघुकथांच्या दालनांत एक अभिनव स्वरूपाची रम्य भर घातली आहे यांत शंका नाहीं, तथपि महाराष्ट्राच्या मनोवृत्तीला असलें भावनापूर्ण हळुवार व नाजुक लेखन मोठेसें रुचेल असें वाटत नाहीं

चित्रमयजगत जानेवारी १९३३

पुस्तकपरीक्षण ज्ञानप्रकाश २७ ऑक्टोबर १९३३

## कादंबऱ्या

कलंक शोभा–पृ. ३७६ ले. प्रो. नारायण सिताराम फडके एम. ए. प्रकाशक मौज प्रिन्टिंग ब्युरो, खटाववाडी गिरगांव मुम्बई जुलै १९३३ किं. २ रू.

ज्यांनी प्रो. फडक्यांचें परिशीलन केलें आहे त्यांना त्यांच्या या कादंबरींत अभिनव असें कांहींच अढळून येत नाहीं. प्रो. फडक्यांच्या अंगी सूक्ष्म निरीक्षण आहे. कथानकांची आकषर्क मांडणी कशी करावी हे त्यांना साधले आहे. पण कादंबरीत चित्रकाराशिवाय कादंबरीला रमणीयता नाहीं असा त्यांचा समज झाला आहे काय अशी शंका येते त्यांच्या चित्रकाराशिवाय दुसरा नायक किंवा जीवनाचे अन्यक्षेत्र त्यांच्या कल्पकतेला आणि निरीक्षणाला दिसत नाहीं काय? प्रो. फडके यांना चित्रकलेच्या पार्श्वभूमीवर समाजाच्या वरच्या वर्गाचें चित्र रेखाटावयाचें असल्यास त्यांनी तसे खुशाल करावे. परंतु त्यांत नवनवोन्मेषाची करामत त्यांनी करून दाखवावी अशी आमची त्यांना प्रेमाची सूचना आहे.

नवाकाळ ५ आक्टोबर १९३३

गोदू गोखले–उत्तरार्ध–पृ. २३५ लेखक श्री. मामा वरेरकर. प्रकाशक मौज प्रिन्टिंग प्रेस मुंबाई आगस्ट १९३३ किं. १॥ रू.

एका आधुनिक मुलीचे व पुरुष जातीचे प्रतिनिधिक चित्र श्री. वरेरकरांनीं रेखाटले असल्यामुळें सामाजिक विषयाच्या महत्वाच्या दृष्टिने काय किंवा वाङ्मयांतील उच्चदर्जाच्या व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीनें काय गोदू गोखले या कादंबरीस मराठी वाङ्मयांत विचारप्रवर्तक ग्रथांत स्थान आहे यांत शंका नाहीं.

सकाळ ६ जानेवारी १९३४

पुस्तक परिक्षण सकाळ ६ जानेवारी १९३४

परीक्षक–गो. पु. रानडे

जळो तें प्रेम–पृ. १०० ले. सि. शि. लोटलीकर, प्र. लोकमान्य मंडळ, मुंबई, सप्टेंबर १९३३ किं. १ रु.

तेजस्वी सतीधर्म–पृ. १७२ ले. वि. वा. भीडे व भि. गो. भिडे प्र. ता. ने. पांगळ, सरस वाङ्मय प्रसारक मंडळी ८०९ रविवार पेठ, पुणे, आक्टोबर १९३३ किं. २ रुपये.

स्त्रियांनी तेजस्वी सतीधर्माच्या बळावर आपल्या पतीचा कसा उद्धार केला हेंच दोनहि कादंबऱ्यांतील मुख्य सूत्र आहे. श्री. विद्याधरपंत भिडे यांनी आपल्या कादंबरीस शिवकाल निवडला असून वांई येथे विजापुरी अंमल होता तेव्हां झालेल्या एका खुनाचा आळ एका सद्वृत्त गृहस्थावर कसा आला त्याची पत्नी त्याच्या सुटकेचा प्रयत्न करण्यासाठीं सुभेदाराकडे गेली असता त्याच्या पापी नजरेची बाधा तिला कशी झाली तीतून ती निसटून तिनें आपल्या पतीची सुटका कशी केली हे चित्र कथानकांत रंगविले आहे, दुसरी कादंबरी तेजस्वी सती धर्म ही उठावदार आहे. पति घातकी मित्राच्या कुटिलपणाने स्वैराचारी व मद्यपी झाला पत्नी व मुलें वाताहात होण्याचा प्रसंग. अशा प्रसंगी आनंदरावाची पत्नी व विमला मुळमुळ रडत न बसतां प्रसंगी असहकारीता, प्रसंगी रौद्ररूप धारण करून तिने पतीस कसें वठणीवर आणलें व पतीचा सर्वतोपरी अधःपात झाला असताही त्याचा उद्धार कसा केला हें उद्बोधक कथानक श्री. तात्यासाहेब भिडे यांनी चांगल्या रीतीने मांडलें आहे. केसरी ५ डिसेंबर १९३३

दुलारी–पृ. १८० ले. वि. वा. हडप. प्र. सौ. वैजयंती हडप, पुणें आक्टोबर १९३३ किं. १–८–०

: विवाहपूर्व स्त्रिपुरुषांची ओळख असण्याची आवश्यकता प्रतिपादन करणारी कादंबरी

संच प्रयोग ले. त्रिं. नि. आंभोकर प्र. श्री. ना. हुद्दार, अभिनव कार्यालय, नागपूर किं. एक रुपाया.

ही कादंबरी शुद्धिसंघटनविषयक असून नागपूरच्या अभिनव ग्रंथातील १५ वे पुष्प म्हणून प्रकाशित झाली आहे. हिंदुधर्मावर विधर्मीयांचे कसे हले होतात व त्यांतील अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांना फुस लावुन स्वधर्मवंचित कसे करण्यांत येते त्याची कहाणी या छोट्यांकादंबरीत देण्यांत आली आहे,

केसरी२१ डिसेंबर १९३३

हेच माझे पतिराज– पृ.२६६ ले. स. वि. जोगळेकर प्र. शं. वि. चांदोरकर, लोकमान्य छापखाना खटाववाडी मुंबई नं. ४ आगस्ट १९३३ किं. १ रूपया

ही एक सामाजिक कादंबरी असून मोहपाड्याच्या दोन-तीन कुटुम्बांतील घडामोलीचा काल्पनिक इतिहास तींत वर्णिला आहे. विठ्ठलरावांनी वसंतराव व त्यांची पत्नी यमुना यांचा कसा छळ केला वसंतरावास पत्नीस टाकुन कसे जावे लागले व पुन्हा उभयता पति पत्नीची कशी अचानक गांठ पडली त्याचें मनोवेधक वर्णन कादंबरीकाराने केले आहे. सदगुणांचा व सुशीलतेचे शेवटी विजय होतो असे या पतिपत्नीच्या चरित्रावरून सिद्ध होते व वाचकाच्या मनावर तोच ठसा उमटतो. मोहपाड्यांतील 'शिवाजी विद्यालय' ही एक सधन पेंशनरांना अनुकरण करण्यासारखी गोष्ट होय. पुस्तकांत इंग्रजी व संस्कृत काव्यांतील व गद्यांतील उतारे मधुन मधुन विखुरले असल्याकारणाने वाचकांच्या मनांस एक प्रकारचा विशेष आल्हाद वाटतो. कादंबरीची भाषा सोपी असून ती लहान मुलांमुलींना वाचण्यासहि बिलकुल हरकत नाहीं.

केसरी २९ मे १९३३

## निबंधात्मक

भावलहरी–ले. श. व. चव्हाण, शाहुपुरी कोल्हापूर, किं. ८ आणे.

बाह्य मित्राशिवाय मन हेंहि मनुष्याचा एक जवळचा मित्र आहे. रिकामपणांत किंवा एकांतवासांत मनुष्य मनाशींच संसारांतील अनेक सुखदुःखांच्या विषयांसंबंधी हितगुज करीत असतो. रा. चव्हाण यानी आपल्या भावलहरींच्या गद्य काव्यांत अशाच अन्तर्गत विचारांना वाचा फोडण्याची नूतनप्रथा पाडली आहे- स्वतंत्रता, परवशता, ऐहिक सुखदुःख प्रियजनांची संगत इत्यादी विषयांसंबंधी लेखकाच्या मनांत जे विचार उमटले तेच त्याने भावलहरींत रेखाटले आहेत. अशानिराशेची पावसाळीउन्हाळी तींत अनुभविण्यास मिळते. लहरींतील विषय हे सर्वांच्याच परिचयाचे असल्याने पुस्तकवाचनाने मनाला ओझरता विरंगुळा पडेल. लेखनाचा प्रकार नावीन्यपूर्ण असला तरी तो रम्यतेच्या दृष्टीनें साधारणच वठला आहे.

केशरी ५ डिसेंबर १९३३

वाङ्मय विहार–ले. ना. सी. फडके, प्र. एस. एस. फडके, कोल्हापूर, सप्टेंबर १९३३ किं. १२ आणे.

## हास्य–विनोद

चिमणारावांचें चऱ्हाट–ले. प्र. प्रो. चिं. वि. जोशी, दांडिया बाजार, बडोदें, किं. १ रु.

प्रो. साहेबांनी रंगविलेलें चिमणरावाचें विनोदी पात्र खरोखरच पोट धरधरून हांसवील, आणि त्याबरोबरच मार्मिक टीकाही

करील. टीका मार्मिक पर बोचक नाहीं, विनोद गंभीर निरुपद्रवी, परंतु पांचकळ नाहीं चिमणरावाचें वस्तस्थिति–निदर्शन कोणालाही पटण्यासारखेंच आहे. “ सेकंड क्लासच्या प्रवासांतील ” खानबहादुरांसारखे कितीतरी अधिकारी कांही कर्तृत्वशक्ति अगीं नसतां अन्य कारणांनीं त्या जागांप्रत पांचलेले दिसतील. “ स्टेटगेस्ट ” म्हणून चिमणरावांची जी बडदास्त (!) ठेवली गेली तसा अनुभव कितीकांना आला असेल. “ वरसंशोधना ” पासून “ बोळवण ” पर्यंतच्या अनुभवाचे कित्येक मुलींच्या बापांना प्रत्यांतर आलें असेल आणि थोड्याफार प्रमाणांत येतही असेल. चिमणरावाच्या इतर विनोदी गोष्टींतून हो वस्तुस्थितीचा विपर्यास झालेला नाहीं. विनोदी भाग सोडून दिला तर निर्भेळ सत्यकथन वाचकांना आढळून येईल. एकंदरींत “चिमणरावांचें जरि हें चऱ्हाट ” असलें तरी सुबद्ध वाचकांना तें चऱ्हाट वाटणार नाहीं. चऱ्हाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत ते अगदीं अधीरपणें पोंचण्याचा प्रयत्न करतील, अशी आम्हांस खात्री वाटते.

किर्लोस्कर मार्च १९३४

पुस्तकपरीक्षण ज्ञानप्रकाश–७ आक्टोबर १९३३.

पुस्तक परीक्षण ‘ संजीवनी ’ ८ मार्च १९३४

परीक्षक–धनंजय.

**विनोदी कळ्या**–पृ. ९० ले. रा. वि. वा. जोशी. प्र. रा. के. र. काशीकर सांगली किं. ५ आणे.

या पुस्तकांत एकंदर सहा प्रकरणें आहेत. विनोद उत्पन्न करण्यासारखा लेखकाचा अंगस्वभाव आहे. हे प्रायः प्रत्येक प्रकरणावरून दिसून येत असलें तरी दगड हें मधयें प्रकरण सर्वोत्कृष्ट साधलें आहे. त्यांत दगडनिष्ठ भस्यां विनोदी प्रसंगाचा विस्तार पंचवीस पानें झाला असून हा त्याचा चटकदारपणा कायम राहिला आहे. पात्रलागणिक विरोधी किंवा अनपेक्षित अशीं परिस्थिती निर्माण करून विनोद साधावयाचा आणि तो कंटाळवाणा होऊं द्यावयाचा नाहीं हें बस्तान संभाळणें फार कठीण आहे. दगड या प्रकरणांत लेखकानें हें बस्तान उत्कृष्ट रीतीनें पाळलें असून विनोदी वाङ्मय निर्माण करण्याची आपल्या अंगची पात्रता उत्कृष्ट रीतीनें निदर्शित केली आहे. या मानानें बाकीचीं प्रकरणें टीकाऊ नसलीं तरी मुद्दाम तारीफ करण्यासारखी नाहीत.

ज्ञानप्रकाश २६ जानेवारी १९३४

## इतिहास व संशोधन

**तंजावरचे मराठी राजे**–पृ. १२१ ले. वि. स. वाकसकर प्रा. दामोदर सावळराम आणि मंडळी ३८० ठाकुरद्वार मुंबई आक्टोबर १९३३ किं. १–९–०

तंजावरांतील मराठा समाज दूरत्वामुळे अर्वाचीन महाराष्ट्राला पारखा झाला असून त्याची ओळख विसरून चालणार नाहीं, या जाणिवेनें प्रथम त्याच्याविषयीं कै. न्या. मू. रानडे यांनीं आपल्या मराठ्यांच्या इतिहासामध्यें माहिती गोविली. पुढें कै. पारसनिसांनीं इतिहाससंग्रह मासिकांतून व नंतर पुस्तक रूपानें त्या माहितीची सुधारून वाढविलेली आवृत्ति काढली आणि आतां स. वाकसकरांनीं पूर्वीच्या माहितीला उजळा दिला आहे. कै. पारसनीस यांनीं आपल्याकडून शक्य तेवढ्या जुन्या ग्रंथांचा सविस्तर आधार घेण्याचा यत्न केला होता. त्याहून कांहीं जास्त पुस्तकाच्या साह्यानें श्री. वाकसकरांनीं आपलें छोटेखानी पुस्तक तयार केलें आहे. इतकें असूनही पुनः हें पुस्तक अनुवादात्मक आहे.

मद्रासचें श्री. सुब्रह्मण्य यांच्या श्री अयंगार यांनी प्रसंसिलेल्या पुस्तकाचें हें भाषांतरे आहे. श्री. वाकसकरांनीं विशेषस्थळीं आपल्या माहितीची भर टाकली आहे. प्रस्तुत पुस्तकाचा आणखी विशेष म्हणजे तंजावरचा समग्र शिलालेख परिशिष्ठ म्हणून जोडला आहे. अशीं विविध माहितीची एकंदर नऊ परिशिष्टें आहेत. तंजावरेकडील मराठ्यांच्यापराक्रमीस्मृति आणखी एकवार जागृत कराण्याला यापुस्तकाचा उपयोग होईल. नवाकाळ २७ सप्टेंबर १९३३

तोल नाणीं–पृ. ६० ले. गणेश हरी खरे. प्र. भारत इतिहास सं, मंडळ. पुणें आक्टोबर १९३३ किं. १ रु.

पुण्याच्या भा. इ. संशोधक मंडळांत असलेल्या नाण्यांची ऐतिहासिक माहिती यां छोट्या पुस्तकांत सविस्तर दिली आहे. इ. सन. ७८ पासून आज तागायतचीं दोनशें नाणीं या पुस्तकांत संशोधक दृष्ट्या अभ्यासिली आहेत. नाणक–शास्त्रावरील मराठींत हे पहिलेच पुस्तक असल्यामुळें त्याचें महत्व विशेष आहे हें सांगणे नकोच

चित्रमयजगत मार्च १९३४

श्री शिवशाहीचा लेखनालंकार पृ १३२ सं. आणि प्र. ए. बी. जोशीं आणि आबा चांदोरकर पुणें डिसेंबर १९३३ किं. २रू.

## प्रवास व स्थल वर्णन

नाना देशांतील नाना लोक पृ. २४४ ले. व प्र. व्ही. डी. घाटे अहमदाबाद सप्टेंबर १९३३ किं. १ रु.

मैसूर कडील प्रवास पृ. ८९ लेखिका सौ. शांताबाई नाशीककर प्र. श्रीं. भा. भागवत बुधवार पेठ पुणें सप्टेम्बर १९३३ किं. १२ आणे.

यांत राममोहन स्पेशलमधून केलेल्या प्रवासाची साद्यंत हकीकत मनोरंजक रीतीनें देण्यांत आली असून वर्णनशैली चांगली आहे म्हैसूरकडील प्रवास करणारांस हे पुस्तक मार्ग दर्शकाप्रमाणें उपयोगीं पडेल. निरनिराळ्या देवाळ्यांचे फोटो देण्यांत आले असल्यामुळें पुस्तकाच्या मनोहारितेंत विशेश भर पडली आहे. नवाकाळ २६ एप्रिल १९३४

सचित्र समर्थमंदिर–जांब प्र. शंकर श्रीकृष्ण देव, धुळें किं. १ रू.

मोंगलाईंत जांब या गांवीं श्रीसमर्थमंदिर बांधून त्यांत गेल्या वर्षी रामनवमीचे दिवशीं श्रीसमर्थांची प्राणप्रतिष्ठा करण्याचा समारंभ उत्साहाने झाला हीं हकीकत महाराष्ट्रीयांना माहीतच आहे. रा. शंकरराव देव व त्यांचे सहकारी यांनी हें महत्कृत्य केलें यांत शंका नाहीं. त्या कामीं त्यांची पूर्वतयारी कित्येक वर्षे चालली होती. मंदिर बांधण्याकरितां पैसा जमविण्याचें ठरलें तरी मंदिर निजामाच्या परवानगीवाचून उभारता येत नाहीं ही अडचण दुस्तर होती. परंतु देव यांच्या प्रयत्नाने व मोंगलाईतील श्रीमंत वामनराव नाईक व कै. दिगंबरदास वकील यांच्या सहानुभूतीने व मदतीने वरील अडचण कशीं टळली याची पुस्तकांत आलेली माहिती बोधप्रद आहे. जांब येथील प्राण-प्रतिष्ठेचा सोहळा अपूर्व होय त्यावेळो समर्थ ग्रंथांची पारायणें झाली, जप झाला व हिंदुस्तानांतील हिमालयापासून रामेश्वरा पर्यंतच्या अनेक तिर्थांचें पवित्र जल भक्तांनी आणिलें व पाठविलें याचें वर्णन वाचलें म्हणजें समर्थावर महाराष्ट्रीयांची किती निस्सीम भक्ति आहे याची कल्पना येते.

केसर ८ डिसेंबर १९३३

## चरित्रें

आर्यावर्तातील तेजस्वी रत्नें–पृ. ११४ ले. केशव गोविंद गोखले, बी. ए, प्र, ज,

गो. कुळकर्णी गबळीबोळ बेळगांव आगस्ट १९३३ किं. १० आणे.

महात्मा गांधींच्या अलौकिक व तेजस्वी तत्वज्ञानाचा उदय झाल्याबरोबर त्यांना लाखो अनुयायी मिळाले व सत्यासाठीं आत्मबलिदान करण्याचें त्यांचें हेंच तत्वज्ञान राष्ट्राचा उद्धार करील अशी भावना त्यांच्या अनुयायांत उदित झाली. या कार्यकर्त्यांपैकीं कित्येक चांगले प्रसिद्धीस आले, तर कित्येकांना प्रसिद्धीही मिळाली नांहीं. पुस्तकांत जयरामदास दौलतराम, स्वामी गोविंदानंद, शेट अमृतलाल, कुमारप्पा, सेनगुप्त इत्यादि नऊ देशभक्तांची संक्षिप्त चरित्रे दिली असून त्यांच्या कार्याचाही परिचय करून देण्यांत आला आहे. हीं चरित्रें अत्यंत उद्बोधक व स्फुर्तिदायक असून अशा प्रकार जितकीं चरित्रें तरुण पिढीपुढें ठेवता येतील तितकीं हवींच आहेत.

चित्रमयजगत नोव्हेंबर १९३३

आशियाचें धर्मदीप—पृ. १६० ले. गोपीनाथ गणेश तळवळकर, प्र. गो. ब. जोशी. आनंद मुद्रणालय १९६ . ४६ पुणे. जुलै. १९३३ किं. १ रु.

दीडशे पानांच्या या पुस्तकांत श्रीकृष्ण, बुद्ध, खिस्त, महंमद पैगंबर व झरतुष्ट्र या पांच धर्मसंस्थापकांची संक्षिप्त चरित्रें दिली असून शिवाय पूर्णावतार दोन धार्मिकसमाजसत्तावादी इत्यादि प्रकरणांत त्यांच्या तत्वज्ञानाची चर्चाही केली आहे.

चित्रमयजगत फेब्रुवारी १९३४

पुस्तकपरीक्षण—'प्रतिभा' १७ जुलै १९३३

परीक्षक—श्री. के. क्षीरसागर

पुस्तकपरीक्षण—'मनोरंजन' डिसेंबर १९३३ परीक्षक—श्री, लक्ष्मीबाई प्रधान.

कॉमरेड लेनीन—प्रकाशक—कॉ. एस. जी. पाटकर, कामगार वाङ्मय मंडळ, जाफराबाद टाउन, लालबाग, मुंबई नं. १२. किं. १ आ.

ह्या यशस्वी क्रांतिकारकाचा जीवनक्रमावर इंग्रजी व इतर पाश्चात्य भाषांमधून इतकीं पुस्तकें प्रसिद्ध झाली आहेत कीं, त्यांची गणतीहि करतां येणार नाहीं त्यांनाहि त्याच्या जीवनक्रमाचें सार म्हणून थोडक्यांत लेनीन ज्यांना पहावयाचा त्यांनीं हें पुस्तक अवश्य वाचाव नवाकाळ २५ जानेवारी १९३४

कौंट लियो टॉलस्टॉय—ले. रे. म. लकडे बी. ए. एल. एल, बी. सांगली. किं. १२ आ,

वर्तनाचा विकास व तत्त्वांचा प्रचार या बाबतींत टॉलस्टॉय व गांधी या गुरुशिष्यांमध्यें बरेंच साम्य आहे. टॉलस्टॉयचें तारुण्य वेश्या जुगार यांच्या व्यसनांनी ग्रासलेले असून आयुष्य आत्मा आल्या ओळख्यापासून आलिकडची-प्रमाणे ऋषितुल्य असें होते. तुर्काशीं युद्ध युरोपांतील प्रवास वगैरे जे भिन्न भिन्न अनुभव टॉलस्टॉय यांच्या संस्कारी मनावर उमटले ते त्यांनी आपल्या अमोघ लेखणीनें सर्व टिकाणच्या व पुढील काळच्या वाचकांसाठीं लिहून ठेवले आहे. त्यांचाहि अंगुलिनिर्देश या पुस्तकाच्या उत्तरार्धांत केलेला आहे. या जगद्वंद्य महापुरुषांच्या चरित्राविषयींची जिज्ञासा या पुस्तकाने तृप्त न झाली तरी जागृती होण्यासारख्या आहे, भाषा बरी आहे. पण चरित्रनायनकाचा एकवचनीं उल्लेख मराठीच्या प्रकृतीला शोभत नाही,

केसरी १७ आक्टोबर १९३३

तुकाराम—पृ. १८४ ले. व. प्र. रा. ग. हर्षे फणसळकर बंगला टिळकरोड पुणे २ डिसेंबर १९३३ किं. १ रु.

तुकारामचरित्राचें आज पर्यंत अनेकांनी परिशीलन करून यावर ग्रंथ लिहिले आहेत,

पण त्या पैकी बहुतेकांत विवेचकी दृष्टी पेक्षां-भाविक दृष्टीच अधिक वापरण्यांत आली असल्यामुळें सर्वसामान्य जनतेस मार्ग दर्शविण्याचे कामीं हे ग्रंथ तितक्या प्रमाणांत कमजोर व्हावेत हें स्वाभाविकच आहे. रा. हर्षे यांनी आपल्या निबंधांत हा दोष शक्य तोवर टाळण्याचाच प्रयत्न केला असल्यामुळें त्यांचें पुस्तक आजच्या पिढीतील वाचकांच्या दृष्टीनें विषेश उपयुक्त ठरण्यालायक झाले आहे. तुकारामाच्या संसाराची हालहवाल; त्याच्यावर ओढवलेली संकटपरंपरा, या मुळे त्यास आलेली वैराग्यवृत्ति, या वृत्तीस स्थिरता यावी म्हणून त्याने योजलेली साधनें, दुष्ट व्यवहार रुढि व लोकभ्रम यावर त्यानें केलेली सडेतोड टिका कवि या दृष्टीनें त्यांचें महत्व त्याच्या उपदेशाचें स्वारस्य, त्याचें तत्वज्ञान वगैरे विशेष गोष्टीचें रा. रा. ग. हर्षे यांनीं एकंदर सतरा प्रकरणांत चांगल्या रीतीनें विवरण केलें आहे आणि तें होतां होईतां महाराजांच्या शद्बांतच म्हणजें त्यांच्या अभंगांतील अवतरणे देउनच केलें आहे. त्या मुळे त्यास अर्थातच सजीवता व समर्पकता लाभली आहे.

ज्ञानप्रकाश १९ जानेवारी १९३४

श्री नारायण चरित्र ले. रा. गो. भिडे प्र. दा. ल. लेले.मोदवृत्त छापखाना वाई किं १० आणे

श्री नारायण महाराज यांची विद्यमान कालांतील सत्पुरुषांत प्रामुख्यानें गणना होते महाराष्ट्रांतीलच काय, पण परप्रांतातील लोकही त्यांच्या दर्शनास श्रद्धापूर्वक रीतीनें येत असतात. वेट केडगांव येथें महाराजांच्या दर्शनास येणाऱ्या लोकांची गणती सहस्रांनीच काय पण लक्षांनींहीं करता येण्यासारखी आहे. या श्रद्धालुजनसमूहास महाराजांचें हे चरित्र आदरणीय व संग्राह्य वाटेलच. पण सर्व सामान्य वाचकांनाही तें वाचनीय वाटावें अशींच लेखकांनी जुळणी बसविली आहे.

ज्ञानप्रकाश ९ फेब्रुवारी १९३४

बाळाजी विश्वनाथ पेशवे–पृ ७२ ले. ल. ना. जोशी, प्र. ए. पी. बापट अँड ब्रदर्स बुकसेलर्स बुधवार पेठ पुणे नं २ सप्टेंबर १९३३ किं ६ आ.

यांत पेशवाईचे संस्थापक श्री. बाळाजी विश्वनाथ यांचें चरित्र चांगल्या रीतीने व इतिहासास धरुन लिहिले आहे. चरित्राची भाषा सोपी व चटकदार आहे. देशांतील कर्ते वगैरे पुरुषांचीं चरित्रें जितकी निर्माण होतील तितकी पाहिजेच असतात. व तो उपक्रम श्री बापट यांनी केला त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. यापुढील चरित्रेंहि लवकर प्रसिद्ध होवोत असें आम्हीं इच्छितो. चरित्र प्रौढास त्याच प्रमाणें विद्यार्थ्यांस उपयोगी असल्याने आत्मोन्नत्याला अनुकूल करण्याला उत्तम आहे

केसरी १० नोव्हेंबर १९३३

मराठा स्वराज्य संस्थपक श्री शिवाजी महाराज–पृ. २४१ ले. व प्र. चिं. वि. वैद्य, पुणे डिसेंबर १९३३ किं. १–८–०

रंकाचे राव–पृ. ४१ ले. एम, एम. शेख व आर. डी. गुरव प्र. प्रो. के. एन. भोसले गुरुवार पेठ तासगांव. डिसेंबर १९३३ किं. ५ आणे.

तासगांवच्या भोंसले सर्कसचे उत्पादक व मालक भोंसले बंधू यांचे हें चरित्र स्फूर्तिदायक झाले आहे. चित्रमयजगत मे १९३४

रंगीला धर्मवीर अर्थात स्वराज्यद्रोही डॉ. मुंजे–लें. बी. तात्याराव प्र व्ही गोविंदराव पांडोबा बापट यांचें हॉटेल चिटणीसपार्क नागपुर १९३३ किं. ८ आणे.

या पुस्तकांत सत्याविष्करणाचे ध्येय व देशहितांची दृष्टि ठेवून डॉ. मुंजे यांच्या

चरित्र्याचा व अनेकविधी कामगिरीचा चित्र-पट मांडण्यांत आला आहे. त्यांत कोणाची निंदा किंवा बदनामी करण्याचा उद्देश नसल्याचे लेखकानें आरंभीच स्पष्ट सांगितलें आहे. डॉ. मुंजे यांच्या चरित्र्यावर या पुस्तकांत जो प्रकाश पाडण्यांत आला आहे, त्यांत तो साधार आहे हें दर्शविण्यासाठीं लेखकाने मधून मधून बरेच उतारेही दिले आहेत. हे आधार जर खरे असती॰ आणि योग्य रितीने जर त्यांचा उपयोग केला असेल तर ह्या पुस्तकाचें अधिकृतरीत्या खंडन करणे हें डॉक्टरसाहेबांचें कर्तव्य आहे. त्यांनी तसें न केल्यास 'मौनं संमतिलक्षणम्' या न्यायाचा फायदा घेऊन सामान्य जनता त्या छोट्या पुस्तकाला 'सत्यप्रकाश' हें नांव देईल अशी सकारण भिती वाटते. केवळ एक बाजू या दृष्टीनें पहातां लेखकानें आपला विषय तर खुपच रंगविला असे खुद्द डॉ. मुंजे याना सुद्धा वाटल्याखेरीज रहाणार नाहीं. चित्रमयजगत एप्रिल १९३४

**राजा राममोहनराय**—ले. मा. स. केळकर प्र. के. स. केळकर, रायल हिंदु लाज, बुधवार पुणें किं. ५ आणे.

थोडक्यांत पुष्कळ देणाऱ्या केशवग्रंथमालेंचे हें चवथें पुष्प आहे. १९२ पृष्ठांत राममोहनरायांचे सर्व चरित्र आलें असून चरित्राची मांडणी व योजना अशा चतुराईने केलीआहे कीं वाचकाने कुठेही उघडून वाचावयाला सुरवात केली तरी तें मनोरंजक व स्वयंपूर्ण वाटावे. छोटे असले तरी चरित्र माहितीपूर्ण आहे. विद्यार्थी व सामान्य वाचक यांनीं जरूर वाचावे. चित्रामयजगत डिसेंबर १९३३

**लोकमान्य टिळक.**—ले. अनंत वासुदेव मराठे. प्र. शिवराम नारायण गोखले, धी बॉम्बे टेनंटस असोसिएशन गिरगांव मुम्बई आगस्ट १९३३ किं. १२ आणें

श्री मराठे यांनीं लिहिलेले प्रस्तुतचें चरित्र सुमारे १८० पृष्टांचें असून त्यांत लोकमान्य चरित्रांतील बहुतेक ठळक आणि महत्वाच्या गोष्टींचा समावेश करण्यांत आला असून चरित्र आटोपशीर झालें आहे. प्रस्तुत चरित्रांत लोकमान्य मंडालेस जाईपर्यंतचें चरित्र जास्त तपशिलाने दिलें आहे. त्या मानाने उत्तर भाग थोडा वाटतो. लोकमान्याचीं अखील भारतवर्ष व्यापणारी कामगिरी झाली ती ते मंडाल्याहून परत आल्यनंतर. हिंदी स्वराज्याची चळवळ विलायतेंतील कामगिरी ब्रिटिश कांग्रेस कमिटीची संघटना, पार्लमेंटरी कमिटीपुढील साक्ष यांचा उल्लेख चरित्रांत नाहीं, हे मोठे वैगुण्य वाटतें परंतु एवढ्या संकुचीत जागेंत मोठा पसारा मांडतांना कांहीं गोष्टी गळणे स्वाभाविक होय. चरित्राची भाषा सुटसुटीत व किंमतही बेताची असल्याने ते सामान्य वाचकांच्या आटोक्यांतील झाले आहे.

केसरी १८ आगस्ट १९३३

पुस्तक परीक्षण ज्ञानप्रकाश २४ नोव्हेंबर १९३३

**विष्णु कृष्णशास्त्री पुराणिक यांचे विवेचक चरित्र** पृ. ५६२ ले. सदाशिव कृष्ण फडके प्रकाशक—गंगाधर विष्णु पुराणीक पनवेल आक्टोबर १९३३ किंमत २ रूपये

पनवेल येथील धूतपापेश्वर औषधालय नांवानें किंवा त्यात होणाऱ्या औषधाच्या अनुभवाने ज्याला माहित नसेल, असा महाराष्ट्रीय विरळांच सांपडेल. हा कारखाना हल्ली लोकविश्रुत असून ज्यांनीं त्याची स्थापना करून त्याला भरभाटीस आणिले. त्यांचें चरित्र अनेक लोकोत्तर गुणांनी युक्त असले पाहिजे ही गोष्ट सहज कळणारी आहे. सदर कारखान्याचे संस्थापक कै. विष्णु कृष्णशास्त्रीं पुराणिक हे अशा गुणांचे एक पुरुष महाराष्ट्रांत होऊन गेल्यामुळे त्यांचें चरित्र होतकरू महा-

राष्ट्रीयांना अनुकरणीय वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. नवाकाळ २६ आक्टोबर १९३३

विश्वनाथ काशिनाथ राजवाडे–ले. गं. दे. खानोलकर प्र. गणेश महादेव आणि मंडळी सदाशिव पेठ पुणें १९३३ किं. ८ आणे

श्री. खानोलकर हे चरित्रकथनांत सरावलेले असून कोल्हटकर व विजापूरकर यांचीं त्यांनीं लिहिलेली चरित्रें पूर्वीच लोकांपुढे आली आहेत. प्रस्तुत छोटेखानीं प्रबंधांत त्यांनी राजवाडे यांचे चरित्र विचार आणि कार्य यांची थोडक्यांत पण सुबोध आणि मार्मीक चर्चा केलेली आहे. विशेषतः त्यांत ठिकठिकाणी खुद्द राजवाडे यांचे आत्मविषयक उद्गार व त्यांच्या परिचितांच्या लेखांतील उतारे सढळ हाताने दिलेले असल्यामुळे हा प्रबंध माहितीच्या दृष्टीने विश्वासनीय वाटेल. राजवाडे यांच्या जीवित–कार्याची ओळख व्हावयाला या छोटेखानी प्रबंधाचा उत्तम उपयोग होईल.

महाराष्ट्र १० डिसेंबर १९३३

पुस्तकपरीक्षण ज्ञानप्रकाश ८ डिसेंबर १९३३

संत सेना न्हावी चरित्र–पृ. १६ प्र. एस. वी. सूर्यवंशी पुणे. आगस्ट १९३३ किं, ४ आणे

श्रीसमर्थ चरित्र पृ. ५१० ले. सदाशिव खंडो आळतेकर, बी. ए. एल. एल. बी. कऱ्हाड डिसेंबर १९३३ किं. रु. २–८–०

श्रीसमर्थ रामदासस्वामींची आतांपर्यंत जी चरित्रें झाली आहेत, त्यांत सविस्तर व भरपूर माहितीनें भरलेलें असें हें पहिलेच चरित्र आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. या चरित्राचें स्वरूप संकलनात्मक असलें तरी समर्थांचें राजकारण समर्थांचें कार्य इत्यादि प्रकरणांतील विवेचन विचारणीय आहे. समर्थांच्या अद्भुत गोष्टींसंबंधी जी चिकित्सबुद्धि प्रकट केली आहे ती निःसंशय अभिनंदनीय आहे. या पांचशे पानांच्या प्रचंड ग्रंथावरून लेखकाचा व्यासंग, समर्थभक्ति, सखोल अभ्यास इत्यादि गुण दिसून येतात. पुस्तकांत मधून मधून पुष्कळ फोटो दिले आहेत

चित्रमयजगत मार्च १९३४

पुस्तकपरीक्षण ज्ञान प्रकाश १० नोव्हेंबर १९३३

समर्थ रामदास–पृ. १३८ ले. रा. मा. भांबुरकर, प्र. दामोदर सावळाराम आणि मंडळी. ठाकुरद्वार, मुंबई डिसेंबर १९३३ किं १ आणे.

सम्राट सिकंदर–ले. गो. वि. चिपळुणकर प्र. शं. न. जोशी चित्रशाळा प्रेस पुणें डिसेंबर १९३३ किं. ५ आणे.

शिकंदर बादशहाने जगांत एवढे नांव कमावलें कीं कोणी भाग्यवान मनुष्य असला कीं त्यास आपण त्याचें नशीब शिकंदर आहे असें म्हणतों. तत्कालिन जगज्जेता म्हणून तो प्रसिद्ध आहे. बालवाचकांस योग्य अशी ठळक व सुबक छपाई, भरपूर चित्रें देऊन पुस्तक अंतर्बाह्य चांगलें सजविलें आहे.

केसरी १६ फेब्रुवारि १९३४

हिटलर–पृ. ८२ ले. महादेव पांडुरंग नेने, लोकशिक्षणग्रंथावली, बडोद, आगस्ट १९३३ किं. १२ आणे.

स्वकर्तृत्वाने गरिबीची गोधडी झुगारून ऐश्वर्याची शालजोडी धारण करणाऱ्या कर्तृत्वशाली पुरुषांत हिटलरचें चरित्र प्रसिद्ध झालेलें असून मराठींतहि एक तयार झालें आहे. रा. नेने यांनीहि हिटलर यांचे चरित्र आपल्या छोटेखानी पुस्तकांत वर्णिलेलें आहे. पुस्तकाचा आकार फारच लहान असल्याने चरित्र उतरावें तितकें मनोरंजक उतरलेलें नाही तथापि ज्या मराठी वाचकांना हिटलरच्या चारित्र्याची व नाझींच्या संघटनेची स्थूल

कल्पना करून घ्यावयाची असेल त्यांना रा. नेने यांचें पुस्तक उपयोगी पडेल.

केसरी ८ डिसेंबर १९३३

**श्रीज्ञानदेव**–पृ. १२८ ले. प्रो. शं. वा. दांडेकर प्र. ग. गं. जांभेकर पुणे आगस्ट १९३३ किं. १२ आणे.

या पुस्तकांत एकंदर सात प्रकरणें असून त्यांत श्रीज्ञानदेवकालीन महाराष्ट्राची लोकस्थिति कुलसंप्रदाय व कुलपरंपरा, जन्म, कर्म व समाधि, ज्ञानदेवांची ग्रंथरचना, ज्ञानदेवांचें कवित्व ज्ञानदेवाचें तत्त्वज्ञान व अध्यात्म या विषयांचें आटपसर पण सूचक रीतीनें विवरण करण्यांत आलें आहे.

ज्ञानप्रकाश ६ आक्टोबर १९३३

पुस्तकपरीक्षण–प्रतिभा ४ डिसेंबर १९३३ परीक्षक श्री. ज. र. आजगांवकर

## बाल वाङ्मय

**इतिकर्तव्य**–पृ. ७६ ले. कृ. अ. आंबेकर प्र. सौ. मालतीबाई आंबेकर, ३३७ शुक्रवार पुणें. सप्टेंबर १९३३ किं. १॥ रुपया.

प्रस्तुत पुस्तकांत ईश्वरभक्ति आणि व्यवहार, धर्मजागृति, दांपत्य विचारविनिमय, कर्ज व त्याचें अनिष्टत्व, व्यापार इत्यादि दहा प्रकरणें आहेत. प्रत्येकांत त्या त्या विभागास साजतील असे लहान लहान विचारतुषार ग्रंथकर्त्यांनी मधून मधून सोडल्याने वाचकांच्या मनावर विचारांचें बिंब उमटण्यास मदत होते. पुस्तकाचा उपयोग एखाद्या सुभाषित-ग्रंथासारखा होण्याजोगा असल्याने शाळांतून लहान लहान विषयांवर निबंध लेखनाच्या वेळी याचा सहज उपयोग होईल असें वाटतें. पुस्तकांतील वचनें विचारास योग्य चालना देणारीं असल्यानें सामान्य वाचकांचेंहि मनरंजन होईल. मधून मधून चित्रेंहि घातलीं आहेत.

केसरी २ जानेवारी १९३४.

**आमची मित्र मंडळी**–पृ. १६ ले. दे. ना. टिळक. प्र. श्री. कोल्हटकर खटाव-वाडी मुम्बई ४ किं.४ आणे.

मुलांची करमणूक करण्यास किंवा त्यांच्या चौकस बुद्धीचें समाधान करण्यास मुलाप्रमाणेच वागावें लागतें त्यांची मनोरचना ओळखूनच त्यांच्याशीं संवाद केला तरच त्यांच्या मनाची प्रसन्नता कायम राहून नवीन गोष्टीशी त्यांचा सहज रीतीनें परिचय करून देतां येतो व त्यांची जिज्ञासा आपोआपच वाढत जाते. प्रस्तुत लेखकानें मुलांची ही प्रवृत्ति ओळखूनच सर्व गोष्टींची रचना केली आहे.

ज्ञानप्रकाश २९ डिसेंबर १९३३

पुस्तक पाहून मुलें खूष होतात. कागद पुठ्ठा चित्रें, छपाई सर्व छान आहे. मुलें त्यावर अगदीं झडप घालतात. पण पुढें त्यांतला मजकूर वाचूं लागतांच त्यांचा आनंद ओसरतो. परदेशच्या खाउ सारखाच एक थामट पदार्थ ह्या मजकुरांत आहे हे आपल्याला पटतें. उदाहरणार्थ, मांजरानें उंदीर खाऊन टाकणें झुरळे किडे, पाकोळ्या यांच्यावरही ताव मारणे; पाली देखील धरुन खाणे; खाण्यासाठीं पिलांना उंदीर, व सरडे आणून देणं; रोज एक एक अशीं साळुंकीचीं ४–५ पिलें मारून खाणें व तीं सुद्धां लहान मुलांच्या देखत आणि त्या पिलांचे हाल करीत–!! मरणाचे व त्यांतून असल्या किळसवाण्या हत्येचे प्रकार निदान हिंदुधर्मातल्या मुलांच्या पुढे तरी रंगवून मांडणें इष्ट नाहीं.

कप्तान २६ एप्रिल १९३४

**कुलभूषण** ( संगीत ) पृ. ३२ ले. श्री. इंदिराबाई पेंडसे प्र. वि. ग. ताम्हनकर, पुणें सप्टेंम्बर १९३३ किं. ३ आणे

**गीत कुसुमहार**:–सं. त्र्यं. रा. गोखले प्र. बालवाङ्मय प्रसारकमंडळ, सांगली किं.४ आ.

॥ श्री गुरू दत्त प्रसन्न ॥

मिठाईशास्त्र सशास्त्र पूर्णजाणणारे तज्ञ तुळजाराम मोदी यांचे

# देशी बनारसी साखरेच्या मिठाईचें दुकान

—: उत्कृष्ट नंबर १ ची मिठाई :—

रत्नागिरी हपूस आंब्याची आंब बर्फी, केशरी फिक्के कंदी पेढे, कंदी खव्याची बर्फी, दुधींया ओल्या नारळाच्या खोबऱ्याची बर्फी चिवडा. बनारसी पत्रीखडीसाखरेचा प्रवाळ व सुवर्णवंग मिश्रित थंड गुलकंद पाशेर डबा किं. ४ आणे मोरावळा पावशेर किं.२ आणे महाळुंगपाक पावशेर किं. ३ आणे.

आमची मिठाइ प्रवासांत, पार्टीचे वेळीं आणि उपवास प्रसंगीही उपयोगांत आणतात. आर्डर दिल्यास माल बाहेर गांवीं व्ही. पी. नें पाठवूं

) तुळज राम मोदी.— मोतीचौक सातारा सिटी.

---

## लक्षांत काय ठेवाल?

(१) मराठी, इंग्रजी शाळांना तसेंच कॉलेजस्ना लागणारी सर्व प्रकारची नवीं जुनीं पुस्तकें

(२) विकत घ्यावयाच्या पुस्तकावर भरपूर कमिशन

(३) मनरंजनार्थ वाचावयास घरीं पुस्तके मिळण्याची सोय.

(४) बाहेरगांवच्या व्यापाऱ्यास योग्य भावांत, भरपूर कमीशन आणि त्वरित माल मिळण्याचें खात्रीलायक ठिकाण कोणते असेल तर तें श्री अवधूत बुक डेपो—गिरगांव मुंबई नं ४ हें होय.

नाथ माधव यांची 'भविष्य प्रचिती' किं. १॥ रु सर्व प्रमुख बुक सेलरांकडे मिळेल.

# दत्तात्रय कृष्ण सांडु ब्रदर्स, चेंबूर

## यांची कांहीं औषधें.

## सांडु ब्रदर्सचें अस्सल ब्राम्ही तेल नं २

पहिले व जुनें मेंदूच्या सर्व विकारावर अमृत हितकर किं २ आणे.

## बाळंत काढा नं १ व नं २

बाळंतणीला पहिल्या दहा दिवसांत नं. १ व दोनचा काढा दिल्यानें ताप, खोकला, वातविकार वगैरे विकार नाहींसे होऊन प्रकृती निरोगी रहाते व पुढें विकार उद्भवण्याची भीति सहसा रहात नाहीं. बाळंत स्त्रियांच्या आरोग्य रक्षणासाठीं सांडु ब्रदर्स यांचा बळंत काढा सर्वत्र प्रसिद्ध आहे. प्रत्येकीकिं ४ आणे.

## कुमारी आसव नं ३

लहान मुलांना वारंवार सर्दी होणे, कफ, खोकला, अपचन, मलावरोध कडकी, यकृत दोष व इतर पोटांतील विकार वगैरेवर अत्यंत उपयोगी. हे सतत दिल्यानें बालकें निरोगी व सशक्त होतात किं. ११ आणे.

## बाळकडू नं. ४

लहान मुलांस उपजल्यापासून देण्यास योग्य व हितकर यांत मुलांना उगाळून देण्याची सर्व औषधें आहेत. हे दिल्यानंतर दुसऱ्या औषधांची गरज नाहीं. किं- ४ आणे.

## अरविंदासव

लहान मुलांचे अत्यंत शक्तिवर्धक औषध यानें मुलांची ताकद वाढून शरीरप्रकृती निकोप होते.

## अश्वगंधारिष्ठ

अशक्तता, मज्जातंतूची शिथिलता, वातविकार मंदाग्नी कृशपण, वगैरे विकारावर गुणकारी. यानें भूक वाढून शौचशुद्धी होते. स्नायु मजबुत होतात व शरीर जोरदार बनते. बा. किं. १-४-०

## चंदनासव नं १

प्रमेह-परमा व त्याचे नवे जुने प्रकार, लघवीची आग, लघवी साफ नसणे, लघवीतून धातु जाणे स्त्रियांचे आर्तवदोष इत्यादि विकारावर; यानें पचनक्रिया सुधारून भूक लागते, झोंप चांगली येते व अंगांत रक्ताची वाढ होते. बा. किं. १ रु.


सर्व रोगांवर टिकाऊ तयार काढे मिळणे हें या कारखान्याचें वशिष्ट असून शिवाय आयुर्वेदांतील उत्तमोत्तम व शास्त्रोक्त पाठाप्रमाणे तयार केलेली सुमारे ६०० वर औषधें नेहमी तयार असतात. संपूर्ण माहितीचा विस्तृत क्याटलाग ८६ ची पोष्टाची तिकिटें पाठविली असता मिळतो वैद्य, डाक्टर व्यापारी, धर्मार्थ दवाखाने यांस भरपूर कमीशन

दत्तात्रय कृष्ण सांडु ब्रदर्स.

आयौंषधी कारखाना चेंबुर जि. ठाणे. दुकान, दवाखाना-ठाकुरद्वार, मुंबई.

शाखा नं १ परळ मुंबई शाखा नं २ दादर मुंबई




पहिली गोष्ट मराठी भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या यच्चयावत सर्व पुस्तकांची नांवनिशीवार व शक्य तर वर्गीकृत यादी प्रसिद्ध व्हावी. वाङ्मयाच्या इतिहास लेखकाला ही नड तीव्रतेनें भासणें जरूर आहे. मुम्बई सरकार अशी एक त्रैमासिक यादी प्रसिद्ध करीत असतें. परंतु एक तर ती लोकांस माहीत नाहीं. दुसरें ती इंग्रजींत असते आणि तिसरें म्हणजे तिला सांप्रत आकार फारच जबर पडतो. आणि ती निराळी मिळण्यास त्रास पडतो. इतकें असूनहि अभिप्रायदर्शन त्यांत प्रायः नसतेंच. यामुळें ती यादी मराठी वाचकांस अवश्य ते संस्कार करून स्वतंत्रपणें प्रसिद्ध व्हावयास पाहिजे.'

**प्रो. दत्तो वामन पोतदार**

संपादकः— महाराष्ट्र साहित्यपत्रिका

# फडके ॲग्युमिक्श्चर

ची

## एक बाटली अवश्य

## संग्रहीं ठेवा

म्हणजे थंडीचे ताप मलेरीया इन्फ्ल्युएन्झा वगैरे करितां डॉक्टरकडे धाव घ्यावी लागणार नाहीं. सर्वत्र मिळतें. बा. किं ०—१२—०

एन. फडके आणि कं. बडोदें,

औषधांचे व्यापारी.

संपादक आणि प्रकाशक
गणेश रंगनाथ दंडवते
बडोदें

# अभिप्राय संग्राहक

वार्षिक वर्गणी
रु. १-०-०

ता. ...

आज दीपावलीच्या मंगल मुहुर्तावर पूर्वी जाहीर केल्याप्रमाणे इंग्रजीतील Book Review Digest च्या धर्तीवर निघणाऱ्या अभिप्राय संग्राहकाचा पहिला अंक महाराष्ट्र वाङमयप्रेमी वाचकांच्या हातीं देण्यास आम्हांस अत्यंत आनंद होत आहे.

वर्धमान मराठी वाङमयांत अशा प्रकारच्या प्रकाशनाची किती अवश्यकता आहे हें मुखपृष्ठावर उद्धृत केलेल्या प्रो. पोतदारांसारख्या तज्ज्ञांच्या एकाच अभिप्रायावरून दिसून येण्यासारखे असल्यामुळें त्यासंबंधाने येथे पुन्हा विशेष चर्चा करण्याची आम्हांस कांहींच आवश्यकता दिसत नाही. तथापि येथें एवढेच सुचविणे इष्ट वाटते कीं विद्वान प्रोफेसर साहेबाशीं या बाबतींत आम्ही पूर्ण सहमत असल्यामुळेंच नव्हे तर असें एखादें प्रकाशन मराठी वाङमयांत असावें असें आम्हासही बऱ्याच दिवसापासून वाटत असल्यामुळें बहुजनसमाजास भासत असणारी ही उणीव प्रस्तुत प्रकाशनाच्या द्वारें आम्हीं आमच्या सामर्थ्यानुसार दूर करण्याचा प्रयत्न करीत आहोत व या आमच्या प्रयत्नाचें सहृदय महाराष्ट्रीयांकडून योग्य तें चीज होईल असा आम्हांस भरंवसा आहे.

इंग्रजी वाङ्मयविश्वांत अशीं असंख्य प्रकाशनें असून त्यापैकीं कित्येकांची मजल साप्ताहिक प्रकाशनांपर्यंत गेलेली आहे. परंतु आमचें वाङमयोत्पादनच सध्या आम्हांस तितकी ऊंच उडी घेऊं देणार नाहीं हे उघड आहे. अशा स्थितींत अभिप्राय संग्राहकाने कांही काल पर्यंत त्रैमासिक प्रकट होण्याचे धोरण ठेवावें हें आम्हांस इष्ट वाटतें. या पहिल्या अंकांत सन १९३३ सालांतील जानेवारी ते जून अखेरच्या बृहन्महाराष्ट्रीय पुस्तकांची नोंद घेतली असून येत्या डिसेंबरांत साहित्य संमेलन प्रसंगीं तयार होणाऱ्या पुढील अंकांत सन १९३३ सालांतील जुलैं ते डिसेंबर अखेर प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची नोंध देऊन सन १९३३साल पूर्ण केलें जाईल.

अभिप्राय संग्रहांत अनुकूल प्रतिकूल अभिप्राय येणें अपरिहार्य आहे व त्यांच्या संग्रहा पलीकडे या संबंधांत त्याच्याकडे जबाबदारी नाहीं हें उघड आहे. परंतु ते देताना घेतलेली दक्षताहि मर्मज्ञांच्या अवलोकनांत आल्यावाचून राहणार नाहीं अशी आशा आहे.

अभिप्राय संग्राहकास आपल्या कर्तव्याची पूर्ण जाणीव आहे व सवडीनुसार महत्वाच्या पुस्तकांवर दोन दोन तीन तीन अभिप्राय देऊनहि वाङ्मयसेवा करण्याची त्याची ईच्छा आहे. तथापि हें सर्व महाराष्ट्र वाङ्मयप्रेमी जनतेच्या उदार आश्रयावर व सक्रिय सहानुभूतीवर अवलंबून आहे हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

शेवटीं अभिप्राय संग्रहाच्या रूपानें आरंभिलेली ही वाङ्मयसेवा महाराष्ट्र शारदेच्या चरणीं अर्पण करतो व फिरून एकवार महाराष्ट्र जनतेस आमच्या प्रयत्नाचे चीज करण्याची प्रार्थना करून सर्वांची रजा घेतो.

सर्वत्रांचा नम्र सेवक

**गणेश रंगनाथ दंडवते**

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ८८ नं. ७-२
ता. ३०/११/३७
ठाणे.

# अभिप्राय संग्राहक.

पुस्तक १ अक्टोबर १९३४ भाग १ व २

## सामान्य

**अच्युतराव कोल्हटकर स्मारक ग्रंथ** पृ. ३२० सं. व. प्र. अनंत हरि गद्रे, निर्भीड कचेरी, मुबई नं. ४ जून १९३३ कि. ११ रु.

कोल्हटकरांच्या द्वितीय पुण्यतिथीच्या प्रसंगाने त्यांचा हा लेखसंग्रह प्रसिद्ध करण्यांत श्री. गद्रे यांनी कोल्हटकरांबद्दलचा आपला आदर तर व्यक्त केलाच आहे.पण त्यापेक्षाही त्यांनी मराठी वाङ्मयांत एका अमुल्य ग्रंथाची भर टाकण्याचें पुण्य संपादन केलें आहे. ह्या संग्रहांत लो. टिळक, गोखले, रानडे, आगरकर, भांडारकर इत्यादी थोर पुरुषासंबंधीचे लेख संकलित केले असून शिवाय कोल्हटकरांच्या इतर लेखांतीलही भरपूर उतारे दिले आहेत

चित्रमय जगत् जुलई १९३३

पुस्तक परिक्षण–केसरी ३ आक्टोबर १९३३

**नूतन मराठी विद्यालय स्मारक ग्रंथ** पृ. २९३ प्र. प्रो. त्र्यं. भि. हर्डीकर, चिटणीस, नू. म. वि. सुवर्ण महोत्सव मंडळ १९३३, पुणें. जानेवारी १९३३ कि. २ रुपये.

पुणें येथील न्यू इंग्लिश स्कूलचा सुवर्ण महोत्सव साजरा झाल्यानंतर थोड्याच अंतराने म्हणजे गेल्या जानेवारीला नूतन मराठी विद्यालयाचा पन्नाशीचा समारंभहि साजरा झाला. त्या वेळीं प्रस्तुत ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत आला. नू. म. विद्यालयाचा समारंभ, स्मारकग्रंथ, शिक्षणप्रसारक मंडळीने 'उद्योगमंदिराची' जाहीर केलेली नवी योजना इत्यादि अभिनव गोष्टी पाहिल्या म्हणजे मंडळीच्या खटपटीविषयीं कौतुक वाटतें व सामान्या अपि 'निश्चयेन महता किं किं न कुर्युर्नराः' ही उक्ति यथार्थ वाटते.

केसरी ३१ मार्च १९३३

**बृहन्महाराष्ट्र वार्षिक १९३३** पृ. २०८ प्र. महाराष्ट्र मंडळ, वेलताला, कलकत्ता मार्च १९३३ किं १ रु.

**महाराष्ट्र साहित्य संमेलन मडगांव** (गोवा) १५ व्या अधिवेशनाचा अहवाल, प्र. एस. पी. पै. आणि डी. व्ही. पै. मडगांव (गोवा) १९३३ किं. १ रु.

**महाराष्ट्र साहित्य संमेलन हैद्राबाद** (दक्षिण) १६ व्या अधिवेशनाचा अहवाल. पृ. ६४ प्र. आर. एल. जोशी, हैद्राबाद (दक्षिण) फेब्रुवारी १९३३ किं. १ रु.

**महाराष्ट्र सांवत्सरिक** इ. स.१९३३ पृ. १०२० सं. श्री. म. माटे, प्र. ल. ब. भोपटकर, पुणें फेब्रुवारी १९३३ किं. ३ रु.

**श्रीसयाजी गौरव ग्रंथ** पृ. ८७६ प्र. वाढदिवस मंडळ, बडोदें. मे १९३३ किं. ३ रु.

श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या सत्तराव्या वाढदिवसाच्या निमित्तानें हा ग्रंथ

प्रसिद्ध झाला आहे. त्यांत महाराजांचें चरित्र, राज्यकारभार, विद्याभिरुचि, सार्वजनिक कामे वगैरे अनेक विषयावर विविध लेखकांचे लेख आले आहेत.

चित्रमय जगत आगस्ट १९३३

## धर्म व तत्वज्ञान.

अमृतानुभव विवरण पृ. ३८८ ले. शिवकल्याण, प्र. केशव भिकाजी ढवळे, गिरगांव, मुंबई, जानेवारी १९३३ किंमत २-८-०

कीतन मंदाकिनी तरंग १ ला पृ. ४८ ले. व. प्र. वा. शि. कोल्हटकर; पुणे फेब्रुवारी १९३३ किं. ४ आणे

श्रीसमर्थ जन्माख्यान

कीर्तन मंदाकिनी तरंग २ रा. पृ. ५२ ले. व. प्र. वा. शि. कोल्हटकर पुणे मार्च १९३३ किं. ४ आणे.

श्री शिवछत्रपती जन्माख्यान

श्रीमद्भगवद्गीतेचे रचनांतर पृ. २५३ ले. 'भारद्वाज' प्र. भालेराव बन्धु, पुणें, मार्च १९३३ किं. १ रु.

मरणोत्तर तेरा दिवसांचे विधि पृ. २० ले. बी. आर अभंग प्र. आर. के. अभंग, अवसरी, जि. पुणें मे. १९३३ किं. ३ आणे.

## नीतिशास्त्र.

नीतिशास्त्रप्रबोध. पृ. ४०४ ले. दा. ना. आपटे, प्र. दामोदर सावळाराम आणि मंडळी, ३८० ठाकुरद्वार, मुंबई मे १९३३ किं. २ रु.

या चारशें पानांच्या पुस्तकांत भारतीय व पाश्चात्य नीतिशास्त्राचा विकास कसाकसा झाला, याचें ऐतिहासिक बुद्धीनें पर्यालोचन केलें असून, निरनिराळ्या तत्वज्ञांच्या मतपंथांचीही त्यांत सोपपत्तिक माहिती दिली आहे. सिद्धांतप्रमेयांसह या पंथांचीं तत्त्वें ह्या पुस्तकांत मांडण्यांत आलीं असल्यामुळें, नीतिशास्त्राचा ज्याला परिचय करुन घ्यावयचा असेल, त्यानें हें पुस्तक अवश्य वाचावें. जगांतील नीतिविषयक कल्पनांच्या विकासाची हकीगत इतक्या सुसंगत व संकलित रीतीनें ह्या पुस्तकांत मांडली आहे कीं, त्याला नीतिशास्त्राचा छोटासा संदर्भग्रंथ असें म्हणण्यास हरकत नाहीं. पुस्तकाची भाषा प्रौढ व विषयानुकूल असून, ठिकठिकाणीं समर्पक परिभाषा उपयोजिली आहे. पौर्वात्य व पाश्चात्य शास्त्रग्रंथांचें मंथन करुन तयार केलेल्या या ग्रंथांत चिकित्सक दृष्टि नाहीं, असें म्हणतां येणार नाहीं. 'तुलनात्मक विवेचन' या प्रकरणावरुन ग्रंथकर्त्याच्या थोर अधिकाराची यथार्थ कल्पना येते. या पुस्तकानें मराठी वाङमयांत एका संग्राह्य ग्रंथाची निःसंशय भर पडली आहे.

चित्रमय जगत-एप्रिल १९३४

सुलभ नीतिशास्त्र पृ. ९६ ले. दा. ना. आपटे. प्र. दामोदर सावळाराम आणि मंडळी ३८० ठाकुरद्वार मुंबई मे १९३३ किं. ११ आणे.

नीतिशास्त्रासंबंधी त्रोटक विवरण या लहानशा पुस्तकांत केले असून, त्यावरुन या शास्त्राची तोंडओळख होण्यास हरकत नाही. तसेच नीतिशास्त्राचा मानसशास्त्राशी व राज्यशासनशास्त्राशी कसा निकटचा संबंध आहे, याचीही वाचकांना या पुस्तकाच्या वाचनानें बरीचशी माहिती होईल

किर्लोस्कर खबर मार्च १९३४

## ज्योतिष व पदार्थविज्ञान.

काल निर्णय पद्धति पृ. ८० ले. के. व्ही. मांगवेकर, प्र. व्ही. जी. भागवत, पुणें, एप्रिल १९३३ किं. १२ आणे,

जातक चंद्रिकेचें भाषांतर. विंशोत्तर पद्धति. दैवरहस्य. पृ. ४८ ले. एच. एन. काटवे प्र. ए. पी. बापट पुणें मे १९३३ किं. ६ आणे.

ज्योतिष विषयक कांहीं सिद्धांतासंबंधी विचार.

दैवज्ञ वल्लभा म. ग. ठाकूर अमोणकर. अमोणें, गोवा. किं. १२ आणे.

'वराह मिहिरानें लिहिलेल्या मूळ संस्कृत पुस्तकाचें हें भाषांतर फलज्योतिषावर विश्वास असणाऱ्यांना उपयुक्त वाटेल'

चित्रमय जगत् सप्टेंबर १९३३.

कोंकणची नवी भातशेती पृ १०५ ले. पी. जी. जोशी प्र. चित्रशाळा पुणे १०२६ सदाशिवपेठ, पुणे फेब्रुवारी १९३३ कि. १ रु.

पावसाचीं जुनीं नवीं कारणें–पृ. १४ ले. दा. भा. बापट प्र. आर्यभूषण प्रेस, पुणें मे १९३३. किं. ४ आणे.

पावसाचें अनुमान शास्त्रीय पद्धतीने कसें तयार करतां येतें, यावद्दलचा खुलासा पुस्तकांत दिला आहे. भौतिक शास्त्राच्या मदतीनें पावसाचें अनुमान करण्याचें काम आज ३०।३५ वर्षें चालू आहे. दरसाल घडणाऱ्या चुकांची दुरुस्ती करून पुढील काळचें अनुमान होत असतें. सदर पुस्तकांत छापल्याप्रमाणे यंदा पाऊस पडला ही विशेष गोष्ट आहे. पावसाच्या अनुमानाची शेतकऱ्यांस आवश्यकता असते. या दृष्टीनें पुस्तक उपयुक्त आहे.

केसरी ६ जून १९३३

चांगला फळबाग–पृ.१०४ ले. व प्र. गो. भि. देशमुख ३९९ नारायणपेठ पुणे कि. १ रु.

यांत महाराष्ट्रांत होणाऱ्या सर्व फळझाडां संबंधी फार उपयुक्त माहिती दिलेली असून खते, लागवडीचे हंगाम, फळांचे टिकाऊ पदार्थ व फळांचा औषधी उपयोगही दिलेला आहे. पुस्तक संग्राह्य आहे

मनोरंजन डिसेंबर १९३३

## मानवजाति शास्त्र.

मराठी परीट जातीचा संक्षिप्त इतिहास पृ. ६५ ले. व प्र. माधवराव परीट, नाशिक, जून १९३३ किं. १ ८ ०

मराठी भिल्लसमाज. पृ. १० ले. व प्र. एम. जी. मोरे, धुळे मे १९३३ कि. १ आणा.

## आरोग्य व वैद्यक.

आपलें आरोग्य भाग ३ रा. पृ.१२८ ले. के. व्ही. कुकडे प्र. डी. मिसे, नागपूर, जानेवारी १९३३ कि. १२ आणे.

करंजोपयोग पृ २९ ले प्र बा. ओगले, ओगलेवाडी प्र. चित्रशाळा पुणे एप्रिल १९३३ किं ३ आणे.

करंज वृक्षाचा निरनिराळ्या रोगांत कस कसा उपयोग होतो हे या चोपड्यांत दाख-विले आहे

केसरी ४ आगष्ट१९३३

प्लेगाचा विमोड पृ ४० ले व. प्र. एन. एम वाटवे, कल्याण जानेवारी १९३३ कि ४ आणे.

बालसंगोपन पृ. १२८ ले डी. व्ही. साडू प्र. सांडू ब्रदर्स, मुंबई १९३३ कि १ रु

शस्त्र वैद्यकीय रुग्णशुश्रूषा पृ. २५९ ले. एस. वी. गाडगीळ प्र. बॉबे नर्सिंग कौन्सिल, मुंबई एप्रिल १९३३

संजीवनचिकित्सापद्धति—पृ. ११४ ले. य का. परांजपे. प्र.–ना. वि. जोग; मालगुंड जिल्हा रत्नागिरी. एप्रिल १९३३ किं. १२ आ.

रोगनिवारणाच्या प्राचीन–अर्वाचीन :व पौर्वात्य–पाश्चात्य अशा नानाविध पद्धति प्रचलित आहेत. त्यांमध्ये तात्पुरते रोगनिवारण करणाऱ्या पद्धतीपक्षा शरीरातील जिवनशक्ति जोरदार करणारी पद्धति श्रेष्ठ होय. हें ध्येय डोळ्यापुढे ठेवून श्री. परांजपे यांनी गेलीं वीसपंचविस वर्षे संजवनी चिकित्सापद्धतीचा अनुभव घेतला आहे. या पद्धतींतील औषधांची संख्या चौदा आहे, व तेवढ्या औषधांनी मनुष्याला आरोग्य टिकवितां येईल अशी ग्वाही लेखक देत आहेत शरीराची रचना व प्रकृतीचे भेद यांचे वर्णन प्रथम करून निरनिराळ्या रोगावरील औषधांची यादी पुस्तकांत दिलेली आहे. वैद्यकीय व्यवसाय करणारांनी या पद्धतीचा अनुभव घ्यावा.

केसरी ३ आक्टोबर १९३३

सुखाचा कानमंत्र पृ. ७६ ले. व प्र. डॉ. वि. र. गोसावी एल. सी. पी. एस. येवले, जानेवारी १९३३ किं ८ आणे

या पुस्तकांत गर्भारपणांतील खबरदारी शिशुसंगोपन प्राथमिक उपचार इत्यादि विषयांचे सशास्त्र व व्यावहारिक विवेचन केलें असून सर्वसाधारण कुटुंबाला तें उपयुक्त होईल

चित्रमय जगत सप्टेंबर १९३३.

छाती कशी वाढवावी. पृ. २७ ले. व प्र. एस. जे. बापट, मरिहाल, धारवाड, १९३३ किं. ४ आणे.

## समाजशास्त्र

अस्पृश्यता व देवालय प्रवेश पृ. १३८ ले. एस. एच. पुरंदरे, प्र. गो. कृ. देवधर, पुणे, जानेवारी १९३३ किंमत १२ आणे.

कणिक–नीति पृ. ८८ सं. व प्र रामचंद्रशास्त्री किंजवडेकर आनंदाश्रम, पुणे मे १९३३ किं. ४ आणे.

कणिकनीति हें महाभारतांतले अगदीं लहानसें प्रकरण असलें तरीं राजनीतिशास्त्राच्या दृष्टीने त्याला फार मोठें महत्व आहे. मूळ संस्कृताबरोबर मराठी भाषांतर देण्यांत आले असून त्याला श्री. ना. ह. आपटे यांची मार्मिक प्रस्तावना जोडली आहे.

चित्रमयजगत फेब्रुवारी १९३४

दुर्वर्तनी मुलांची सुधारणा पृ. १६० ले.–न. ल. आठवले, प्र–स.रा. सरदेसाई, समर्थ भारत छापखाना, ९४७ पुणें २. जून १९३३ किं. १॥ रु.

साध्या शाळेंतील शिक्षकापेक्षा वसतिगृह असलेल्या शाळांतील शिक्षकांचा मुलांशीं जास्त निकट संबंध येतो. श्री. आठवले हे बरेच दिवस समर्थ विद्यालयांत असल्याकारणाने त्यांना अशी संधी मिळाली व तिचा त्यांनीं कसा उपयोग करून घेतला हें त्यांचे प्रस्तुत पुस्तक वाचणाराला दिसून येईल. त्यांनी पुस्तकाचे नऊ भाग केले असून दुर्वर्तनाचे स्वरूप दुर्वर्तनाची कारणमीमांसा, आनुवंशिक संस्कार शारीरिक दोष, तारुण्याच्या दरवाजांत शिरतांना दिसून येणारी मनाची उचल, बाह्य परिस्थिति व उपाययोजना याप्रमाणें विषयाची व्यवस्थित मांडणी केली आहे. प्रत्येक जागीं एक उदाहरण व त्या उदाहरणाची शास्त्रीय छाननी अशी मांडणी असल्याने विषय सुबोध व मनोरंजक झाला आहे.

केसरी १४ नोव्हेंबर १९३३

व्यवहारोपयोगी दत्तकविधान–पृ. ३० ले. व प्र. ज. ना. काळे, रिटायर्ड सबजज्ज, बेळगाव. किं. ६ आणे.

दत्तकाच्या कायद्याचें सुस्पष्ट ज्ञान असणें हें वकिलाशिवाय इतरांस कठिण झाले आहे. अशा स्थितींत या बाबीचे सूक्ष्म रीतीचें ज्ञान साधारण जनतेस व्हावें म्हणून हें

पुस्तक लिहिलें आहे व या दृष्टीने हा प्रयत्न यशस्वी झाला आहे यांत शंका नाही. हा कायदा जितका स्पष्ट करतां येइल तितका या पुस्तकांत केला आहे. त्यांत 'केसीस 'चीं नांवे दिलीं नाहींत तीं दिलीं असतीं तर कायद्याच्या विद्यार्थ्यांहि तें उपयोगी पडलें असतें. तथापी स्थूलमानानेच या पुस्तकाचा उपयोग करावा. वकिलाचा सल्ला हाच केव्हांहि श्रेष्ठ. दत्तकाच्या कायद्याचें अजिबांत अज्ञान असल्यामुळें उगाच जी भांडणें लागतात तीं मात्र या पुस्तकाच्या साह्यानें कमी करतां येतील. व अज्ञानाचा फायदा घेऊन लावालावी किंवा फसवाफसवी करणाऱ्याच्या प्रयत्नास या पुस्तकाच्या जोरावर मिळविलेल्या ज्ञानाने आळा घालतां येईल.

केसरी १६ फेब्रुवारी १९३४

**हिंदी राज्यशासन**—पृष्ठ १४ ले. वा. पां कोल्हापुरे प्र. बा. बा. घाटे, टिळक हायस्कूल, कऱ्हाड. १९३३ कि. ५ आणे

भारतीय शासनपद्धतीची माहिती मराठी व इंग्रजी शाळांतून आवश्यक झाली असल्यामुळें त्यासंबंधीचीं पुस्तकें मराठींत लिहिलीं जात आहेत. त्यांमध्यें विद्यार्थ्यांना थोडक्या श्रमानें पण स्पष्टपणें विषयाचें स्वरूप ग्रहण करण्याचे दृष्टीनें प्रस्तुत पुस्तक उपयुक्त आहे. हिंदुस्थानचा राज्यकारभार कसा चालतो याचें चित्र त्याच्या एकएक अंगाची फोड एक एक प्रकरणांत करून लेखकानें रेखाटलें आहे आणि त्यांत 'शुभ्रपत्रिके" पर्यंतचे सारे रंग भरले आहेत. शिक्षक म्हणून एका तपाचा अनुभव लेखकास असल्यानें विषयाची मांडणी सुगम झाली आहे.

केसरी ७ जुलै १९३३

**हिंदुस्थानची सोपपत्तिक शासन पद्धति** पृ. १९० ले. प्रो. रा. कि. ओतुरकर एम्. ए. प्र. अनाथविद्यार्थिगृह, ६२४ सदाशिव पेठ, पुणें फेब्रुवारी १९३३ किं. ६ आणे.

या पुस्तकांत हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेची संपूर्ण माहिती दिली असून विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें तर हें पुस्तक अत्यंत उपयुक्त आहेच, पण सामान्य वाचकालाही तें माहितीपूर्ण वाटल्याखेरीज राहाणार नाहीं. राज्यशासनाचा अवघड विषय अत्यंत सुगम भाषेंत मांडण्यांत लेखकाचें राज्यशास्त्रांतील नैपुण्य व्यक्त झालें आहे हें सांगणें नकोच

चित्रमयजगत् सप्टेंबर १९३३

## कला व हुन्नर

**औद्योगिक शिक्षण**—पृ. ५९ ले. व प्र. माधव बापाजी सावंत संगमनेर, किं. ६ आणे

हल्लींच्या काळांत यांत्रिक, रासायनिक, व्यापारी व औद्योगिक शिक्षणाचे केवढें महत्त्व आहे त्याचे या छोट्या पुस्तकांत विवेचन केलें आहे. इंग्लंड, अमेरिका, जर्मन, जपान इत्यादि देशांतील औद्योगिक शिक्षणाची थोडी थोडी माहिती देऊन लेखकानें बेकारासाठीं कांहीं धंदेही सुचविले आहेत.

चित्रमय जगत आगस्ट १९३३

**शिवणकलादर्श भाग १ ला**—पृ. ४४ ले. व प्र. कृ. रा. कर्वे, ५४५ सदाशिव पेठ पुणें शहर किं. १२ आणे.

या पुस्तकांत १५ धडे दिलेले असून त्यांत लेखकाने शिवण कामाच्या श्रीगणेशापासून ह्मणजे सुई कशी धरावी येथपासून तों झबलीं पोलकीं, जाकीटें फ्रॉक, शर्टपर्यंतची सांगोपांग माहिती कोणालाही समजेल अशा सुबोध भाषेंत दिली आहे. सोबत आकृत्यांचा एक नकाशाहि जोडण्यांत आला असल्यामुळें शिवणकाम शिकण्यास कोणालाच जड जाणार नाहीं असें वाटतें.

केसरी २ जून १९३३

सुलभ मोटार शिक्षक पृ. ३२८ ले. व प्र. र. श्री. देशपांडे. बी. ई. ए. एम. आय ई. नाशिक, जून १९३३ किं. २ रु.

ह्या पुस्तकांत मोटार कशी चालते हें यंत्र शास्त्राच्या द्वारें सुलभ रीतीने सांगितलें आहे. नवाशिक्या मोटारशिक्याला ह्या पुस्तकाचा अत्यंत उपयोग होईल. यंत्राची माहिती, मोडतोड व दुरुस्ती हे प्रकार आकृत्यामुळें समजण्यास सोपें झाले आहेत. इंग्रजी शब्दांसाठी मराठी पारिभाषिक शब्द योजण्यांत ग्रंथकर्त्यांनीं अभिनंदनीय भाषाप्रेम व्यक्त केलें आहे.

चित्रमय जगत सप्टेंबर १९३३

वसंतपेये व खाद्यें. पृ. २६ ले. एस. व्ही. परांजपे, प्र. द. गो. सडेकर, खानापूर, मार्च १९३३ किं. ३ आणे.

कुक्कुटाची जोपासना. पृ. ८४ ले. हरि विठल सावे, पशुरोगचिकित्सक, प्र. बडोदें राज्य, बडोदें १९३३ किं. १–१५–०

## ललितकला

भजनी मृदंग वादन पृ. ५० ले. व प्र० डी. के. जोशी, पंढरपूर जून १९३३ किं. ६ आणे

शास्त्रीय संगीत राग पद्धति द्वितीय पुष्छ प्र. जी. बी. आचरेकर पुणें, मे १९३३ किं. १० आणे.

## भाषा व व्याकरण

मराठी भाषा–उद्गम आणि विकास पृ. ४१०

लेखक–कृष्णाजी पांडुरंग कुळकर्णी एम.ए. बी. टी. प्रकाशक–इंटर नॅशनल बुक सर्व्हिस पुणें नं. ४ मार्च १९३३ किं. ४ रु.

मराठी भाषेचा उगम पहावयाचा झाल्यास पूर्ववैदिक, वैदिक, संस्कृत, पाली, प्राकृत, अपभ्रंश अशा अनेक अवस्थांचा प्रदेश तुडवीत जात इतिहासाच्याहि मागील काळांत प्रवेश करावा लागतो, आणि जों जों मागें जावें तों तों मार्गदर्शक साधनांच्या अधिकाधिक न्यूनांमुळें चांचपडण्या–धरपटण्याशिवाय अभ्यासकाला गतीच रहात नाहीं. अशा वेळीं इतर देशांतील विद्वान भाषाशास्त्र्यांनीं जे सिद्धांत निश्चित केले असतील, त्यांचा तारतम्यानें पारखून उपयोग करावा लागतो. श्री. कुळकर्णी यांनीं मराठी भाषेच्या संशोधनासंबंधीं परिश्रमाला परदेशी विद्वानांच्या मतांचें साह्य पुरवून आपला ग्रंथ तयार केला आहे. भाषा शास्त्राकडे सामान्यत: अगोदर कोणाचें लक्ष जात नाहीं. तसें लक्ष वर्षानुवर्ष चिकाटीनें पुरवून पुन: आपल्या अभ्यासाचीं फळें मराठी सारख्या दरिद्री मायभाषेंतून स्वजनांपुढें ठेवावयाची या दोन्ही गोष्टी कौतुकास्पद आणि अभिनन्दनीय म्हणाव्या लागतात.

नवाकाळ २१ डिसेंबर १९३३

पुस्तक परीक्षण केसरी ता. २३ व २७ जून आणि ४ जुलै १९३३.

## कविता.

उमरखयाम रुबाया–पृ. ५२ ले. ज. के. उपाध्ये, प्र. अ. स. गोखले, ११ बुधवार पेठ, पुणें जून १९३३ किं. ८ आणे.

'मराठींत उमर खय्यामच्या रुबायांची' अनेक भाषांतरें झालीं; पण या भाषांतराइतकें सरस, मुळाबरहुकूम व काव्यपूर्ण असें एकही नाहीं. मुळातला आस्वाद जसाचा तसा या पुस्तकांत अनुभवावयास मिळून स्वतंत्र काव्य-

रचना या दृष्टिनेही पाहिलें तरी तें सुश्लिष्ट, व मधुर झाल्याचें आढळून येईल. श्री. उपाध्ये यांचे हे पुस्तक काव्यरसिकांस अत्यंत प्रिय होईल असा विश्वास वाटतो !

चित्रमयजगत् सप्टेंबर १९३३

काव्यपरिक्षण प्रतिभा १८ आगस्ट १९३३ परिक्षक के. ना. काळे.

**उद्धार**–पृ. ६४ ले. मनमोहन प्र. गो. न. नातू ३२५ वाय सदाशिव पेठ अशोक व्हिला, पुणें जानेवारी १९३३ किं. ८ आ.

'अश्लील वाङ्मय' म्हणजे काय ? हें आम्हांला कळत नाही असा लटका कांगावा करणाऱ्या शिष्टांना नजर करण्यासारखें चोपडें आहे. तमासगिरींच्या लावण्यांनाहि लाजविण्याइतक्या निर्लज्जपणानें बीभत्स शृंगाराचें उत्तान वर्णन करण्यांत या कवीला काय हौस वाटत असेल ती त्याची त्यालाच ठाऊक ! कीर्तिमान लेखकांनी कलाविलासाच्या नांवाखालीं सदाभिरुचीची भीडमुर्वत सोडली; म्हणजे त्याचें विकृत व अतिरिक्त अनुकरण करणारे भुरटे अश्लीलतेचा कसा नंगा नाच घालतात याचें प्रत्यंतर प्रस्तुत काव्याच्या रूपानें पाहावयास मिळतें, आणि त्याच्या कर्त्याच्या अधःपाताची जबाबदारी त्या कीर्तिमान् लेखकांच्या माथीं अंशतःतरी जाऊन आदळते हें त्यांनी या पुस्तकावरून तरी शिकावें. त्यांत कींव करण्यासारखी स्थिति अशी कीं, कवीने आपली भाषा मोहक केलेली आहे आणि देशभक्तीचे उदात्त ध्येय उच्चारलें आहे. पण अंगावरील सुंदर कांति व मस्तकावरील तेजस्वी मणि यामुळें नागाचा विषारीपणा थोडाच कमी होतो ?

केसरी ३ फेब्रुवारी १९३३

**कलीका**–पृ. ३२ सं. सौ. वेणूबाई मोडक प्र. वाङ्मयोपासक मंडळ अहमदनगर कीं. ४ आणे जानेवारी १९३३

'कलिका' हा नगर जिल्ह्यातील जुन्या नव्या कवींच्या काव्यकलिकांचा गुच्छ आहे. या गुच्छांत सुवासिक फुलांच्या बरोबरच विविध प्रकारची पत्रीही आहे. सुप्रसिद्ध आधुनिक कवी श्री. के. ल. टेंभुर्णीकर यांच्य आग्रतीं जोडलेल्या दोन कविता त्यांच्या प्रतीभाप्रेरित काव्यशक्तिची साक्ष पटाविण्यास पुरेशा आहेत. दर्भांकुर, भित्यापाठीं ब्रह्मराक्षस, जननी, संसारातील सुधा, प्रेमलतचें फूल' काळयापण्यावर इत्यादि कविताही वाचनीय आहेत.

चित्रमयजगत् मे १९३३.

**कलिका**–पृ. ६६ प्र. वि. म. गायकवाड, ज्युबिली गार्डन, बडोदें. जून १९३३ किंमत ६ आणे.

'या छोट्याशा संग्रहांत श्री. वाघमारे, पुराणिक व जोशी या तीन बडोदेवासी होतकरू कवींच्या कविता प्रकाशित केल्या आहेत या तिघाही कवींचा नवशिकेपणा लक्षांत घेऊनही त्यांच्या सरस भाषाशैली बद्दल कौतुक वाटतें अधिक अभ्यासानें या तिघा कवींच्या हातून अधिक सरस काव्यनिष्पत्ती होईल असा भरंवसा हा संग्रह वाचून वाटूं लागतो'

किर्लोस्कर खबर सप्टेंबर १९३६

**काव्यसुधा**–८६ कवि डॉ. रा. अ. राईरकर, एम्. बी. बी. एस. प्र. गणेश महादेव आणि कंपनी, सदाशिव, पेठ, पुणें, मार्च १९३३ किं. १२ आणे

'डॉ. राईरकर हे एक हौशी कवी आहेत. त्यांची बरीचशी कविता गद्यप्राय असली तरी 'काव्यसुधा' एकंदरीनें वाचनीय वाटेल. डॉ. राईरकरांच्या कवितेत स्फूर्तीची चमक किंवा प्र-

तिभेचें पाणी लकाकत नसलें तरी ती प्रायशुद्ध बालबोध व सुव्यवस्थित आहे '

चित्रमयजगत् आगष्ठ १९३३.

कुंदकुंज—पृ. ९० संपादक—रा. ब. गोडबोले, प्र. वि. के. खासनीस बी. एजी., एस. टी. सी. म. ए. सोसायटी पुणें नं. २ फेब्रुवारी १९३३ किं. ६ आ.

सुंदर व सुगंधी अशीं सुमारें पन्नास रोपें या कविता—संग्रहांत लावलेलीं आहेत. त्यांत शिष्याप्रमाणेच शिक्षकांचाहि हात आहे. आनंदाची गोष्ट अशी कीं, अशा प्रौढांनी स्वतःकडे थोडीशीच जागा घेऊन विद्यार्थ्यांना विहार करण्यास मुबलक क्षेत्र ठेवलें आहे. त्यांत साहजिकच ऐतिहासिक प्रसंग, विद्येची महति, ईशभक्ति हेच विषय प्रधान आहेत. वृत्तांची विविधता असल्यामुळे कविता म्हणतांना गोडी वाटण्यासारखी आहे.

केसरी ३१ मार्च १९३३

गज्जलांजली पृ. १२०—ले. माधव जूलियन् प्र.—ल. ना. चाफेकर, आर्यसंस्कृति मुद्रणालय, टिळकरस्ता पुणें २ जून १९३३ किं. १ रु.

या गज्जलाचें गुणरूप माधव जूलियन यांनी पूर्वीच विवेचिलें असून आतां त्यांचीं शें—सव्वाशें उदाहरणें या पुस्तकांत संग्रहीत केलेलीं आहेत. यांपैकीं बरींच गीतें पूर्वी प्रसिद्ध झालीं असून आता तीं साफसूफ व क्वचित् दुरुस्तहि करून मांडण्यांत आलीं आहेत. बहुतेक सारी गीतें सुटीं आहेत. त्यांना गुंफणारें सूत्र विषयाचें नसून वृत्ताचें आहे. तथापी, प्रणयाची आराधना किंवा प्रेमभंगाचा विलाप यांचाच नाद मुख्यतः या सर्व गीतांतून उमटत आहे. आणि तो गज्जल म्हणजे प्रेमालाप या धात्वर्थाशी सुसंगतच आहे.

केसरी १७ आक्टोंबर १९३३

काव्यपरीक्षण प्रतिभा १४ आगष्ट १९३३

परीक्षक—श्री. के. ना. काळे बी. ए. एल. एल. बी.

गीतगुंजन—पृ. ९६ ले. सरोजसुहृद. प्र.—गो. भा. घाणेकर नवाकाळवाडी गिरगांव मुंबई ४ किं. १ रु. एप्रील १९३३.

सरोजसुहृद यांनी गेल्या दहा—बारा वर्षांत रचलेल्या १०८ कविता प्रस्तुत संग्रहांत संकलित केलेल्या आहेत. या पुस्तकाचा विशिष्ट गुण म्हणजे आल्हादक विविधता हा सांगण्यासारखा आहे. फुलांमागून फुलें आस्वादीत गुंजारव करण्याची वृत्ति त्यांत दिसते. आजकाल मराठी कवींची दृष्टि ज्या भिन्न भिन्न विषयांवर खेळत असते त्यांचे प्रातिनिधक स्वरूप या काव्यसंग्रहांत पाहावयास सांपडतें. विषयाप्रमाणेच चालींचीहि विविधता रम्य आहे. मात्र मांडणी किंवा कल्पना यांमध्ये कांहीं अभिनवतेत चमकून जाण्याचा प्रकार श्री. ' सरोजसुहृदांच्या' लेखणींत कमी प्रमाणामध्ये दिसतो.

केसरी १४ एप्रील १९३३

काव्यपरिचय संजीवनी १८ जानेवारी १९३३

परिचयकार ' एक रसिक '

जीवनलहरी पृ. ६५ ले.-कुसुमाग्रज. प्र.—वि. वा. शिरवाडकर, ग्रंथमंडळ, बालाजीमंदिर नाशिक. मे १९३३ किं. ४ आ.

या लहानसर पण मधुर काव्यांत कवीने आपल्या हृदयांतील भाव चित्रित केले असून प्रणयवाद आणि नवमतवाद हे रूढ विषयच या काव्यांत प्रामुख्याने खेळविले आहेत. कांही कांही शब्दचित्र मनोरम आहेत आणि कांही नवीन बनविलेले शब्दहि सुटसुटीत व अर्थवाहक आहेत.

केसरी ६ फेब्रुवारी १९३४

अंतर्गोल आणि बहिर्गोल असे कांचेचे दोन प्रकार असतात. त्यांपैकीं एकातून लक्ष्य वस्तु लहान दिसते, तर दुसरींतून बघणारापुढे तीच वस्तु प्रचंड स्वरूप धारण करते. हे दोन्ही गुण अनुकरणांच्या अंगी आढळतात. म्हणजे असें कीं, ज्याचें अनुकरण होतें, त्याचें गुण संकुचित आकारांत आणि त्याचें दोष मोठ्या प्रमाणावर अनुकरणांत उमटतात. या तत्त्वाचें प्रत्यंतर प्रस्तुत नाट्यकृतींत चमत्कारिक तऱ्हेने पाहावयास मिळतें. श्री. खाडिलकरांच्या 'स्वयंवर' व 'मेनका' या दोन नाटकांचें अनुकरण करून सावित्रीचें आख्यान रंगवावयाचें कोणा नवशिक्या लेखकाने मनांत आणलें असतें तर त्यांचे हातून जशी मूर्ति निर्माण झाली असती; त्यांच मासल्याची हीं कृति आहे. मध्यवयस्क खाडिलकरांचें उतारवयस्क खाडिलकरांनीं अनुकरण केलेल्या या नाटकांत आरंभीं वर्णिल्याप्रमाणे गुण आहेत पण अल्पप्रमाणावर आणि व्यंग आहेत, तीं ढोबळ स्वरूपाचीं. मराठी रंगभूमीच्या अग्रभागीं अव्याहत चमकणाऱ्या या नाटकामध्ये विषयाची निवड, रचनेचें चातुर्य किंवा प्रतिपादनाची पद्धति यांत कांहीच नाविन्य किंवा ताजेपणा आढळू नये याबद्दल कोणाहि नाट्यरसिकाला खेदच वाटेल.

केसरी ४ आगष्ट १९३३.

**साष्टांग नमस्कार**–पृ. १४९ ले. प्रल्हाद केशव अत्रे, बी. ए. बी. टी. प्र. प्रभाकर श्रीपद कोल्हटकर, बी. ए. संजीवनी कार्यालय ठाकुरद्वार-वाडी मुंबई, मे १९३३ किं. १ रु.

या नाटकाचें कथानक नक्की काय आहे हें शोधून काढण्याकरितां बक्षिसच लावलें पाहिजे. नाटकाची उभारणी मुख्यत्वें करून श्रीमंत औंधकरांची साष्टांग नमस्कार पद्धती, अलीकडील विद्वानांचा ज्योतिषावर बसत चाललेला फाजिल विश्वास, आणि तरूण कालेजियनची कत्री व लघुकथा लेखक म्हणून पुढे येण्याची हौस या विषयांच्या विडंबनेवरच मुख्यत्वेंकरून झाली आहे. जातां जातां अलीकडचे पेन्शनर वकीलांचा पोशाक, चित्रमय जगतांतील मृत्यूलेख, जूनचा अंक डिसेंबरमध्ये प्रसिद्ध होणारी मराठी मासिकें, किरकोळ विषयावर निबंध लिहून मिळणारी पीएच. डी. पदवी, व्यापाऱ्यांचें दिवाळें काढणें, देशभक्तांचें तुरुंगांत जाणे, केसरींतील भाषा इत्यादि प्रचलित विषयावर टवाळीच्या पद्धतीनें टीका केली आहे व हेंच या नाटकाचें खरें वैशिष्ट्य होय.

मनोरंजन नोव्हेंबर १९३३.

**स्त्री–पुरुष** पृ. १०८—ले. न. ज. कमतनुरकर, प्र. जी. बी. लांजेकर मुंबई फेब्रुवारी १९३३ किं. १ रु.

या नाटकाचें संविधानक महाभारतांतून घेतले आहे. रुक्मिणी व सत्यभामा आपसांत भांडतात व जांबुवंतीची रानटी म्हणून चेष्टा करतात. त्यांची फजिती करण्याकरितां कृष्णानें नारदास रुक्मिणी व सत्यभामा या पैकीं कोणालाही आपली पत्नी करून घेण्यास सांगितलें. याचा सूड घेण्याकरितां रुक्मिणीने आपल्या मायेनें नारदास मैत्रेयाची पत्नी करून त्यांची मुलें संभाळण्यास लविलें हा एकंदर कथानकाचा सारांश आहे. नाटक अगदीच सामान्य प्रतीचें आहे. त्यांत भाषेचे सौष्ठव नाही. कथानकाचा परिपोष नाही व संविधानकामध्ये चमत्कृतिजन्य प्रसंगही नाहींत

मनोरंजन नोव्हेंबर १९३३.

## लघुकथा व गोष्टी.

**अश्रुफुलें** पृ. १२० लेखक:—श्री. त्र्यं. श्री. वकील, बी. ए. प्र. कृ. श्री. जोशी, वागीश्वरी

कार्यालय चिटणीसपुरा नागपूर मे १९३३ किं. रु. १

" अश्रुफुलें" या संग्रहात दहा गोष्टी असून त्यांत वात्सल्य व कारुण्य यांचा प्रकर्षानें परिपोष केलेला आढळतो. श्री. वकील यांची भाषा सामान्यतः सरळ व सुटसुटित असून नाजुक भावना अभिव्यक्त करण्यासाठीं लागणारा लवचिकपणा त्यांच्या लेखनशैलींत भरपूर आहे. अश्रुफुलांतील बहुतेक सर्व गोष्टींत निराशेचें व नियतिवादानें वातावरण पसरलेलें असून हा परिणाम निर्माण करण्यासाठीं वास्तविकापेक्षां अकस्मातांचेंच साह्य लेखकानें अधिक घेतलें आहे. श्रीयुत वकील यांच्या लघुकथासंग्रहाचे सर्वेच गुण अगी अव्वल दर्जाचे नसले व त्यां गोष्टी जरी निर्दोष नसल्या तरी त्यांची प्रत्येक गोष्ट कोणत्या ना कोणत्या तरी कारणासाठीं वाचनीय आहे असें वाटल्यावांचून राहात नाहीं.

प्रतिभा २८ आगष्ट १९३३

कळ्यांचे निःश्वास–पृ. १५२ ले. विभावरी शिरूरकर बी. ए. प्र. ह. वि. मोटे वेलणकरांचा बंगला, पुणे नं. ४ जून १९३३ किं. १–४–०

अलीकडील सुशिक्षित तरुणींच्या कौमार्यंतून उद्भवणाऱ्या निरनिराळ्या नाजूक प्रश्नांचें मर्म या कथातून अत्यंत सहृदयतेनें विशद केलेलें आहे. त्या दृष्टीनें 'कळ्यांचे निःश्वास' हें नाव त्यांना खचित शोभतें. सुशिक्षित प्रौढ मुलींना सध्यांच्या संक्रमणकाळांत कोण कोणत्या प्रकारच्या दिव्यांतून पार पडावें लागत आहे. याची कल्पना या कथासंग्रहावरुनन उत्कृष्ट रीतीनें येईल. या कथांत केलेलें स्त्रीहृदयांतील भावनांचें विश्लेपण जितकें हलुवार तितकेंच चित्रण हृद्य आहे; व रसानुकूल भाषेची स्पृहणीय जोड त्यांना मिळालेली असल्यामुळें, हे 'निःश्वास' हृदयाला अगदीं हलवून सोडतात.

महाराष्ट्र ५ नोव्हेंबर १९३३

गौरीचा अधःपात–पृ. ९६ ले. व. प्र. वि. वा. हडप पुणे जून १९३३ किं. ४ आणे.

सामाजिक गोष्ट.

दीपावली–पृ. १५१ ले. वाग्भट नारायण देशपांडे बी. ए. एल्. एल्. बी. प्रकाशकः–गणेश महादेव आणि कंपनी. ६०८ सदाशिव पेठ, पुणे मे १९३३ किं. १–४–०

अलीकडे प्रसिद्ध होणाऱ्या लघुकथांच्या बऱ्याच संग्रहापेक्षां दीपावलीचें स्वरूप बरेंच वेगळें आहे. समाजाला आंजारून गोंजारून सामाजिक अन्यायांवर ललित वाङ्मयद्वारा टीका करण्याचा, व प्रागतिक मतांचा प्रचार करण्याचा, जो अभिनव मार्ग कै. हरिभाऊ आपटे यांनी चोखाळला, त्याची परंपरा पुढें चालू ठेवण्याचें कार्य कै. हरिभाऊ आपट्यांच्या मागून श्री. वा. ना. देशपांडे यांनीं चालविलें आहे. वास्तवपद्धतीनें सामाजिक दोष दिग्दर्शित करतांनाहि समाजाला धक्के न देतां त्याची सहानुभूति संपादन करावयाची हा या पद्धतीचा विशेष होय. 'दीपावलींतील' पांचहि गोष्टी उच्च मध्यम वर्गाच्या जीवनक्रमांत वारंवार घडून येण्यासारख्या प्रसंगावरच लिहिल्या असल्यामुळें गोष्टींतील वातावरण व परिस्थिति हीं सत्य सृष्टींतील वाटतात. व त्यामुळें पुस्तक वाचीत असतांना वाचकाचा कोठें हि विरस होत नाहीं, हा या कथासंग्रहाचा खरोच महत्वाचा गुण होय.

'प्रतिभा' २८ आगस्ट १९३३

काव्यपरिचय संजीवनी १४ सप्टेंबर १९३३ परिचयकार प्रो. र. श्री. जोगळेकर.

परडी पृ. ७४ कवि सी. जी. देशमुख, प्र. डी. चिंतामणी, पुणें. फेब्रुवारी १९३३ किंमत १२ आणे.

विविध विषयक स्फुट कविता

पारिजात पृ. ७८ सं. व प्र. पु. वि. रहाळकर, वाङ्मय वि मंडळ, नाशिक, जून १९३३ किं. ८ आणे.

या संग्रहांत १८ कवि-कवयित्रींच्या ३७ कविता संग्रहित केल्या आहेत. या संग्रहांत प्रो. पाध्ये यांजसारख्या मागच्या पिढींतील वृद्ध कवीपासून तों कु. शरयू रहाळकर सारख्या पुढील पिढीच्या कवयित्रीपर्यंत निरनिराळ्या वयोमानाच्या कवींच्या कविता दिलेल्या असल्यामुळें त्यांत विचाराच्या, भावनेच्या, विषयाच्या व रचनेच्या दृष्टीनें विविधता व मनोरंजकपणा दिसून यावा यांत नवल नाहीं.

किर्लोस्कर खबर सप्टेंबर १९३३

प्रेमांजली पृ. ३९ कवि 'मुकुंद' प्र. के. आर. बिदरकर, हैद्राबाद ( दक्षिण ) फेब्रुवारी १९३३ किं. ६ आणे.

प्रेमगीतें.

लीलेचा संसार-पृ. ११२ ले. त्र्यं. गं. घारपुरे प्र. गोपाळ ब्रदर्स आणि कं. विश्रामबागेसमोर, पुणे. जानेवारी १९३३ किं. १२ आणे.

या काव्यांत एका सासुरवासिणीच्या सासुरवासाचें करुणपूर्ण चित्र काढण्यांत आलें आहे. भाषा गद्यप्रायच असल्यामुळें स्त्रीवर्गाला ही कहाणी बोधप्रद वाटेल.

चित्रमय जगत मे १९३३

वीरश्रीशृंगार पृ. २५ कवि व्ही. जी. साठ्ये, प्र. पी. एस. जोशी, मिरज, जानेवारी १९३३ किं. २ आणे.

बाजी प्रभु देशपांडे यांच्या पराक्रमाचा पोवाडा

शंखध्वनि अथवा बोंबाबोंब पृ. ४४ कवि 'मनमोहन' प्र. जी. एन. नातू, पुणे फेब्रुवारी १९३३

विनोदी कविता संग्रह.

## नाटकें.

एप्रिल फूल-पृ. ४० ले. हरि विठ्ठल देसाई, प्र. सहकारी ग्रंथकार, गिरगांव, मुंबई एप्रिल १९३३ किं. ४ आणे.

'ही प्रहसनात्मक छोटी नाटिका वाचकांचें क्षणभर मनोरंजन करील.'

चित्रमय जगत सप्टेंबर १९३३

चाकणचा किल्ला. पृ. २९ ले. डी. व्ही. चापेकर, प्र. मराठी वाङ्मय प्रेमीमंडळ, गदग. १९३३ किं. २ आणे.

शिवकालीन नाटिका.

जागती ज्योत. पृ. ९४ ले. भा. वि. वरेरकर, प्र. डी. आर. देऊळकर, बॉंबे बुकडेपो गिरगांव, मुंबई एप्रिल १९३३ किं. १ रु.

सट्टेबाजीचे दुष्परिणाम दाखविणारी सामाजिक नाटिका.

देवकी. प. ११२ ले. वि. वा. हडप प्र. परचुरे पुराणिक आणि मंडळी, माधवबाग, मुंबई नं. ४, जानेवारी १९३३ किं. १२ आ.

'मराठी रंगभूमीवरील पौराणिक नाटकांचें तांडव कायमचें बंद पडल्याशिवाय तिला चांगले दिवस येणार नाहींत. प्रस्तुतचें नाटक हरिवंशाच्या आधारे रचण्यांत आलें असलें तरी चालू परिस्थितीचें त्याच्यावर जे जबरीचें आच्छादन घालण्यांत आलें आहे तें अप्रयो-

कला इत्यादि संबंधीं जे विचार प्रकट केले आहेत ते मोठे मननीय आहेत. पहिलीं कांहीं पाने केवळ काव्य पूर्ण आहेत. तीं वर्ज्य करतां कादंबरी चित्तवेधक आहे.

चित्रमय जगत् आगस्ट १९३३

## निबंधात्मक.

**गुजगोष्टी**–पृ. १७० ले. प्रो. ना. सी. फडके, एम. ए. प्र. वि. ना. दिक्षित, इंटर नॅशनल बुक सर्व्हिस, डेक्कन जिमखाना पुणें नं. ४ मे १९३३ किं. १–८–०

या पुस्तकाला ‘ गुजगोष्टी ’ हें जें नांव देण्यांत आलें आहे. तें चांगलें आहे, पण साभिप्राय वाटत नाहीं. ‘ गुजगोष्टी ’ हा जर एक वाङमयप्रकार मानावयाचा तर पूर्वी ‘ मनोरंजन ’ मध्यें येत असलेल्या ‘ नेपथ्य-पाठांना ’ एक स्वतंत्र वाङमयप्रकार कां म्हणूं नये ! इंग्रजी धर्तीचे व इंग्रजीवरून घेतलेले लघुनिबंध असें या पुस्तकाचें स्वरूप सांगतां येईल. मराठींत अशा प्रकारचा हा संकलित प्रयत्न नवीनच आहे. या पुस्तकांत एकंदर १७ लघुनिबंध आहेत. ललित भाषा पद्धति काव्यमय वर्णनें यामुळें प्रो. फडक्यांच्या कादंबरीप्रमाणें हें पुस्तकही ललित वाङ्मयाच्या वाचकाचे चित्त वेधून घेतल्या शिवाय राहणार नाहीं. या गुजगोष्टींचें जन्मस्थान मॉंटेन, मॅक्स ओरेल, हॅजलिट, गार्डिनर, स्टीव्हन्, ल्युकस, डॉ. जॉन्सन, इत्यादि इंग्रज लेखकांच्या निबंधांत सांपडत असल्यामुळें या वाङ्मय प्रकाराच्या स्वतंत्र निर्मितीचें श्रेय प्रो. फडक्यांना देतां येणार नाहीं हें उघड आहे. तथापि मराठी भाषेंत अशा पुस्तकाची भर टाकल्याबद्दल प्रो. फडके अभिनंदनास पात्र हेत हें सांगणें नकोच.

चित्रमयजगत अक्टोबर १९३३

पुस्तक परिक्षण यशवंत सप्टेंबर १९३३

परीक्षक श्री. गो. ग. तळवलकर

**हळदकुंकू** पृ. २८—ले. वि. ना. पांगारकर, कुंटे बिल्डिंग, गिरगांव बॅकरोड, मुंबई ८, एप्रिल १९३३ कीं. ४ आणे.

ह्या छोट्या पुस्तिकेंतील दोन्ही कथात्मक लेख चटकदार व बोधप्रद आहेत.

चित्रमय जगत सप्टेंबर १९३३

## हास्य विनोद.

**विषयांतर अथवा विनोदलहरी** पृ. १३७ . य. न. केळकर प्र. स. ल. कोकाटे, हनुमान —स सदाशिव पुणें जून १९३३ किं. १–४–०

सदर पुस्तकांत विरामचिन्हें, भिक्षेकरी, जाहिराती टीकाकार वगैरे दहा विषयांत उठलेल्या विनोदलहरी आलेल्या आहेत. लेख वाचतांना जोराचें हसूं असें कोठेंच लोटत नाहीं. पण बुद्धिग्राह्य अशा विनोदकल्पना सारख्या भेटत राहिल्यानें पुस्तकाचें वाचन मोठें गमतीचें वाटतें. स्थलपरत्वें चटकदार वर्णनें व शब्दचित्रें हींहि दिलीं असल्यामुळें पुस्तकाचा चटकदारपणा द्विगुणीत झाला आहे. तसेंच कोठे कोठे उपरोधाचा आश्रय करून मूळ रस रुचकर बनविला आहे. कोणास तरी खर्चीं घातल्याशिवाय विनोद उत्पन्न करतां येणें कठिण असतें हें खरें आहे; पण बहुधा त त्याची ते भारीच टर उडवितात ! लेखक जों जों या दोषापासून अलिप्त तों तों त्याचा विनोदांतील दर्जा उंच असे समजावयास हरकत नाहीं. रा. केळकर यांच्या विनोदांतील दर्जाहि या दृष्टिनें उंच आहे असेंच म्हटलें पाहिजे.

केसरी १ सप्टेंबर १९३३.

... प्रत
सं. ... नं.
ता. ...

देशभक्ताला देहांतशासन पृ. ८० ले. व प्र. वि. वा. हडप, पुणे, फेब्रुवारी १९३३ किंमत ४ आणे.

ढोंगी देशभक्ताची गोष्ट.

नवरत्नांचा हार—सर पहिला व दुसरा ले. व प्र. ल. ब. भोपटकर एम्. ए. एल. एल. बी. बलवंताश्रम, ३२२ सदाशिव पेठ पुणे २ मार्च १९३३ किं. १-४-०

स्वतंत्र्योन्मुख राष्ट्राचें वाङ्मय कसें जिवंत तेजस्वी व रसरशीत असावें याचा प्रस्तुत पुस्तक हा एक नमुना म्हणून सांगण्यासारखा आहे. स्वराज्यसंस्थापक श्रीशिवाजी महाराज व त्यांच्या रत्नमालेतील बाजीप्रभु व मुरारबाजी, व येसाजी इत्यादि नररत्नांची शूर कृत्यें जोरदार वाणीने या पुस्तकांत वर्णून भोपटकर यांनीं वीररस खडा केला आहे. त्याचबरोबर आपल्या डोक्यावरील स्वातंत्र्याचें आभाळ फाटत चाललें असतांना त्याला ठिगळें लावण्यासाठीं धांव ठोकणारे बापू गोखले, तात्या टोपे यांचीं हि चरित्रें, अपेशी असली तरी स्फूर्ति देणारीं असल्यमुळें, त्यांत गुंफलेलीं आहेत. या साऱ्या अठरा तुताऱ्यांतून लेखक वाचकांना एकच संदेश सांगत आहे आणि तो म्हणजे ' बा महाराष्ट्रा, तुझा भूतकाल मर्दुमकीच्या व स्वार्थत्यागाच्या चंडकिरणांनी प्रकाशित झालेला आहे.' या संदेशाने आपल्या अंगावर चढविलेली भाषाहि त्याला साजणारीच आहे. तिच्यांतील प्रश्नांच्या माला व विशेषणांच्या पंक्ति वाचतांना ' टापटाप् ' करीत घोड्यांचा एकादा जंगी रिसाला डोळ्यांपुढून दौडत जात आहेसें वाटतें. महाराष्ट्राच्या युद्धकथा या दृष्टीने पुस्तक तरुणांना वाचनीय आहे.

केसरी ३१ मार्च १९३३

पांचवी रात्र–पृ. ९६ ले. व प्र. वि. वा. हडप पुणे एप्रिल १९३३ किं. ४ आणे.

सामाजिक गोष्ट.

भावकथा पृ. २०५ ले. आधुनिक एकलव्य प्र. शिवराम गोविंद भावे, गुरुवार पेठ, सातारा. १९३३ किं. १ रु.

अलीकडच्या शेंकडों लघुकथासंग्रहांत या पुस्तकाप्रमाणें रमणीय व लक्षणीय असे संग्रह फारच थोडे सांपडतील. ' कल्हईवाली ' या गोष्टीचें कथानक अपरिचित अतएव अपूर्व असल्यामुळें वाचकाचें कुतूहल उत्तरोत्तर वाढतच जातें व तो न कळत गोष्टीच्या प्रवाहाबरोबर वहात जातो. मनोरंजकतेच्या दृष्टीनेंहि पहिल्या दोन्ही गोष्टी चांगल्या साधल्या आहेत. दुसऱ्या गोष्टींत स्त्रीस्वभावाचें व स्त्रियांच्या मनोभावनेचें ज पृथक्करण केलें आहे तें नुसतें हृदयाल्हादकच नाहीं तर यथातथ्यहि आहे.

पहिल्या गोष्टींतले कांहीं प्रसंग असंभवनीय व चमत्कारिक वाटतात, दुसऱ्या गोष्टींत तसला एकहि प्रकार नाहीं. तिसरी गोष्ट पहिल्या दोहोंच्या मानानें साधारण असली तरी स्त्रियांच्या प्रेमैकनिष्ठतेचें तें एक उदात्त चित्र आहे. अशा प्रकारें सुंदर व प्रवाहशील भाषा, आकर्षक कथनकौशल्य आणि भावपूर्ण मनोविश्लेषण या त्रिवेणी संगमामुळें हा संग्रह अपूर्व झाला आहे असें म्हणण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं.

चित्रमय जगत् अक्टोबर १९३३

पुस्तक परीक्षण मनोरंजन जानेवारी १९३४ परीक्षक श्री. नरहर रामचंद्र पारसनीस एम. ए.

मजूराची बायको. पृ. १०० ले. व प्र. वि. वा. हडप. पुणे मे १९३३ किं. ४ आणे.

सामाजिक गोष्ट

रजपूत वीरांगना पृ. ३२० ले. दु. आ. तिवारी प्र. ना. मा. नेमाडे श्रीकृष्ण प्रेस जळगांव. पूर्व खानदेश जानेवारी १९३३ किं. २ रु.

राष्ट्रिय व ऐतिहासिक कवनांचे कर्ते म्हणून शाहीर श्री. तिवारी यांचें नांव सुप्रसिद्ध आहे. त्यांनीं निरनिराळ्या मासिकांत लिहिलेल्या बारा गोष्टींचा हा संग्रह वाचकांना त्यांच्या कथनकौशल्यांची ओळख करून दिल्याशिवाय राहाणार नाहीं. रजपूत रमणींच्या शौर्यवीर्याचे चटकदार व स्फूर्तिदायक प्रसंग निवडून काढून त्यावर ह्या दीर्घकथांची उभारणी करण्यांत आली आहे. या संग्रहांतील प्रत्येक गोष्ट उद्बोधक व वाचनीय आहे. पुस्तकांत प्रसंगानुरोधानें पांच सहा चित्रेंही घातलीं आहेत.

चित्रमयजगत् मे १९३३.

लीलानर्स व कोल्हापूरची रंभा. पृ. ९६ ले. व प्र.: वि. वा. हडप पुणें मार्च १९३३ किं. ४ आणे

दोन लहान गोष्टी.

स्वैरसंचार—पृ. ३०० ले. भा. वि. वरेरकर प्र. बॉंबे बुकडेपो, मुंबई. ४ जानेवारी १९३३ किं. २ रु.

रा. वरेरकरांचा ओढा बुद्धीपेक्षां भावनेकडे आहे. ते लघुकथेकडे कला या दृष्टीनें न बघतां ' हेतु ' या दृष्टीनें पहातात. तंत्राच्या दृष्टीनें मामांच्या गोष्टी कदाचित् परिपूर्ण नसल्या तरी भावनेच्या दृष्टीनें त्या उत्कृष्ट ठरतील. त्यांच्या बहुतेक गोष्टी करुणरसपूर्ण आहेत. रा. वरेरकरांची भाषा साधीच आहे. पण ही साधी भाषाच फार परिणामकारक झालेली आहे. हा लघुकथासंग्रह हातांत घेतला असतांना एकामागून एक अशा पुस्तक संपेपर्यंत सर्व गोष्टी वाचण्याचा मोह अनावर होतो. समाजांतील अन्यायामुळें येणारा सात्त्विक संताप त्यांनी शद्बरूपानें चांगल्यापैकीं प्रगट केला आहे. ' सरकारी हृदय ' ' पतिता ' ' पोऱ्या ' ' फुली ' या गोष्टी वस्तुस्थितीनिदर्शक असल्यामुळें फार सुंदर वठल्या आहेत. वरेरकरांनीं आपल्या साध्या पण जोरकस भाषेंत समाजांतील " अन्याय चित्रें " चव्हाट्यावर मांडलीं आहेत. हीं चित्रें कुणालाही लहान मुलापासून स्वयंपाकघरांतल्या स्त्रियापर्यंत पहाण्यास हरकत नाहीं.

चित्रमयजगत् मे १९३३

सिंहस्थ व आणखी तीन गोष्टी पृ. १६४ ले. सरस्वती कुमार प्र. शं. कृ. देवभक्त ६६४ शुक्रवार पेठ, पुणे फेब्रुवारी १९३३ किं. १२ आणे.

या दीडशें पानांच्या पुस्तकांत चार कथा संग्रहीत केलेल्या आहेत. पैकीं ' सिंहस्थ' या पहिल्या गोष्टीनेच ५५ पृष्टें व्यापिलीं आहेत. त्या गोष्टीचें कथासूत्रहि केशवपनासारखें जीर्ण असें असून त्याची वीण सामान्य रीतीनेच केलेली आहे. विवेचनाचें पाल्हाळ फार आहे; प्रसंगाचा बांधेसूदपणा किंवा रसाची निर्मिति याजकडे लेखकाने लक्ष पुरवावयास पाहिजे. निदान लघुकथा या लघु असल्या पाहिजेत हे जाणून, त्याने एकेक भावनेचा गाभा तेवढाच एकेक लघुकथेत सहजपणें स्वाभाविकतेने आणि सूचकपणें मांडला पाहिजे. स्त्रियांच्या मनोवृत्तींचीं चित्रें काढण्यांत लेखकाला बरेच यश आलेले आहे.

केसरी १६ मे १९३३.

हृदय. पृ. २६८ ले. आर. जे. सामंत प्र. कर्नाटक प्रेस, ठाकुरद्वार, मुंबई, जानेवारी १९३३ किं. २—४—०

## इतिहास.

**ऐतिहासिक पत्रव्यवहार ( १६९०–१८६७ )**—पृ ४८२. सं. श्री. गो. स. सरदेसाई, रा. कृ. पां. कुलकर्णी, प्रो. या. मा. काळे प्र. समर्थभारत छापखाना पुणे. जून १९३३ किं. ५ रु.

प्रस्तुत ऐतिहासिक पत्रव्यवहारासारख्या पुस्तकांच्या संपादनकार्यांत फुटकळ आणि विखुरलेली इतिहाससाधनसामग्री एकत्र छापून व दुर्मिळ साधनेंहि पुनर्मुद्रणाचे योगाने अभ्यासकांना सुलभ करून देणें ही कामगिरी उपयुक्तच ठरते. तथापि इतके दिवस जाऊनहि अद्यापि साधनग्रंथप्रसिद्धीची जी अनास्था दहा पंधरा वर्षांपूर्वी आढळत होती ती अजून नाहीशी झाली नाही हे या पुस्तकाच्या दर्शनाने चांगलेंच पटतें. राजवाड्यांनी पत्रें छापून काढतांना केलेली खिचडी त्या वेळीं अपरिहार्य असली म्हणून ती १९३३ त प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांत असावी असें नाहीं. संपादन करतांना केवळ तारखांचा अनुक्रम लावून भागतें असें नाही. कांही पत्रांवर महत्त्वदर्शक टिप्पणे, इतर टीकात्मक निर्देश वगैरे टाळून काम भागणार नाही. तसेंच पाहूं गेलें तर एकंदर साडेचारशें पत्रांची मूळ स्थानांप्रमाणे विल्हे लावण्याचें काम सहज दोनचार ओळींत संपादकांना करणें अशक्य नव्हते. म्हणजे जुनीं पत्रें किती व अशी नवीन पत्रें किती याचा मेळ आंकडेवार मनाशी बांधतां आला असता. भारतवर्षांतील वगैरे पत्रें मुळांत छापणारांना दिलेली माहिती विनाकारण नवीन मुद्रणांत वगळली आहे. टाईप वापरतांना थोडाफार भेद केला असता तर शेवटी दिलेल्या सूचीला पत्रांतील मजकुराचा जबाब त्वरित मिळण्याची सोय झाली असती.

केसरी १३ आक्टोबर १९३३.

**कर्नाटकाचा इतिहास**— ले. रा. अ. शिंदे व. भि. गो. वेडेकर प्र. वाग्विलास बुक डेपो, हुबळी किं. ८ आ.

कर्नाटकाचा संक्षिप्त पण सर्वांगीण इतिहास मराठींत लिहिण्याचें काम शिक्षणांत मुरलेल्या या लेखकद्वयानें चांगल्या प्रकारे पार पाडले आहे. या पुस्तकाचा उपयोग कर्नाटकांतील शाळांस तर होईलच, पण तेथील व महाराष्ट्रांतीलहि सर्व सामान्य वाचकांना होईल. चित्रें, नकाशे वगैरे मुळे पुस्तकाची उपयुक्तता वाढलेली आहे.

केसरी १७ फेब्रुवारी १९३३

**प्राचीन द्राविड** पृ. १७६—ले. लक्ष्मण गोविंद घाणेकर, बी. ए. बडोदें. किं. १ रु.

प्रस्तुत पुस्तक द्राविडी संस्कृतिकडे सामान्य लोकांचे लक्ष लागावें या हेतूने लिहिल्याचें ग्रंथकाराने प्रस्तावनेंत नमूद केलें आहे. हा हेतु सिद्धीस जावा म्हणून ग्रंथकारानें द्राविड देश, लोक, संस्कृति वगैरेचीं अनेक तऱ्हेची माहिती मोठे श्रम घेऊन एकत्र करण्याचा प्रयत्न केला आहे. पण ज्या ग्रंथांवरून लेखकाने ही माहिती एकत्र केली ते ग्रंथ दुर्बोध असल्याने लेखकास नीट समजले नसावेत व शिवाय विषयाचा नीट अभ्यासहि लेखकाने केला नसावा. तसेंच द्राविड संस्कृतीचा अभ्यास करण्यास आवश्यक असणारें द्राविडी भाषाज्ञानरुपी भांडवलहि लेखकापाशीं नाही. यामुळे इतके श्रम करूनहि लेखकाच्याच भाषेंत बोलावयाचें तर त्याने केलेला हा चिवडा खमंग न झाल्याने लोक द्राविड संस्कृतीच्या ज्ञानाचें भोजन करण्यास प्रवृत्त होतील किंवा नाही याची शंकाच आहे.

केसरी २६ सप्टेम्बर १९३३

**मठगांवचा शिलालेख, आणि कुडाळ प्रांताचा प्राचीन इतिहास–हला पहिला– पृ. १७६ ले. श्री. अर्जुन बळवंत वालावलकर, १३ वरोज लेन ठाकुरद्वार मुंबइ २. जानेवारी १९३३ कि. १–२–०**

प्रस्तुत पुस्तकांतील विषय हा कुडादेशच्या प्राचीन इतिहासाबद्दल असून कुडाळदेशचे प्राचीन सत्ताधीश कोण ? या स्वरूपाचा आहे. श्री. पिंगुळकर, 'सावंतवाडी संस्थानाचा इतिहास'कर्ते, रा. सा. बांबर्डेकर 'मठगांवचा शिलालेख व ब्राह्मण सामंत राजवंश' या पुस्तकाचे कर्ते आणि प्रस्तुत पुस्तकाचे लेखक हे या वादांत भागीदार आहेत. यापैकी रा. सा. बांबर्डेकर यांचे म्हणणें कुडाळदेशाचे प्राचीन सत्ताधीश कुडाळदेशकर ब्राह्मण हे असून वाडीचे मराठे सावंत यांनी मागाहून सत्ता बळकाविली. इतर दोघे लेखक या म्हणण्याला विरोध करणारे आहेत. या वादांत 'मठगांवचा शिलालेख' हा एक पुरावा धरलेला आहे. या लेखाचें वाचन इ. स. १९०३ पासून कै. राजवाडेप्रभृति लोक करीत आले असून त्याचें संपूर्ण वाचन निरपवादपणें अद्याप झालें असावें असें मानण्यास जागा नाही. अशी वस्तुस्थिति असल्याने प्रस्तुत पुस्तकासारखे विवेचन प्रसिद्ध करण्यासारखी वेळ अद्यापि आली नाही असें जरी आमचें मत असलें तथापि विषय स्पष्ट करून मांडल्यामुळे श्री. बांबर्डेकरांच्या क्लिष्ट लेखनशैलीपेक्षा श्री. बालावलकर यांचे लिखाण अधिक सोपे व विषय समजण्याच्या दृष्टीने उपयुक्त वाटतें. स्थानिक कल्पना, दंतकथा व त्या प्रांताची इतिहासविषयक सामुग्री या पुस्तकांत एकत्र पाहावयास मिळते हाहि एक या पुस्तकाचा विशेष आहे.

केसरी १३ आक्टोबर १९३३.

**मराठ्यांच्या उत्तरेकडील मोहिमा–भाग–१ ला. (१७२०–१७४०)–लि. व प्र. विश्वनाथ गोविंद दिघे, एम. ए. १९३३ किं. १ रु.**

रा. दिघे यांनी आपल्या परिश्रमाची फलश्रुती अजमावण्याचें साधन पुस्तकांत कोठेंतरी ठेवणें जरुर होतें. वारंवार पुरस्कारांत व प्रस्तवनेंतही उल्लेखिलेल्या नव्या साधनांनी वर्ण्य इतिहासांत कोठे व किती भर पडली हें रा दिघे यांना एक–दोन परिच्छेदांत नमूद करणें केव्हांही शक्य होतें. आणि तसें केल्यानें सहजच रा. दिघे यांच्या अभ्यासाचा व त्यांनीं वापरलेल्या साधनांचा गौरव मनांवर ठसला असता. अभ्यासकानें आपल्या व्यासंगानें केवळ प्रत्यंतर जाहीर रीतीनें निर्माण करण्याकडे जितकें लक्ष द्यावयास पाहिजे त्यापेक्षांही आपल्या अभ्यासानें इतरांना खरें व उद्बोधक साहाय्य होऊन त्यांचें श्रम थोडे तरी वांचविण्याकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे. असें आमचें मत आहे. त्या दृष्टीने पाहिलें असतां मराठ्यांच्या उत्तरेतील मोहिमा दर्शविणारा एखादा नकाशा किंवा त्याची जागा अंशतः तरी भरून काढण्याच्या दृष्टीनें अपरिचित स्थलाविषयीं सूचक टीपा या पुस्तकांत अवश्य. द्यावयास पाहिजे होत्या. एखादी छोटी सूचि हे हल्लीच्या युगांत अत्यंत आवश्यक अंग होऊन बसलेलें आहे इकडे दुर्लक्ष करणे बरोबर नाहीं. पत्रांचे उतारे घेतांना कधीं काळीं लेखकानें अनवश्यक भाग वाढविला आहे. तर एकंदर वृत्तान्तांत जुन्या भाषेतील शब्द वापरण्याच्या हौशीने कांहीं दुर्बोध स्थळें निर्माण केली आहेत. सामान्यतः लेखकाचे नवशिकेपणामुळें लेखनाचा प्रकार थोडा वळणें घेणारा झाला असून त्यांत ओघाचा सरळपणा प्रतीत होत

नाहीं. आणि कित्येक ठिकाणीं आपण एकादा सुसंगत वृत्तांत वाचीत नसून कांहीं पत्रांचा सारांश वाचीत आहोंत असा मनावर परिणाम होतो. परंतु हे सर्व लेखनकलेचे दोष असून ते रा. दिघे यांचा सराव वाढत जाईल तसे अनायासानें दुरुस्त होतील. अभ्यासाचे दृष्टीनें विचार करतां रा. दिघे यांचे परिश्रम व त्यांची चिकाटी अभिनंदनीय आहे यांत शंका नाहीं.

केसरी १३ आक्टोबर १९३३

पुस्तक परीक्षण ' प्रतिभा ' ३१ जुलै १९३३ परीक्षक श्री. य. न. केळकर.

## प्रवास व स्थलवर्णन.

**अमेरिका पूर्वखंड, पृ. २२८:—ले.** ना. ह. आपटे, प्र. व्यं. शा. बळकुंदी, नवभारतग्रंथमाला, नागपूर १९३३.

या ग्रंथामध्यें अमेरिका खंड शोधून काढल्यावेळेपासून तों स्वांतत्र युद्ध संपून जार्ज वाशिंग्टन पहिला लोकनियुक्त अध्यक्ष होईपर्यंतचा इतिहास, सोप्या मनोरंजक भाषेंत दिला आहे. पुस्तक वाचतांना आपण इतिहास वाचित नसून कादंबरीच वाचित आहों असें वाचकांस वाटते. श्री. आपटे यांनीं हें पुस्तक अमेरिकेवरील तेरा पुस्तकें वाचून लिहिलें आहे व जरी हा ग्रंथ स्वच्छ भाषांतर नाहीं असे प्रस्तावनेंत सांगण्याची काळजी श्री. आपटे यांनी घेतली आहे तरीं त्यांचे स्वतःचें यांत कांहींच नाहीं अशीं कबूलीहि त्यांना द्यावी लागली आहे.

मनोरंजन जून १९३३,

**कलकत्ता—पृ. १९ ले.** बाळकृष्ण श्रीधर कोल्हटकर प्र. शं न. जोशी., चित्रशाळा पुणें मे १९३३ किं. दोन आणे.

हिंदुस्तानची एका काळची राजधानी व हिंदुस्तानांतील एक सुन्दर शहर या दृष्टीनें कलकत्ता शहर हें प्रेक्षणीय आहे. तेथें अनेक नयन मनोहर व आकर्षक अशीं ठिकाणें आहेत. परन्तु सर्वांनाच तें शहर पाहण्याची शक्यता नसते. त्यांना प्रस्तुत पुस्तक त्या शहराची योग्य कल्पना देईल. पुस्तकांत कलकत्त्यांतील प्रेक्षणीय ठिकाणांची चित्रेंहि दिली आहेत.

केसरी ६ जून १९३३.

**माझ्या हिमालयातील यात्रा—पृ. २०४** ले. मो. गो काळे, प्र. शं. न. जोशी. चित्रशाळा प्रेस पुणें मार्च १९३३ किं. १ रु.

हरिद्वार, हृषिकेश, स्वर्गाश्रम, गंगोत्री टिहरी हीं हिमालयांतील स्थळे वनश्रीच्या वैभवानें सदैव नटलेली असून प्रपंचानें कावलेल्या मनाला अनिर्वचनीय समाधान शांती व आनंद देणारी आहेत. ज्यांना प्रत्यक्ष तेथे जाणें शक्य असेल त्यांनी अवश्य जावेंच; परन्तु ज्यांना तसें जाणें शक्य नसेल त्यांच्या सोयीसाठी श्री. काळे यांनी काढलेले शद्बचित्र अवश्य वाचावे. श्री. काळे यानी हा प्रवास पायी केला असल्याने सामान्य माणसास तेथें काय अडचणी येतात याचा त्यांना प्रत्यक्ष अनुभव आला आहे व तो त्यांनी यांत मांडला असल्याने पुस्तक उपयोगी झालें आहे.

केसरी १६ फेब्रुवारी १९३४

**विजापूर वर्णन:—पृ. ९८** ले. रामचंद्र दामोदर जोशी प्र. गणेश महादेव आणि कं. पुणें शहर. जून १९३३ किं. ८ आणे.

या पुस्तकांत विजापूरसंबंधीं सर्व प्रकारची ऐतिहासिक भौगोलिक व स्थानिक माहिती दिली असून दंतकथांचाहि त्यांत अंतर्भाव झाला आहे.

पुस्तक उद्‌बोधक व मनोरंजक झालें आहे. भरपूर चित्रें, सुंदर छपाई व उठावदार बाह्यांग, यामुळें त्याला आकर्षकपणा आला आहे.

चित्रमयजगत डिसेंबर १९३३

## चरित्रें

**डॉ. बेझंट चरित्र**–पृ. १७१ ले. रा. स. भागवत, एम. ए. प्र. गणेश महादेव आणि कंपनी सदाशिव पेठ पुणे, फेब्रुवारी १९३३ किं. ८ आणे

सुप्रसिद्ध थिऑसाफिस्ट व हिंदी राष्ट्रावर मनोभावाने प्रेम करणाऱ्या डॉ. बेझंट यांचें हे छोटे चरित्र त्यांच्या धार्मिक राजकीय व सामाजिक चळवळींचा वृत्तांत समजून घेण्याच्या दृष्टीने मोठें वाचनीय झालें आहे.

चित्रमय जगत आगस्ट १९३३

**धर्मवीर राजे लक्ष्मणराव भोसले**–पृ. ८७२ ले. पा. गो. रानडे, प्र. म. अ. धारे, महाराष्ट्र औषधीकारखाना, श्री रंगुबाई-पॅलेस, बेळगाव, मे. १९३३ किं. २–८–०.

नागपूरच्या ऐतिहासिक घराण्यांतील कै. धर्मवीर राजे लक्ष्मणराव भोसले यांचें हें विस्तृत चरित्र माहितिपूर्ण व उद्‌बोधक असल्यामुळें वाचकांना प्रिय होईल. पहिल्या शंभर पानांत नागपूरकर भोसले घराण्याचा सविस्तर वृत्तांत दिला असून पुढील साडेतीनशे पाने राजेसाहेबांच्या चरित्राने व्यापलीं आहेत. राजेसाहेबांच्या विविध क्षेत्रांतील कामगीरीचे यांत चटकदार वर्णन केले आहे.

चित्रमय जगत सप्टेंबर १९३३

**नरसिंह मेहता**–ले. दा. ना. आपटे बी. ए. एल. एल. बी., श्री. सयाजी साहित्य-माला, बडोदे १९३३ किं. ६ आणे.

'गांधी सारख्यानांहि वंद्य होऊन राहिलेल्या या गुर्जर कवीबद्दल स्वाभाविकपणेंच महाराष्ट्रीय वाचकांना वाटणारी जिज्ञासा या पुस्तकानें बरीचशी तृप्त होण्यासारखी आहे. नरसिंह मेहता यांच्या काव्याचें रा. आपटे यानी केलेलें पर्यालोचन सहृदयतापूर्ण व मार्मिक आहे.

किर्लोस्कर खबर मार्च १९३४

**ना. गोपाळ कृष्ण गोखले**–पृ. १६४ ले. प्रो. श्री. रा पारसनीस, एम. ए. प्र. चित्रशाळा प्रेस, पुणें मार्च १९३३ किं. १२ आणे

ना. गोखले यांचें विस्तृत असें चरित्र प्रसिद्ध झालेलें नाहीं कांहीं त्रोटक चरित्रें प्रसिद्ध झालेलीं आहेत, पण तीं फारच लहान आहेत प्रस्तुतचें प्रो. पारसनीसांनीं लिहिलेलें चरित्र त्या मानानें बरेच विस्तृत व पुष्कळ माहिती गोळा करून परिश्रमपूर्वक असें लिहिलेलें आहे.

किर्लोस्कर खबर सप्टेंबर १९३३

**न्यायमूर्ति पं. केशवराव यांचे चरित्र**–पृ. ८६ ले. का. सि. वैद्य एम. ए. एल. एल बी. प्र. राघवेंद्रशर्मा, वैदिकाश्रम, पुणें नं. ८ मे १९३३ किं. ८ आणे.

'हें छोटेसें चरित्र माहितीपूर्ण आहे यांत रावसाहेबांच्या खानगी व सामाजिक आयुष्य क्रमाच्या ज्या हकीकती दिल्या आहेत, त्या उद्‌बोधक व मनोरंजक झाल्या आहेत.

चित्रमय जगत सप्टेंबर १९३३

**पन्नास वर्षांतील कांही जुन्या नव्या गोष्टी.** पृ. ९८–ले. डी. एस. सावरकर, प्र. पी. डी. सावरकर, पुणें एप्रिल १९३३ किं. ८ आणे.

स्थळ प्रत
सं. ........ नं. .........
ता. ........ ....

श्री बसवेश्वर पृ. ३६ ले. एस. जी. साखरपेकर, प्र. के. एस. छप्रे. निपाणी. मार्च १९३३ किं. ८ आणे.

श्रीसंत बहिरजीबोवा यांचें चरित्र. पृ. १२ ले. व. प्र. एन. खरशीकर, खर्शी, जि. सातारा. जानेवारी १९३३ किं. ८ आणे.

रशियाचे गांधी कौन्ट लिओ टॉलस्टाय–पृ. १४८ ले. गं. भा. निरन्तर, बी. ए. प्र. महाराष्ट्र पब्लिशिंग हाऊस, १२ बुधवार पेठ मार्च १९३३ किं. १२ आणे.

' हें पुस्तक विद्यार्थी व सामान्य वाचक यांच्या दृष्टीनें आटोपशीर असून तें चटकदार भाषेंत लिहिलें आहे. गांधी व टॉलस्टॉय यांचें समानार्थक उद्गार एकत्रित करून टॉलस्टॉय हे रशियाचे गांधी कसे आहेत तें साधार दाखविलें आहे.

चित्रमय जगत जुलै १९३३

श्रीमंत सयाजीराव महाराज ( व्यक्ति व कार्य ) पृ. ११५ ले. वि. पां. दांडेकर, प्र. गणेश महादेव आणि कंपनी, ६८८ सदाशिवपेठ, पुणे मार्च १९३३ किं. ८ आणे.

हरिभाऊ आपटे पृ. १२१ ले. नी. म. केळकर, प्र. गणेश महादेव आणि कं. सदाशिवपेठ, पुणें. जून १९३३ किं. ८ आणे.

हुतात्मा श्रद्धानंद–पृ. १९ ले. अ. य. देशपांडे प्र. शं. ना. जोशी, चित्रशाळा पुणे. मार्च १९३३ किं. २ आणे.

आर्य संस्कृती, आर्य धर्म, यांच्या प्रसारार्थ अविरत परिश्रम करणारे हुतात्मे स्वामी श्रद्धानंदजी यांचें अल्प चरित्र या पुस्तकांत मांडलं आहे

केसरी जून १९३३

## किरकोळ.

खेड्यांत जाऊन काय करणार ? पृ. ९६ अनुवादक पी. एस. साने, प्र. व्ही. वर्दे. मुंबई, जानेवारी १९३३ किं. २ आणे.

ग्रामसुधारणेवरील महात्मा गांधीच्या लेखांचा अनुवाद.

श्री समर्थांचे भविष्यपुराण पृ. ३२ संपादक आणि प्रकाशक आबा चांदोरकर, पुणे फेब्रुवारी १९३३ किंमत ८ आणे.

श्री समर्थकृत श्रीवनभुवनी काव्याचें सटीक विवरण.

## बालवाङ्मय.

एका गाढवाचें आत्मवृत्त पृ. ६८ ले. जगन्नाथ विष्णु बापट प्र. शं. न. जोशी, चित्रशाळा, पुणें. किं. ४ आणे.

गाढव हा प्राणी अत्यंत लोकोपयोगी व कष्टाळू असून त्याच्या गरजा थोड्या आहित. तथापि मनुष्याकडून त्याला ज्याप्रमाणे वागविण्यांत यावें तशी वागणूक त्याला मिळत नाही. या गोष्टी 'पांढऱ्या' गाढवाने आपल्या आत्मवृत्तांत नमूद केल्या आहेत. त्यांतील भिन्न भिन्न अनुभव मनोरंजक आहेत. लेखकाने विषयाशी तादात्म्य होऊन हें वृत्त लिहिलें आहे. ते वाचनीय आहे.

केसरी ६ जून १९३३

कळीचा नारद पृ. ३२. ले. एम. के, जोशी. प्र. महाराष्ट्र पब्लिशिंग हाऊस पुणें. मार्च १९३३ किं. ३ आणे.

चार उपदेश पृ. ९७ ले. ह. ना. आपटे, प्र. आर्यभूषण प्रेस, पुणें फेब्रुवारी १९३३ किं. ६ आणे.

**चार सुबोध संवाद**–पृ. ८४ सं. प्रिं. सि. रा. तावडे प्र. ए. पी बापट, बुधवारपेठ पुणें जानेवारी १९३३ किं. ५ आणे

अस्पृश्यता, शारदाकायदा, समाजसेवा व मातृभक्ति या चार विषयांना अनुलक्षून असलेले हे संवाद विद्यार्थ्यांना बोधप्रद व उपयुक्त झाल्यावांचून राहणार नाहींत.

चित्रमय जगत नोव्हेंबर १९३३

**धर्मराज**–पृ, १०८ अनुवादक बा. बा. फाटक, प्र. के. भि ढवळे, गिरगांव मुंम्बई एप्रिल १९३३ किं. ६ आणे.

प्रस्तुत छोटेसे पुस्तक, श्री. नानाभाई यांनीं ' युधिष्टिर ' नांवाचे जे एक पुस्तक गुजराथी भाषेत लिहिले आहे त्याचा अनुवाद आहे. भाषा सोपी व चटकदार असल्यामुळे लहान मुलें सदर पुस्तक आवडीने वाचतील. धर्मराजाचे चरित्र वाचीत असतां जागोजागीं चालू राजकारणांत ऐकू येणारी भाषणे आढळतात. चित्रांमुळे पुस्तकाचीं संग्रह्यता वाढली आहे.

केसरी १७ आक्टोबर १९३३.

**धर्मव्याध व त्याचे तत्वज्ञान.** पृ. ४० ले. पी. व्हो तिखडेकर, प्र. के. भि. ढवळे, गिरगांव मुम्बई जून १९३३

**बाल अरेबियन नाईट्स** भाग १ला पृ. १२० ले. टी. पी थोरात, प्र. के. भि ढवळे गिरगांव मुंबई, मे १९३३ किं. ८ आणे.

**बालवीर मारुती.** पृ. ६८ ले. एस. एल. थोरात, प्र. के. भि. ढवळे, गिरगांव, मुंबई एप्रिल १९३३ किं. ३ आणे.

**भीमाची कथा.** पृ. २८ ले. जी. व्ही. चिपळूणकर, प्र. चित्रशाळा, १०२६ सदाशिवपेठ, पुणें. मे. १९३३ किं. ८ आणे.

**मुलांचा दासबोध** पृ. ११८ ले. ले. प्र. एम. आर. मरूळकर मंद्रुप. मार्च १९३३ किं. ५ आणे.

**मुलांचा मित्र** पृ. ६० ले. रा. आ. एकबोटे, प्र. चित्रशाळा प्रेस, पुणें मे. १९३३ किंमत ४ आणे.

या पुस्तकांत निरनिराळे दहा विषय घेऊन त्यांनाविषयींची लहान मुलामुलींना समजेल अशी माहिती संवादरूपाने दिली आहे. पुस्तक तयार कसें करतात, तिकिटांची कामगिरी काय असते, आगगाडी, मोटार वगैरे यांत्रिक वाहनें कशीं चालतात, दुर्बीणीचें वैशिष्ट्य काय वगैरे प्रश्नांचीं उत्तरे त्यांत देण्याचा प्रयत्न केला आहे. लहान मुलामुलींच्या हातीं देण्यास हें पुस्तक योग्य असें आहे.

केसरी ७ जुलै १९३३.

**रघुवंशकथा**–पृ. १७६ ले. नी. शं. नवरे बी. ए. बी. टी. प्रकाशक–एम. एम. कुलकर्णी. मालक भारत गौरवग्रंथमाला ३१८, ए. ठाकुरद्वार, मुंबई एप्रिल १९३३ किं. १ रु.

सदर पुस्तकांत या प्रासादिक काव्यांतील ठळक ठळक व मनोहर प्रसंग कथा रूपानें लेखकाने मराठींत लिहिले आहेत मूळ कथेतील आकर्षकपणा लेखकाच्या सोप्या सरळ मराठी गद्यांत चांगला प्रतिबिंबित झाला आहे. कथा सांगतां सांगतां कालिदासांच्या समर्पक उपमा, शृंगार करुण व वीर या रसांचे उत्कृष्ट नमूने रसाळ देवतास्तुती इ. गोष्टींचा परिचय वाचकांस व्हावा या बेताने तो तो भाग आटोपशीर रीतीने आणला आहे. सुभाषिते हा काव्याचा एक विशेष आहे. त्यांचीही ओळख केवळ आशय आणूनच नव्हे तर तळटीपांत मूळ संस्कृत सुभाषित देऊन करून देण्यांत आलेली आहे. तसेच पुस्तकांत एक नकाशा व दोन चित्रें घालून

पुस्तकाच्या अंतरंगाला सौंदर्य व उपयुक्तता यांची जोड देण्यांत आली आहे.

केसरी ४ आगस्ट १९३३

लहान मुलांचा हरीविजय–पृ. २४ ले. व प्र. बी. जी. शिंदे, पुणे मे १९३३ किं. आणे

विद्यार्थी जादूगार. पृ. १६ ले. व. प्र. के. बी. लेले. पुणे मार्च १९३३ किं. १ आणा

सरस्वतीचा प्रसाद–पृ. ४८ ले. वि. कृ. नेरुरकर. प्र. के. भि. ढवळे, गिरगांव मुंबई फेब्रुवारी १९३३ किं. ३ आणे.

या पुस्तकांत छोट्या आपण लिहितों ती लिपी कशी निर्माण याची काल्पनिक कथा दिला आहे. कथेची उभारणी कावळा, घोडा, घुबड, चिचुंद्री, उन्दीर वगैरे अनेक प्राणी जे आवाज काढतात त्यावर केलेली असून लहान मुलांना समजेल अशा सोप्या व चटकदार भाषेत कथा लिहिल्या आहेत.

केसरी १ जून १९३३


स्वामी रामतीर्थ पृ. ५२ ले. वि. वि. करमरकर, प्र. के. भि. ढवळे, मुंबई, जानेवारी १९३३ किंमत ४ आणे.

चालू जडयुगांतील साक्षात्कारी पुरुष व संत तुळशीदास यांचे वंशज स्वामी रामतीर्थ यांची चरित्रें अनेक भाषांतून प्रसिद्ध झाली आहेत. श्री. करमरकर यांनी सदर छोटेसें चरित्र लिहून मराठींतीळ बालवाङ्मयांत पवित्र भर टाकण्याचे श्रेय जोडलें आहे. स्वामी रामतीर्थ यांचे हिंदी पर्शियन व इंग्रजी या भाषांतर प्रभुत्व होतें. त्यांनी आपल्या भाषणांनी व लेखांनी अखिल जगतात दिगंत कीर्ति संपादली व त्यांच्या ऋषितुल्य राहणीने ते सर्व देशांना आदरणीय वाटूं लागले. अशा या थोर व अधिकारी पुरुषाचें चरित्र लहान मुलामुलींच्या हाती वाचण्यास देणें अत्यंत इष्ट आहे. आरंभी फोटो व शेवटी 'सूक्तिसुधा' दिलेली आहे.

केसरी १७ अक्टोबर १९३३

---

वेळ हाच पैसा



नवीं घड्याळें विकणार !

जुनीं घड्याळें दुरुस्त करणार

रानडे यांची

दी नॅशनल वॉच रिपेअरिंग फर्म,

कोठी समोर, बडोदें.

## स्वीकार व सत्कार

**कप्तान**—सं. व प्र. वसंत बळवंत कप्तान, बडोदें वा. व ट. ख. सह ३ रु.

**भारतमित्र**—सं. नारायण भास्कर नाईक, पो. रिवण प्रांत गोवा. वा. व. २॥ रु. वाचनालयांस १ रु.

**सहविचार**—सं. प्रो. वि. पां दांडेकर. प्रो. वि. द. साळगांवकर व श्री. रा. रा. नातू सहविचारिणी सभा, बडोदें वा. व १-१३-०

## पुस्तकें

**चिमणरावांचें चऱ्हाट**—ले. व प्र. प्रो. चिं. वि. जोशी दांडिया बाजार बडोदें किं. २ रु.

**दांपत्यरहस्य नाटक**—ले. वि. ग. ताम्हनकर, प्र. ना. त्रिं. भिडे, मॉडर्न बुक डेपो, विष्णुपुरा, पुणें नं. २ किं. १ रु.

**निवृत्ति विनोद**—अनुवादक प्रो. वि. पां. दांडेकर प्र. प्रो. अ. क. त्रिवेदी बडोदें किं. १-८-०

**व्यायाम क्षेत्र व श्रीमंत महाराज साहेब**—ले. राजरत्न प्रो. माणिकराव, प्र. शेठ हिरालाल छगनलाल, बाजवाडा बडोदें, किं. १। रु.


## विविधकला मंदिर.

या श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या खास प्रोत्साहनानें स्थापन झालेल्या बडोद्याच्या या ३० वर्षांच्या जुन्या संस्थेंत सर्व तऱ्हेची फोटोग्राफी, ग्लास डेकोरेशन एनग्रेव्हिंग, पेंटिंग एनलार्जिंग, रबरस्टॅंप मेकिंग वगैरे कारागिरीचीं कामें अत्यंत दक्षतेनें व माफक दरांत वेळचे वेळीं करुन दिलीं जातात. एक वेळ काम देऊन अनुभव घ्या.

प्रोप्रायटर महादेव गणेश शितूत.

आर्टिस्ट फोटोग्राफर—बडोदें.

# अभिप्राय संग्रह साधनें

आनंद सं गो. ग. तळवलकर, श्रीमती लक्ष्मीबाई प्रधान व गो. व जोशी, प्र. गो. व. जोशी आनंद छापखाना, १९१ सदाशिव पेठ, पुणें वा. व. ट. ख. ३ रु.

कप्तान सं. आणि प्र. वसंत बळवंत कप्तान, बडोदे वा व. ख. सह ३ रु.

किर्लोस्कर सं. आणि प्र. शं. वा. किर्लोस्कर, किर्लोस्करवाडी, जि. सातारा वा. व. रु. २-४-०

केसरी सं. आणि प्र. ज. स. करंदीकर ५६८ नारायणपेठ, पुणें वा. व. पुण्यात ३ रु. पुण्यावाहेर रु. ४-१०-०

चित्रमयजगत प्र. शं न. जोशी. चित्रशाळा सदाशिवपेठ वा. व. पातळ कागद रु. ३-८-० जाड कागद रु. ५-८-०

तत्वज्ञानमंदिर—सं. आणि प्र. श्री. दि. सा. नाईक, तत्वज्ञानमंदिर, अमळनेर जि. पूर्व खानदेश वा. व. ३॥ रु.

धर्मजागृति—सं. श्री. रा. स. भागवत प्र. शं. त्रि. खांडेकर, मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन, ठाणें वा. व. २॥ रु.

नवजीवन सं. अणि प्रकाशक ना. रा. मोरे २२४ पांडुरंगवाडी, गिरगांवरोड मुम्बई नं. ४ वा. व. ट. ख. सह रु. २-७-०

नवाकाळ सं. आणि प्रा. य. कृ. खाडिलकर २२० कांदेवाडी नाका, गिरगांव मुम्बई व व मुंबईत रु. १४ वाहेरगांवी रु. १८

पुरुषार्थ सं. आणि प्र. श्री. दा. सातवळेकर, सं. औंध जि. सातारा वा. व ३ रु.

प्रतिभा सं. के. ना. काळे, गं. दे. खानोलकर, व. ह. वि. मोटे. प्र. ह. वि. मोटे गोवर्धन दास बिल्डिंग खटाववाडी गिरगांव मुम्बई वा. व. रु. २-८-०

मनोरंजन सं. कु. मालतीबाई मित्रा. प्र. दा. र. मित्र मनोरंजन प्रेस सॅण्डर्स्ट रोड गिरगांव मुम्बई वा. व. रु. ४-८-०

/महाराष्ट्र सं. आणि प्र. गो. अ. ओगले. ७५ पाचपावली रोड, सर्कल ७ महाराष्ट्र प्रेस नागपूर वा. व. ४-१०-०

महाराष्ट्रसाहित्यपत्रिका सं. द. वा. पोतदार, प्र. वा. गो. चापेकर महाराष्ट्रसाहित्य परिषद कार्यालय, सदाशिवपेठ पुणे वा. व. ट. सह रु. ४-८-०

मौज सं. पां. म. भागवत, प्र. न. रा जोशी मौज प्रिं. ब्युरो खटाववाडी, मुम्बई. वा. व. ट. ख. सह रु. ४-४-०

यशवन्त प्र. गणेश महादेव आणि मंडळी सदाशीव पेठ पुणे वा. व. ट. ख. सह ५-५-०

लोकमान्य सं. प्र.के. ठोसर इ. गो. घाणेकर खटाववाडी, मुम्बई नं. ४ वा. व. ४ रु.

वसुन्धरा सं, आणि प्र. मो. ग. रांगणेकर खटाववाडी गिरगांव, मुम्बई वा. व. ४ रु.

विविधवृत्त सं आणि प्र. रा. का तटणीस, श्री. लक्ष्मीनारायण प्रेस, ३६४ ठाकरद्वार मुम्बई नं. १ वा. रु. ४-२-०

विविधविज्ञानविस्तार सं. आणि प्र. अ. आ. मोरमकर, नाडकर्णी आणि मंडळी ३६४ ठाकुरद्वार मुम्बई वा. व. ख. सह ३ रु.

विहार सं. वि. जि. नाडकर्णी प्र. रा. का. तटणीस श्री. लक्ष्मीनारायण प्रेस ३६४ ठाकुरद्वार मुंबई वा. व. रु, ४-२-०

सकाळ सं. आणि प्र. डॉ. ना. भि. परुळेकर ६१७ कसबापेठ पुणे वा. व. रु. १५

सहविचार सं. प्रो. वि. पा. दांडेकर, प्रो. वि. द. साळगांवकर व श्री. रा. रा. नातु बडोदे वा. व. १-१३-०

संजीवनी सं. आणि प्र. प्र.श्री. कोल्हटकर, खटाववाडी मुम्बई नं. ४ वा. व. रु. ४-२-०

स्त्री प्र. श. वा किर्लोस्कर, किर्लोस्करवाडी, वा. व. ३ रु.

ज्ञानप्रकाश सं. आणि प्र. कृ. ग. लिमये भांबुर्डा, पुणे व सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी सँण्डहर्स्टरोड, गिरगांव मुम्बई, वा. व. पुणे व मुम्बई रु. ९ बाहेर १४ रु.

## दामोदर सखाराम डोंगरे अगरबत्तीवाला

**दुकानः—मार्केटरोड—बडोदें.**

**यांचे कडे**

उंची उदबत्त्या, उंची अत्तरं, सुवासिक तेलें,
कपडे धुण्यासाठीं " डोंगरे सोप " अस्सल
खडीसाखरेचा गुलकन्द, जुना व
मुरलेला खात्रीचा मोरवळा,
सुगंधी धूप, जन्तुविनाशक धूप,
चंदनाचे तेल, चंदनांची खोडें वगैरे
सर्व प्रकारचें सुगंधी सामान माफक भावानें मिळेल
दुकानापर्यंत येण्याची तसदी घेतल्यास फारच
चांगल्या प्रतीचा माल असल्याचे आपल्या नजरेस येईल.

---

## हिंदुस्तान को ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लिमिटेड.

३० एप्रिल १९३१ प्रमाणे

# नवीन बोनस

दरसाल दरहजारीं

| नवीन विम्यांच्या दरांना | जुन्या विम्याच्या दरांना |
|---|---|
| एन्डोमेन्ट अॅशुरन्स...२३ रु. | एन्डोमेन्ट अॅशुरन्स...२१ रु. |
| होल लाईफ अॅशुरन्स २० रु. | होल लाईफ अॅशुरन्स १५ रु. |

नवीन काम २००,००,०० रु वर

**आजच हिंदुस्थानमध्यें विमा उतरा.**

हेड ऑफीसः—
हिंदुस्तान बिल्डिंगज
कार्पोरेशन स्ट्रीट कलकत्ता

**आर. बी. कोराणे अॅन्ड सन्स**
इन्शुरन्स एजंट
महाराजा थिएटर नजीक, बडोदे,

सबंध वर्षाचें मराठी वाङ्मय

# केवळ १ रुपायांत

सुसंबद्ध रीतीनें माहीत करून घ्यावयास

अभिप्राय संग्रहाचे

आजच वर्गणीदार व्हा

आणि

आपल्या उद्यम व्यवसायाची माहिती सुसंस्कृत जनतेस
करून द्यावयाची असल्यास

अभिप्राय संग्रहांत

जाहिरात द्या.

पत्ता—गणेश रंगनाथ दंडवते.

सं. आणि प्र. अभिप्राय संग्राहक,—बडोदें.

---

हें पुस्तक बडोदे येथें श्री लक्ष्मीकान्त प्रीन्टींग प्रेस मध्यें श्री रा. रा. मोतीराम रामशंकर अध्यारु यांनीं संपादका करितां छापिलें ता. ४–११–१४.

वर्ष ५ अंक १२ : जानेवारी १९४८

# अभिरुचि

संपादक: विमल चित्रे
पुरुषोत्तम आत्माराम चित्रे

## सुमतिसुत

### अणुरेणूंनो–

बेगुमान मानव तरारलेल्या नयनीं
तुडवीत तुम्हांला अविरत ' क्षुद्र ' म्हणोनी,
दलितांचें जीवन असंख्य वर्षे जगलां;
या कान जरा कुजबुजतो पश्चिमवारा
अणुरेणूंनो, अन् खुशाल बंड पुकारा !

या कणांत इवल्या अद्भुत भरली शक्ती,
निद्रावश आंतिल प्रचंड दैत्य प्रमाथी,
गर्भात झोपले धगधगते मार्तंड;
या कान जरा कुजबुजतो पश्चिमवारा
अणुरेणूंनो, अन् खुशाल बंड पुकारा !

कां स्वार्थी वलयें रेखुन नर्तन केलें ?
कां परस्परांना धुंदित बिलगुन बसले ?
कां षंढासम लेखिलें स्वतःला क्षुद्र ?
या कान जरा कुजबुजतो पश्चिमवारा
अणुरेणूंनो, अन् खुशाल बंड पुकारा !

या भूवरती सैतान माजले आज,
अन् जगतामधुनी उठून गेली ' लाज ',
व्यभिचारी वसुधा वश हो बलवंताला;
या कान जरा कुजबुजतो पश्चिमवारा
अणुरेणूंनो, अन् खुशाल बंड पुकारा !

खडबडून जागे व्हा तर आज कणांनो,
अवशिष्ट राहिल्या गुदमरल्या प्राणांनो,
या खुशाल धडका, विश्वाला आह्वान–
उध्वस्त करा अन् प्रदेश येथुन सारा
अणुरेणूंनो हो, खुशाल बंड पुकारा !

## कै. भा. रा. लोवलेकर

### अशा ठिकाणीं–

मुळिं न कुणाची दृष्टि पडे
अशा ठिकाणीं भेटुं गडे !–

समोर पाहुनि
उभय शरीरीं
गोड-गोड रोमाञ्च खडे–

फक्त जिथे
सङ्कोच आडवा
आणि सुखाचा अश्रु पडे–

अन्तर असतां
आलिङ्गनही
प्रगाढसे प्रत्यक्ष घडे–

अनुभव घ्यावा
झेलुनि जेथे
आकांक्षांचे ताठ कडे–

अढळ मृत्युची
नितान्त भीती
निश्चिन्तेने कोलमडे–

जिथे सङ्गमीं
शुभाङ्क रजनी
नभीं माण्डि नक्षत्र-सडे–

## शंकर रामाणी

### दूर कुठे जा–

जीवनपथ हा अफाट चालत
आज पोचलों येथे आपण,
वाटेवर या शांत तरुतळीं
बोलुं जरा ये क्षणभर राहुन !

गेला कितितरि काळ लोटुनी !
परस्परांचीं हृदयें जुळलीं,
पथ कांटेरी आक्रमितांना
अनंत दुःखें हसत साहिलीं.

समरसतेच्या आणि सागरीं
दोन मनें हीं आज नाहलीं;
नेत्रांतिल ती मादक बुंदी–
जाउन दृष्टी नवीन आली.

तुझ्यांत मी अन् तूंच असे मी
दोन जिवांच्या जुळल्या ज्योती;
परस्परांच्या हृदय-राउळीं
दिव्य प्रीतिची पसरे दीप्ति.

विरहीं तव मज येइल आता
सहवासाची तुझ्या प्रचीती;
दूर कुठे जा तूं माझ्याविण
तुझाच होइन मी सांगाती !

सांतांतुन हो अनंतदर्शन
ये मूर्तातुन अमूर्त हातीं;
निर्गुणांत सगुणाची सखये,
आज असे जाहली समाप्ति !

## सूर्यकान्त खाण्डेकर

### नयनहो !–

नका करूं बरसात, नयनहो, नका करूं बरसात !
संतत धारा धरुन न्हाणितां कुणास अंधारांत ?
पहिल्या पूजेसाठी होते अधिर लाजरे हात,
जुळवित होते ओठ आरती अस्फुट कांही गात;
गुप्त जाहली जिवंत प्रतिमा तोंच अशी निमिषांत;
नका करूं बरसात, नयनहो, नका करूं बरसात !

मंदिरांत या नसे देवता गाभारा निर्वात,
अंताकडुनी तिच्या दयेची होय अशी सुरुवात;
रित्या आसनापुढे विझावी जीवाची फुलवात
याहुन घडणें काय ? पातला भक्तीचा कल्पांत !
नका करूं बरसात, नयनहो, नका करूं बरसात !

## शरद द. वैद्य

### पाणवठ्यावर

भरली घागर बुडबुडुनी
कां उभी अशी तूं खिन्न मनीं ?

स्वैर गारसा वाहे वारा
मेघ निळा घे नभीं निवारा
ये मातीचा गंध शिवारा
घरा निघाल्या मैतरणी–
कां उभी अशी तूं खिन्न मनीं ?